९६६१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ७०२९

# ओळख

द. वा. पोतदार

REFBK-0011611

बुक स्टॉल
पुणे २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३२४५ वि: परिच
क्रमांक १०२२ नों दि: २/२/६२

# ओळख

म. म. द. वा. पोतदार

मराठी संशोधन मंडळ
दा. क्र. १९८०१
REFBK-0011611

व्हीनस बुक स्टॉल : पुणे २.

प्रकाशक
सौ. सुलोचना लिमये, एम्. ए.
व्हीनस बुकस्टॉल
अप्पा बळवंत चौक : पुणें २

© द. वा. पोतदार

मुखपृष्ठ
सुधाकर खाजगीवाले

प्रथम आवृत्ति
नोव्हेंबर १९६१

मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय
३९५ टिळक रोड, पुणें २

म. म. द. वा. पोतदार,
कुलगुरुनिवास,
पुणें विद्यापीठ, गणेशखिंड, पुणें ७.

कृ. सा. न. वि. वि.

महाराष्ट्राचा महापुरुष अशी तुम्हांस सार्थ संज्ञा देण्यांत आलेली आहे. असे महापुरुष जेथें जातात तेथें आपला प्रभाव पाडतात. आपल्या सभोंवतालच्या नेत्यांचे परिचितांचे सूक्ष्म अवलोकन करतात; आपल्या अलौकिक स्मरणशक्तीच्या सहाय्यानें त्यांच्या गुणांचें टिपण करतात. तुम्ही तें केलेंत नी वेळोवेळीं सुंदर व अर्थपूर्ण शब्दचित्रें महाराष्ट्रांतील रसिक वाचकांपुढें ठेवलींत. पुष्प हें स्वतः सुगंध देतेंच, पण त्यांचा गुच्छ तो सुगंध सर्वत्र पसरवितो.

या व्यक्तिचित्रांचा गुच्छ तुम्हीं आम्हांस प्रसिद्धिसाठीं दिलात याबद्दल धन्यवाद. ओळखीचें पर्यवसान म्हणजे स्नेहाचे झरे ! आपलें पुढील पुस्तक म्हणजेच 'स्नेहाचे झरे'! तें केव्हां तयार करावयाचें ?

सवडीनें पत्रोत्तर यावें.

कळावें, लोभ आहेच, वृद्धि व्हावी ही विनंति.

कार्तिक शुद्ध प्रतिपदा
शके १८८३
दि. ९-११-६१

आपले
**अ. ह. लिमये**
**सौ. सुलोचना लिमये**

***ता. क.*** : *तुम्हीं या ग्रंथांत लोकांची ओळख करून दिलीत, पण तुमची ओळख करून देण्याचा 'लहानतोंडी मोठा –' प्रयत्न मीं केला आहे. राग नसावा.*

**–अ. ह. लिमये**

अनुक्रम 3.2055 वि: ......
क्रमांक ......1022...... नौ: दि: ......



# म. म. द. वा. पोतदार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११०५१

महाराष्ट्राचे पुण्यपुरुष

* *

चवदा ऑगस्ट एकोणसाठची ती दुपार होती. दादांचे मीं प्रकाशित करीत असलेलें 'श्रोतेहो' हें पुस्तक तयार झालें होतें. १५ ऑगस्ट रोजीं या पुस्तकाचें प्रकाशन व्हावें अशी इच्छा होतीं. पण प्रस्तावना अजून मिळाली नव्हती. दत्तोपंतांच्या विविध कार्यांत प्रस्तावनेचें प्रकरण कसें जमणार याचा विचार मी करीत होतों. अखेर मनाचा हिय्या करून दुपारी चार वाजतां मी 'लोककल्याण' मध्यें शिरलों.

"कोण आहे?"

"मी लिमये."

"या."

मी खोलीत शिरलों. कागदपत्रांच्या ढिगाऱ्यांत तो सत्पुरुष बसला होता. अंगांत बंडी, कपाळांवर आडवें गंध, हातांत लेखणी नी डेस्कवर कागद. मासिकें, वृत्तपत्रें, सभांचे ठराव, संमेलनांची इतिवृत्तें, व्याख्यानांचीं निमंत्रणें, अभिप्रायासाठी आलेलीं पुस्तकें. साहित्यांतील नानाविध नमुन्यांचें एक छोटेसें प्रदर्शनच तेथें भरलें होतें.

" या, अनंतराव. आज काय आणलं आहे ? "

" दादा, पुस्तक उद्यां प्रकाशित व्हावं अशी इच्छा आहे. "

" मग आतां कशानं अडलं ? पुस्तक छापून झालेंच आहे. अशुद्धें मात्र राहिलीं आहेत. मला वेळ मिळेल त्याप्रमाणें मी दुरुस्त्या करीतच आहें. तुमचं पुस्तक तयार होईतों जमलं तर शुद्धिपत्रक तयार करून देईन. नाहींतर नंतर एखादें पान घालूं. अहो, मी काय मोकळा आहे का ? "

" तें खरं आहे, दादा. पण प्रस्तावना हवी आहे. "

" मग त्यांत काय आहे ? देईन लिहून. पुस्तक झालं, आतां प्रस्तावनेला काय वेळ ? "

" तसं नव्हे दादा. पुस्तक उद्यांच्या मुहूर्तावर प्रसिद्ध करायचं आहे, नी म्हणून प्रस्तावना आजच हवी आहे. "

" तुमचे प्रकाशकांचें बरोबर आहे. पण मी मोकळा थोडाच आहें ? वेळ होईल त्यावेळी देईन लिहून. "

मींहि हट्टालाच पेटलों होतों. दादांच्याकडून आज प्रस्तावना लिहून घ्यायचीच असा मींहि निर्धार केला होता. दादांना थोडंसं डिवचलं तर आपलं काम साधेल अशी योजना मी आंखूं लागलों.

" दादा, " मीं म्हणालों, " तुम्हाला खरंच वेळ नसला तर नका लिहूं प्रस्तावना. त्याशिवायच मीं उद्यां पुस्तक प्रकाशित करीन. ' म. म. पोतदार यांना कार्यबाहुल्यामुळे प्रस्तावना लिहिण्यास वेळ मिळाला नाहीं. प्रस्तावनेशिवाय हें पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी. पुढील आवृत्तीच्या वेळी प्रस्तावना समाविष्ट केली जाईल ' असा खुलासा मीं छापीन म्हणजे झालं. " मीं म्हणालों.

ही मात्रा बरोबर लागूं पडली.

" म्हणजे एवढें पुस्तक मीं तयार केलं नी माझ्या हातून प्रस्तावना होणार नाहीं कीं काय ? "

" तसं माझं म्हणणं नाहीं. पण तुम्हांला वेळ – "

माझं वाक्य अर्धवट थांबवून दादा म्हणाले, " अहो, इतकं जरूरीचं काम असलं तर वेळ काढलाच पाहिजे. अन् वेळहि मिळेल. पण तुम्ही पहातांच आहां. एकसारखीं माणसं येत असतात. भीड मोडवत नाहीं. कामं मात्र अडून रहातात. "

या कामासाठी, या आक्रमणापासून त्यांचा बचाव करण्याची कामगिरी मीं पत्करली. दरवाजांतच त्यांचा पहारेकरी म्हणून मीं बसलों. दादा प्रस्तावना लिहायला बसले. कागदाच्या बारीक बारीक कपट्यांवर हिरव्या शाईनें सुवाच्य अक्षरानी साहित्याचे सुवर्णकण घडूं लागले.

सुमारें दहा मिनिटांनंतर एक वृद्ध गृहस्थ आले.

" पोतदार आहेत ना ? " त्यांनी दरवाजांतील पहारेकऱ्याला म्हणजे मला विचारलें.

" आहेत, पण कामांत आहेत. तुमचं कांहीं महत्त्वाचं नी जरूरीचं काम आहे का ? "

" तसं महत्त्वाचं असं काम नव्हतं. पण बरेच दिवसांत भेटले नाहीत, म्हणून आलो होतो. " म्हातारबुवांनी खुलासा केला.

" आपलं नांव नी पत्ता द्या लिहून. मी सांगतो त्यांना. "

" तशी कांही जरूरी नाही म्हणा. पण पोतदारांच्या घरीं आजवर असं कोणी अडवलं नव्हतं आम्हांला. "

असं म्हणून पुणेरी जोडा वाजवीत म्हातारबुवा गेले.

पण दादांनी हा संवाद ऐकला होता. त्याना थोडेंच रहावणार ?

" कोण आलं होतं हो ? " कागदावरून दृष्टि काढून त्यांनी विचारलं.

" महत्वाचं असं कोणी नव्हतं. गेले परत ते. "

सुमारे अर्ध्या तासांत दादांची प्रस्तावना पुरी झाली. एवढ्या काळांत तीन शिपाई, दोन हितचिंतक इतकी मंडळी येऊन गेली. कुणाचं फारसं महत्वाचं असं काम नव्हतं.

पोतदारांसारख्या माणसाचा आपण निष्कारण वेळ घेतो याची त्यांच्याकडे येणाऱ्या लोकांपैकीं कित्येकांना जाणीव नसते. आपण

केवळ दहा मिनिटासाठी येतों. या दहा मिनिटांनी पोतदारांचें काम कितीसे अडणार आहे असा स्वार्थी विचार या हितचिंतकांच्या मनांत असतो. ही मंडळी आपल्या स्वार्थाला इतकी जपत असतात कीं पोतदारांना कांहीं महत्वाचें काम असेल, आपण त्यांची अडचण करीत असूं हा विचारहि त्यांच्या मनांत येत नाही. भिडस्तपणामुळे कोणालाहि नाही म्हणणें दादांना जमत नाहीं. ही मंडळी येतात. नी आपलें काम करून निघून जातात.

एका कॉलेजचें स्नेहसंमेलन होतें. नियुक्त पाहुणे आयत्या वेळी आजारी पडले. ५ वाजतां सुरू होणाऱ्या समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची गळ पावणेपांच वाजतां घालण्यांत आली. दत्तोपंतांनीं प्रसंग ओळखून होकार दिला नी समारंभ साजरा करून रात्री साडेआठ वाजता ते घरीं परतले. नियोजित कामें राहून गेलीं. लोकांच्या वेळीं अवेळीं उपयोगी पडण्यात कृतार्थता मानणाऱ्या दत्तोपंतांना या घटनेचा विषाद वाटला नाही. पण ज्यांची कामें या अनपेक्षित कार्यक्रमामुळे अडलीं, त्यानी मात्र मनांतल्या मनांत त्यांच्यावर ताशेरे झाडले.

दत्तोपंतांचा जीवनप्रवाह म्हणजे गंगेचा निर्मळ प्रवाह. कुणीहि यावं, आपल्या अडचणींची, चुकांची पोतडी या प्रवाहांत सोडावी नी शुद्ध होऊन परत जावें. दिवस उजाडला कीं दत्तोपंतांच्या घरची वर्दळ सुरू होते. सूर्याच्या वाढत्या प्रकाशाबरोबर ती वाढत जाते. अखेर रात्र येते. सगळी माणसं आपआपल्या घरी परततात. दत्तोपंतांना फुरसद सांपडते नी त्यांची ज्ञानसाधना सुरू होते.

वयाची सत्तरी उलटली असतांनाहि या महापुरुपाचा उत्साह अवर्णनीय नी अमाप आहे. युरोपच्या सफरीचं त्यांचं एक पुस्तक तयार झालें. केंब्रीज येथे त्यांना एक संस्कृत शिलालेख (tablet) सांपडला. त्यावरील शक व सन यांची संगति त्यांना लागेना. दोन दिवस त्यांनी अनेक ग्रंथ चाळले, ज्योतिषांशीं वाद घातले, संदर्भ पाहिले नी आपलें समाधान करून घेतलें. गौहत्तीला इंडियन हिस्टॉरिकल कॉन्फरन्स डिसें. १९५९ च्या अखेर भरली होती.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३२०५५... वि: ५.१/म... ११
क्रमांक ...२०२८... नों: दि: ...२१४५...

परिषदेचे नियोजित अध्यक्ष डॉ. आळतेकर हे अचानक मृत्यु पावल्याने त्यांचे भाषण वाचण्याची नी परिषदेची सूत्रें हाल-विण्याची जबाबदारी दत्तोपंतांवर येऊन पडली. ती त्यांनी यशस्वीरीत्या तर पार पडलीच, पण बसल्या बसल्या आणखीहि एक उद्योग त्यांनी तेथें केला. औरंगजेबाचा मामा शाहिस्तेखान याची पुण्यास बोटें तुटून मानहानि झाली तेव्हां औरंगजेबानें त्याची नेमणूक आसाममध्यें केली ही हकीगत दत्तोपंतांना अर्थातच माहीत होती. म्हणून गौहत्ती येथील आपल्या मुक्कामांत त्यांनीं त्या प्रकरणाचे कागदपत्र मिळवून बरोबर आणले.

थेऊरची माधवराव पेशव्यांची पुण्यतिथि साजरी करण्याची कल्पना त्यांचीच. तो समारंभ त्यांनीं कधीहि चुकविला नाही. पलीकडल्यावर्षी ते इटालीला गेले होते त्यामुळे यंदा आपल्याला थेऊरला जातां येणार नाही असें त्यास वाटलें. पण योग असा कीं शनिवारीं रात्रीं ते मुंबईस परतले, नी रविवारी पुण्यतिथि. सकाळीं पुण्यास येऊन सांचलेले कागदपत्र पाहून सायंकाळी थेऊरला त्यांची स्वारी हजर.

असे किती प्रसंग वर्णावे ? आचार्य अत्रे यांचा षष्ठ्यब्दि समारंभ पुण्यास झाला. आचार्य अत्रे यांच्या भाषणानंतर भाषण करून फड जिंकणें हें जवळ जवळ अशक्य झालें, दत्तोपंतांनी सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें नि अत्र्यांच्या भाषणानंतर भाषण करून सभा जिंकली.

प्रसन्न चेहरा, रसाळ वाणी, अगाध ज्ञान, टवटवीत वृत्ति, प्रसंगावधान, ज्ञानार्जनाची तळमळ, लोकसेवेचें व्रत, निष्कपट स्वभाव, व्यावहारिक निर्लोभीपणा असे दत्तोपंतांच्या स्वभावाचे किती पैलू सांगावे ? तें एक नवें दत्तसहस्रनामच होईल. आपले अनेक व्याप सांभाळून ते प्रस्तावना लिहितील, लेख लिहितील, व्याख्यानें देतील, रेडियोचे संवाद तयार करतील, सरकारला सल्ला देतील, स्नेह्यांच्या भांडणांत तडजोड करतील—काय करणार नाहींत याचीच यादी करणें कठीण आहे. टिळक महाराष्ट्र विद्या-

पीठ, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, शिक्षणप्रसारक मंडळी, पुणें विद्यापीठ, भारतीय संशोधन मंडळ, भारतीय संस्कृति कोश मंडळ, अशा असंख्य संस्था त्यांच्या मायेच्या उबेखालीं जोमानें वाढत आहेत. सर्व संस्थांच्या कार्यावर त्यांची गरुडाप्रमाणें तीक्ष्ण व विहंगम दृष्टि आहे. दुसऱ्याच्या चुका ते पोटांत घालतील पण असत्य सहन करणार नाहींत. लायकीला शाबासकी व उत्तेजन देतील, पण नालायकाला थारा देणार नाहीत. घरीं आल्या गेल्या पंडितभिक्षुकांना दिलेल्या दानाचा हिशोब ठेवणार नाहींत. पण संस्थेचे विश्वस्त म्हणून काम करतांना दामाजीपंतांप्रमाणें पैची चूक सुद्धां सहन करणार नाहीत.

त्यांच्या निस्पृहपणाची एक गोष्ट सांगितल्याशिवाय मला राहवत नाहीं. त्यांच्या डेस्कावर मी एकदा मोठी पेन्सिल पाहिली. मागितल्याबरोबर त्यांनीं मला ती दिली. ती तेथेंच ठेऊन आम्ही बोलूं लागलों. तेवढ्यांत एक शिपाई कांही कागदपत्र घेऊन आला. त्यांची पोंच देण्यासाठीं ते पेन्सिल शोधूं लागले. मला आश्चर्यच वाटलें. डेस्कावर एवढी मोठी पेन्सिल असतांना त्यांना ती कशी दिसत नाहीं याचा मला अचंबा वाटला. मीं तसें त्याना सांगतांच ते म्हणाले, " ती पेन्सिल आतां माझी राहिलेली नाहीं. ती मीं तुम्हांस दिली आहे ना ? "

दत्तोपंतानी ग्रंथ लिहिले नाहींत, त्यांनीं आपली परंपरा पुढें चालविली नाहीं असे त्यांच्यावर आरोप करण्यात येतात. पण या सज्जनाने गेलीं ५० वर्षे महाराष्ट्राच्या अस्मितेचें हिरीरीनें जतन केलें आहे, हें कोणाच्या ध्यानांत येत नाहीं. साहित्य, इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण, संशोधन आणि आणखी कितीतरी क्षेत्रें त्यांनी आजवर फुलविलीं आहेत.

त्यांची दूरदृष्टि कौतुकास्पद आहे. पंचवीस वर्षांपूर्वी त्यांनी केलेली निदानें आज सत्य ठरलीं आहेत. त्यांचे आडाखे अचूक ठरले आहेत. पण यांत त्यांना अहंपणा वाटत नाहीं. तुम्ही त्या बाबतींत त्यांना गौरवूं लागला कीं ते गप्प बसतील, बोलणार नाहींत.

त्यांची स्मरणशक्ति अलौकिक आहे. आमच्या श्रोते हो पुस्तकांतील एका व्याख्यानाची त्यांना तारीख सांपडत नव्हती. त्यांनीं कांहीं मिनिटें विचार केला नी काळाची ते संगति लावूं लागले. सुमारें पांच मिनिटांत त्यांनी तारीख तर नक्की सांगितलीच पण त्या समारंभाचें त्यांना आलेलें आमंत्रणहि शोधून काढलें.

त्यांच्या घराच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरचा त्यांचा संग्रह म्हणजे एक अजबखाना आहे. त्यांच्या घराच्या माळ्यावर एकाद्याला सोडल्यास तो खरोखरच गायब होण्याचा संभव. पण त्या संग्रहांतील इतस्ततः पडलेला चिटोरा नि चिटोरा दत्तोपंतांच्या स्मरणशक्तीच्या कपाटांत शाबूत आहे. केसरीच्या फायली, बाळशास्त्री जांभेकरांच्या मासिकांचे रंगीत मुखपृष्टें असलेले जुने अंक, ऐतिहासिक याद्या, महोत्सवांचे अहवाल, लग्नांचीं निमंत्रणें— या भांडारांत अशीं कितीतरी रत्नें सांपडतील.

मी त्यांना एकदा सहज विचारलें, " दादा, या किरकोळ चिठ्या-चपाट्या कशाला बाळगतां ? त्यांना थोडेंच ऐतिहासिक महत्व आहे ?"

" तें तुम्हांला कळणार नांहीं, अनंतराव. त्यासाठीं तुम्हांला इतिहाससंशोधक व्हावें लागेल. आज तुच्छ वाटणाऱ्या कागदपत्रांना भावी काळांत अपरंपार महत्त्व येतें. वस्तु जतन करण्याचें काम न सांभाळल्यानेंच आपल्या इतिहासाचीं पानें अपुरीं वाटतात. "

सभांचे ठराव, निरनिराळ्या वादांतील उत्तरें प्रत्युत्तरें, निरनिराळ्या घटनांचे तपशील यांची माहिती दत्तोपंतांच्या स्मरणशक्तींतून नी निरीक्षणांतून सुटत नाहींत. आणि एवढेंच नव्हे तर वादाच्या वेळीं दाखले वापरून ते प्रतिपक्षाला निरुत्तर करतात. अत्यंत थोड्या पैशांत त्यांना आपलें आयुष्य घालवावें लागलें. परोपकारासाठीं खिशाला चाट बसण्याचेहि प्रसंग आले. पण दत्तोपंतांचा आनंदी स्वभाव शाबूत राहिला. जीवनाकडे ते उत्साही वृत्तीनें पहातात, नव्या विचारांचें ते स्वागत करतात. त्यामुळेंच पुराणपुरुष म्हणून प्रख्यात असलेला हा महापुरूष सदैव टवटवीत

नी ताजा वाटतो.

असा हा महाराष्ट्राचा पुराणपुरुष आहे. आंधळ्यांनीं हत्तीची परीक्षा करावयास निघावें नी ज्याच्या हातीं त्या हत्तीचा जो अवयव सांपडेल त्यांतच त्या हत्तीचें मोठेंपण नी सामर्थ्य सामावलेलें आहे असें सांगावें, त्याप्रमाणें दत्तोपंतांच्या अनेकविध पैलू पैकीं ज्या पैलूशीं ज्याचा ज्याचा संबंध आला त्यानें त्यानें तें त्यांचे वैशिष्ट्य म्हणून सांगावें. पण 'अत्यतिष्ठत् दशांगुलम्' हें वचन दत्तोपंतांच्या बाबतीत सार्थ आहे. त्यांचें संपूर्ण मूल्यमापन करणें अवश्य असलें तरी अशक्य आहे.

'लोककल्याणा' च्या सांस्कृतिक आनंदभुवनांतून आपल्या ज्ञानाच्या, अनुभवाच्या, कर्तबगारीच्या नी प्रभुत्वाच्या गर्जनांनीं हा पुरुषसिंह सारा भारत दणाणून सोडीत आहे. त्याच्या वाटेला कोणीं गेलें नाहीं तर तो त्रास देणार नाहीं. परंतु त्याला निष्कारण उपद्रव देणारांची धडगत नाहीं हें खास. अनेक वर्षांची तपकीर ओढण्याची संवय विलायतच्या यात्रेंत त्रासदायक होईल असें वाटतांच ती ते क्षणांत सोडून देतात. विलायतेसाठीं तयार केलेले कोट, विजार व बूट जितक्या कुतूहलाने ते घालतील तितक्याच उत्साहानें राजदरबारींहि आपला महाराष्ट्रीय पोषाख ते दिमाखानें घालतील. त्यांच्या कल्पना व विचार हे बुरसटलेले नाहींत, त्यांचें कर्तृत्व अविवेकी नाहीं, त्यांचें चरित्र कलंकित नाहीं, नव्हे त्यांच्याविषयींचें असें अभावात्मक बोलण्याचीहि आवश्यकता नाहीं इतके ते थोर आहेत. शनिवारवाड्याच्या तटाप्रमाणेंच त्यांचा उत्साह अजून टिकून आहे, मुठेच्या प्रवाहाप्रमाणेंच त्यांचे विचार अखंड वहाते आहेत. त्यांच्या घराच्या आवारांतील पारिजातकाच्या फुलाप्रमाणेंच त्यांचें अंतःकरण कोवळें आहे. आजूबाजूचीं मुलें त्यांच्याकडे जातात, आपलीं भांडणें त्यांच्यापुढें नेतात, कागाळ्या सांगतात. त्यांना काय माहीत कीं, दत्तोपंत एक महान् पुरुष आहे. तीं मुलें त्यांना केवळ पोतदार म्हणतात. दत्तोपंत त्यांची भांडणें ऐकतात. कधीं लटका राग आणतात. मग स्वतःच

हसतात. त्यांच्या डेस्कावर एक लहानशी बाटली असते. तीत रंगीत गोळ्या असतात. त्या किती आहेत हें पहातात. गोळ्या कमी असल्या तर उठतात नी वरच्या फळीवरील एक मोठी बाटली काढून त्यांतील गोळ्या लहान बाटलींत भरतात. आपण हें दृश्य पहात असतों. दत्तोपंतांच्या पुढें आपण किती क्षुद्र आहों, लहान आहों याची आपणांस जाणीव होते. नी त्या लहान मुलांप्रमाणेंच आपणालाहि हात पुढें करून म्हणावेसें वाटतें, "अहो पोतदार मलाहि एक रंगीत गोळी द्या."

अ. ह. लिमये

## अनुक्रमणिका


१ न. चिं. केळकर १७
एक कुशल नावाडी

२ कृ. पां. कुलकर्णी २८
गाढे भाषा पंडित

३ ग. गो. दिवाकर ३३
पहिले नाट्यछटाकार

४ प्र. के. अत्रे ४०
झुंझार पुरुष

५ सर यदुनाथ सरकार ४५
विख्यात इतिहासकार

६ गोपाळराव देशपांडे ५२
रयतेचे कुलमुख्त्यार

७ वा. मो. पोतदार ६२
एक सत्पुरुष

८ श्रीमंत बाबासाहेब घोरपडे ७१
आदर्श अधिपति

९ कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री चिपळोणकर ७९
अलौकिक पितापुत्र

१० डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर ८५
आमरण पंडित

११ चिं. ग. कर्वे ९१
मराठीचे कोशकार

१२ वि. का. राजवाडे ९७
इतिहासाचे भीष्माचार्य

ग्रं. क्र. ११८७१
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

१

# न. चिं. केळकर

## एक कुशल नावाडी

❧ ❧

ठोकळ मानाने १८९८ ते १९४८ हा पन्नास वर्षांचा कालखंड केळकरांच्या खऱ्या सार्वजनिक आयुष्याचा काळ होय असें म्हटलें असतां चालेल. एवढा दीर्घ काळ त्यांनी केसरी-मराठा संस्थेच्या सेवेंत घालविला. साताऱ्यास वकिलीस आरंभ केला असतांना तेथून त्यांस टिळकांनी हेरून आपल्याकडे बोलावून घेतलें. नरसोपंतांचे मधले बडील बंधु ' काव्यसंग्रह'कर्ते नारायणराव केळकर हे मोठे विद्याव्यासंगी व मराठी काव्याचे भक्त होते. हरिभाऊ आपटे, राजवाडे, पारसनीस, भावे, शंकर श्रीकृष्ण देव, चांदोरकर, पांगारकर आणि केसरीचे विश्वस्त तात्यासाहेब करंदीकर वगैरे मंडळी आगे-मागे एकाच काळांतली होत. देशसेवेच्या स्थूल प्रेरणेने या सर्वांनाच व्यापलें होतें. टिळक-आगरकर यांचा प्रभाव हाच या प्रेरणेचा मूलाधार होता. निबंधमालेपासून या प्रेरणेचा जन्म झाला होता. रानडे हे या नव्या युगाचे महान् द्रष्टे होते आणि लोक-हितवादी हे एक कळकळीचे मार्गदर्शक आणि टीकाकार होते; म्हणून तात्यासाहेब केळकर यांनी टिळकांचें बोलावणें चटकन मान्य केलें. नाहीपेक्षा त्यांचे ज्येष्ठ बंधु आप्पासाहेब यांच्याप्रमाणे त्यांनाहि उंची सरकारी नोकरी लाभली असती. केळकरां-च्याच वाङ्मयांत या काळाचें चित्र उत्तम रीतीने उभें केलेलें कोणाहि अभ्यासूस सापडेल.

## सार्वजनिक आयुष्याच्या दारांत

तात्यासाहेब केसरींत आले त्याच वेळीं महाराष्ट्रावर त्रिविध संकट कोसळलें. प्लेग नांवाचा प्राण घेणारा गाठीचा ताप भयंकर बोकाळला, लोक अत्यंत भेदरून गेले, जीवनाची सर्व उलथापालथ झाली. इकडे दुष्काळ पाठीस लागलाच होता. त्याच्या निवारणासाठी सरकारने कागदावर दिसण्याला जे सुंदर नियम केले होते, पण ज्यांची प्रामाणिकपणें व कसून कधीच अंमलबजावणी होत नव्हती ती करायला लावून आणि लोकांचे हक्क लोकांना समजावून देण्याचें कार्य सार्वजनिक सभेने या वेळी अंगीकारलें आणि केसरीने या कामीं फार मोठा भाग उचलला. थोड्या वर्षांपूर्वीं टिळकांनी गणेश-उत्सवाची धुरा अंगावर पत्करली होती आणि त्यानंतर कांही वर्षांनी शिवाजी-उत्सवाची चालना त्यांनी मोठ्या धैर्याने आणि योजनेने हातीं घेतली. शिवाजी-उत्सव आणि गणेश-उत्सव हीं दोन लोकजागृतींचीं प्रमुख साधनें ठरलीं. 'केसरी' हें तर या अशा कार्यासाठीच उभें केलेलें वाहन होतें. टिळकां-सारख्यांच्या अश्वशक्तीनें तें चालत होतें, आणि खाडिल्कर-केळकर या जोडीचें साहाय्य टिळकांनी वाढत्या कामांच्या व्यापासाठी आपल्या अचूक परीक्षेनें संपादन केलें होतें. केसरीचा सरकारवर मारा अधिकाधिक तीव्र होत चालला. टिळक ह्या गृहस्थ वाढत्या राजद्रोहाचें मूळ आहे, तेव्हा त्याचा पक्का बंदोबस्त आधीं केला पाहिजे असें सरकारच्या मनाने घेतलें; टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरण्यांत आला. एवढा मोठा वेदशोधक, गणिती आणि देशभक्त पत्रकर्ता राजद्रोहाच्या आरोपाखाली खडे फोडण्यासाटीं तुरुंगांत रवाना केला हें सरकारचें कृत्य पाहून टिळकांचा जहालपणा पसंत नसणारे आणि स्वतःस त्यापासून सोवळे समजणारे त्यावेळचे कॉंग्रेसचे पुढारीसुद्धां माफक प्रमाणात का होईना संतापून गेले. टिळक तुरुंगांत गेले हीच वेळ केळकर-खाडिलकरांच्या कसोटीची ठरली. सार्वजनिक आयुष्याच्या दारांत पाऊल टाकीत असतांनाच असा कठिण प्रसंग पुढे उभा राहिला.

## सांधेजोड करणारे

या प्रसंगातून उत्कृष्ट 'सांधेजोड करणारे' म्हणून शिफारस-पत्र वरील जोडीने टिळकांकडून जाहीर रीतीनें मिळविलें. टिळकांचें अवघड कार्य सरकारास न भितां प्रसंगी देहदंड सोसूनहि चालवणारी तरुण मंडळी त्यांच्यामागे उभी आहेत, ती कर्तबगार आहेत आणि इमानाला जागणारी आहेत या अनुभवानें जनतेचें बळ अनेक पटीनीं वाढलें. अर्थात् केळकरांपुरतें बोलायचें झाल्यास त्यांचा अनुभव वाढला, जबाबदारीमुळे अधिक सावधपणा कळूं लागला, लोकांच्या विश्वासाचें बळ ही एक शक्ति आहे असा प्रत्यय वाटूं लागला, आणि टिळकांचे कधी उजवे तर कधी डावे हातच म्हणून लोक केळकरांना ओळखूं लागले.

## चौरस संपादकांतील अग्रगण्य

टिळक तुरुंगात असतांना केळकर केसरींत लिहीत. पण या काळात त्यांजकडे केसरीपेक्षां 'मराठा' लिहिण्याचें काम अधिक वेळा दिल्याचें दिसतें. किंबहुना टिळकांनी जवळ केलेल्या मंडळीत केळकरांच्या इतका जलद आणि सफाईदार इंग्रजी लिहिणारा दुसरा कोणीहि नव्हता हें अगदी स्पष्ट आहे. एखाद्या तासांत मराठ्याचा अग्रलेख केळकर सहज लिहून टाकीत, असें आम्ही त्या वेळीं ऐकलेलें आहे. केळकरांच्या या इंग्रजी लेखनाचा आस्वाद घेण्याची सोय 'Pleasures and privileges of the Pen' या ग्रंथानें झालेली आहे.

प्रथमपासूनच केळकरांना साहित्याची विशेष आवड होती. कविता, कथा, नाटकें इत्यादि विषयांवरील ताजे ताजे ग्रंथहि त्यांच्या अवलोकनांत असत. त्यांचा वाचनाचा हव्यास फार दांडगा होता. साहित्याच्या खालोखाल त्यांना इतिहासाची आवड होती आणि याच्या जोडीला राजकारण आणि अर्थशास्त्र यांचाहि त्यांचा व्यासंग चांगला होता. वर्तमानपत्रकर्त्याला एकप्रकारची सर्वज्ञता अंगी आणावी लागते. अमुक विषय न आला तरी चालेल असें म्हणून भागत नाही. नरसोपंत हे अशा चौरस संपादकांत अग्रगण्य होते.

आपल्या व्यासंगाची हौस पुरवण्याकरिता पन्नास वर्षांपूर्वी केसरी-मराठा संस्थेंत म्हणण्याजोगी सोय नव्हती. टिळकांजवळ त्यांना आवडणाऱ्या विषयांवरील ग्रंथांचा भरणा चांगला होता; पण नरसोपंतांची भूक भागण्याजोगें खाद्य त्यांत फारसें नव्हतें. त्यांस प्रायः बाहेरूनच पुस्तकें मिळवावीं लागत. आज पुणें शहरांत उच्च शिक्षण-संस्थांच्या संग्रहीं जेवढीं मोठालीं ग्रंथालयें आपणाला दिसतात तेवढीं तीं त्या काळीं नव्हतीं. अशा स्थितींत केळकरांनी आपला व्यासंग चौफेर चालू ठेवला हीच गोष्ट त्यांच्या आवडीची आणि पराक्रमाची साक्ष देईल. पदरचे पैसे खर्चून ग्रंथसंग्रह जुळवावा म्हटलें तर केसरींतून त्या कालांत प्राप्ति ती काय होणार ? आणि पुष्कळ शहाणे लोक असा पैसा खर्चून ग्रंथसंग्रह करण्याचें टाळतात याचें कारण करून करून केला तरी एखादा माणूस किती विषयांचा आणि केवढा संग्रह करू शकेल ? टिळक स्वतः आपल्या विषयांतील पट्टीचे विद्वान् आणि त्यांच्या पाटाला पाट लावून बसावयाचें तर व्यासंगाशिवाय कसें शोभेल ? साहजिकच केळकरांची तुलनाच करायची झाली तर ज्या गीता-भारतादि ग्रंथांचा टिळक विशेष अभ्यास करीत त्या ग्रंथांचा व्यासंग खाडीलकरांनी केळकरांपेक्षा अधिक केला; परंतु राजकारण, अर्थशास्त्र, इंग्रजी साहित्य इत्यादि आधुनिक विषयांचा अभ्यास केळकर अधिक करीत. वास्तविक हें ध्यानांत घेतलें पाहिजे की उभयताहि नामांकित संपादक होते, चौरस होते, व्यासंगी होते. तथापि, त्यांची मूळची ठेवणच थोडीफार निराळी होती, याच दृष्टीनें ही तुलना समजावून घ्यावयाची.

## तेलाच्या आशेनें वाळू गाळणें चालू होतें !

या पुढील काळांत हिंदुस्थानामध्ये कर्झनशाही चमकली. वंगभंग म्हणजे एका बंगालचे दोन बंगाल झाले. त्यांतहि पूर्व बंगाल, मुसलमानी बंगाल अशी स्पष्ट फाळणी होती. त्या वेळचे गोरे अधिकारी मुसल्मान समाजाला कधी कधी 'लाडक्या बायको 'ची उपमा देत. विद्यापीठांना वेसण घालण्याचा कायदा झाला. इंग्रजी साम्राज्याच्या वैभवाचें प्रदर्शन दरबार भरवून झालें. अशा अनेक कारवाया ब्रिटिश साम्राज्याची घडी बळकट करण्याकरिता त्या चतुर मुत्सद्याने योजल्या.

इकडे हळूहळू राष्ट्रजागृति वाढीला लागत होती. वाळलेल्या गवताच्या गंजीला काडी लागावी त्याप्रमाणें वंगभंगाने सारा देश पेटला. हिंदुमुसल्मान एका आवाजाने सरकारविरुद्ध लढा करण्यास उभे राहिले. अनेक वर्षे सरकारास युक्तिवादाचे खलिते सादर करून आपलीं गाऱ्हाणीं पटवून देण्याचा प्रयत्न आपल्या पुढाऱ्यांनी पांचपन्नास वर्षे येथे आणि इंग्लडांत मोठ्या नम्रतेने आणि आशेने चालविला होता. आम्हाला सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षा हिंदुस्थानांत घेऊन इंग्रजांच्या बरोबरीने उच्च सरकारी नोकरींत वांटा द्यावा अशी एक आमची मागणी होती. मागून मागून कंठशोष केला. तथापि, या आय्. सी. एस्. च्या बालेकिल्ल्यांत हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत आम्हांस प्रवेश करण्यास संधि देण्यांत आली नाही. त्यासाठी वाटल्यास विलायतेंत जावें-राहावें, तर वयाची अट २१ वर्षांची. त्यातून अर्धामुर्धा कोणी पार पडला तर त्याला इंग्रजी-पणाचे घुटके पाजून पाजून तद्रूप करण्याचा एवढा प्रयत्न केला जाई की मनात आलें तरी मनाने तेथून मुरडावें. अशाहि स्थितींत सुरेंद्रनाथ बॅनर्जी, रमेशचंद्र दत्त अशी आमच्या भारतांतील तरुण मंडळी आमच्या देशाला नि देशबांधवांना विसरलीं नाहीत हीच समाधानाची गोष्ट होय. आमच्या देशांतून या नाही त्या मिषाने संपत्तीचा पूर आपल्या देशाकडे इंग्रज वाहून नेतात आणि आमचा देश अगदी शुष्क काष्ठासारखा दरिद्री करून पोखरून सोडतात, ही आमची तक्रार आमचे पुढारी दादाभाई नौरोजी यांनी आकड्यांची भरपूर कोष्टकें पुढे मांडून सरकारी अहवालांच्या आधारेंच दाखवून दिली. विल्यम डिग्बीसारख्या न्यायनिष्ठुर ब्रिटिशांचे त्यांस या कामी साहाय्य झालें. दादाभाईनी Poverty and Un-British Rule in India – दारिद्र्य आणि हिंदुस्थानांतील गैर ब्रिटिश कारभार – अशासारखे सडेतोड ग्रंथ प्रसिद्ध केले. ज्याप्रमाणे आयर्लंडचे प्रतिनिधि ब्रिटिश पार्लमेंटात घेण्यांत आले आहेत त्याचप्रमाणे हिंदुस्थानचे प्रतिनिधीहि पार्लमेंटांत घ्यावे असे अर्ज आम्ही दयाळू सरकाराकडे १८५४ सालापासून करीत आलों आहोत. प्रख्यात लोकहितवादी यांच्या 'शतपत्रां 'मध्ये, आम्ही स्वराज्य मिळवू आणि इंग्रजांना आपल्या देशांत परत जा म्हणून सांगू अशा आशयाचे विचार या सनाच्या पूर्वीपासूनहि आलेले आढळतात. मध्यन्तरीं ५७ चें युद्धहि आम्ही खेळलों पण ईश्वराने यश दिलें नाही.

अनुक्रम ३२०५९ दि: ५।१।२०२१
क्रमांक २०२८ नों: दि: २१।२।२२

## कठीण काळ उभा करणारीं दहा वर्षे

म्हणून पुन्हा अर्जविनंत्यांचा मार्ग धरावा लागला. पण वाळू गाळून तेल मिळालें आहे काय ? आणि एवढें वैभवशाली साम्राज्य सुखासुखी कुणी सोडून देईल काय ? अशी आशा व्यर्थ होय; कांही तीव्र उपाय योजले पाहिजेत, अशा प्रकारचे विचार लोकांच्या मनांत डोकावूं लागले. या तीव्र मनोवृत्तीचें पोषण टिळकांनी केलें. रानडे आणि त्यांचे शिष्य गोखलेप्रभृतींनी इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर विश्वास ठेवून आपलें म्हणणें त्यांस पटवून द्यावें आणि इकडे शिक्षणाने, उद्योगाने आणि सुधारणेने आपली योग्यता नि पात्रता वाढवावी असा उपदेश चालूं ठेवला. परंतु इंग्रज हे ठग आहेत; जगाचा इतिहास सांगतो त्यावरून कागदी अर्जविनंत्याना कोणी भीक घालीत नाहीं, चौदावें रत्न दाखविलें पाहिजे, अशा अर्थाचे स्फुट आणि अस्फुट विचार तरुणांच्या मनांत घोळूं लागले होते. अखेर अर्जविनंत्यांच्या पक्षाला ओहोटी लागत चालली. मवाळ म्हणून त्यांचा उपहास होऊं लागला. स्वतंत्र होण्याच्या आकांक्षा लोक बोलूं लागले. बंगालमध्यें आणि महाराष्ट्रामध्यें क्रान्तिकारकांचा पक्ष उदयाला आला. भारताबाहेर इंग्लंडअमेरिकेंतहि तसे प्रयत्न सुरू झाले. तरुण मंडळी बलिदानार्थ तयार झाली. कोणी परदेशाशीं संधान बांधण्याच्या प्रयत्नाला लागले. तेव्हा कायद्याच्या मर्यादेंत राहून लोकजागृति करून कांही परिणाम-कारक उपाय कसे योजावे या विचारमंथनांतून स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय-शिक्षण आणि स्वराज्य अशी चतु:सूत्री जन्मास आली. महाग पडला तरी स्वदेशांत उत्पन्न झालेलाच माल वापरूं, इंग्रजी देशांतील माल घेणार नाहीं, त्याच्यावर बहिष्कार टाकूं. ज्या आपल्या नवशिक्षित लोकांना इंग्रजीपणाचें पाणी पाजण्याचा मतलबी प्रयत्न इंग्रज सरकारनें चालविला आहे, आणि अशा प्रयत्नानें देशांत इंग्रजनिष्ठा वाढीस लावण्याची आशा ते धरीत आहेत ही त्यांची युक्ति आणि आशा उधळून लावावी यासाठी आपलें शिक्षण आपण स्वतंत्रपणें करावें आणि स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांची बीजें तरुण मनांत रुजवावीं आणि इंग्रज सत्तेला टक्कर देण्यासाठीं त्यांना उद्युक्त करावें; या सर्व प्रयत्नांचा समावेश राष्ट्रीय शिक्षण या सदरांत होतो. आणि त्या सर्व उपायांनी आम्ही आमचें स्वराज्य हस्तगत करूं, सत्ता स्थापूं, स्वतंत्र होऊं अशा प्रकारचा कार्यक्रम विविध मार्गांनीं लोकांपुढें मांडण्यांत आला. देशभर सभा, व्याख्यानें, उत्सव, मेळे, संस्था इत्यादिकांचा पाऊस पडला. कित्येक तरुणांनीं बॉम्बगोळे व पिस्तुलें युरोपियन अधिकाऱ्यांवर चालविली. असा हलकल्लोळ उडाला. तेव्हां सरकार पुन्हा खवळलें, पुन्हा दडपशाही सुरू झाली. जुने जुलमी कायदे उकरून काढले. नवे तयार केले. टिळकांवर खटला भरून त्यांना सहा वर्षांची कैदेची शिक्षा फर्मावून ब्रह्मदेशांत मंडाले येथें बंद करून ठेवलें. ही गोष्ट १९०८ साली झाली. १८९८ पेक्षाहि देशापुढे कठीण काळ उभा राहिला. अवघ्या दहा वर्षांत असा चमत्कार घडून आला.

## कुशल नावाड्यानें वादळांतून नाव हाकली

या सर्व कालखंडामध्ये केळकर टिळकांचे मदतनीस म्हणून केसरी-मराठ्यांत लिहिण्याचें काम करीत असत. त्याखेरीज, ते जरी वक्ते नव्हते तरी गणेशोत्सवांत व शिवाजी-उत्सवांत व्याख्यानें देऊन ते याहि कामांत झटले. कारण विद्वत्ता आणि व्यासंग हा तर त्यांच्यापाशीं होताच. त्यांची ज्ञानाची बाजू भक्कम होती. ते हजरजबाबी होते. कोटीबाज आणि विनोदीहि होते. त्यामुळे बोलण्याचा सराव जसा वाढला तसा त्यांच्या भाषणांना रंग भरू लागला आणि ते अधिकाधिक बोलू लागले. तसेंच त्यांचा मराठी लेखनाचा व्यासंगहि चालू होता. या काळांत टिळकांचे 'फॉरिन सेक्रेटरी' म्हणून लोक त्यांना विनोदाने पण यथार्थतेने म्हणत असत. स्थानिक स्वराज्याच्या संस्थांतहि त्यांनी या वेळी टिळकांच्या प्रोत्साहनाने प्रवेश केला. अशी त्यांची प्रगति चालू असतां १९०८ नंतरचे भीषणपर्व सुरू झालें. त्या वेळी 'केसरी' ची धुरा त्यांनी अंगावर घेतली. पुन्हा केळकर-खाडिलकर ही जोडी लोकांसमोर उभी राहिली. 'केसरी' ची धुरा केळकर यांनी अंगावर घेतली आणि एव्हापासून त्यांच्या लेखनांतील चमक अधिकाधिक दिसून येऊ लागली. त्यांचे अनेक साहित्यिक गुण त्यांच्या 'केसरी'-तील लेखनांतून प्रकट झाले. प्रौढ युक्तिवाद आणि सुश्लिष्ट शब्दयोजना, खुबीदार दृष्टान्त आणि मार्मिक मांडणी यांनी नटलेले आणि खचलेले असे केळकरांचे लेख वाचण्यासाठी लोक आतुर होऊन बसलेले आढळूं लागले. 'केसरी' त्या काळांत अधिकाधिक लोकप्रिय झाला. केळकरांचे लिहिणे मर्यादशील असल्यानें सरकारच्या रोषाचें भय त्या मानाने सौम्य झालें. केळकरांनी या काळांत नाट्यछटा वगैरे नवीन प्रकारांना प्रोत्साहन देऊन केसरीच्या द्वारें मराठी साहित्याचा विकास केला. कुशल नावाड्यानें वादळांतून नाव हाकावी त्याप्रमाणे टिळक १९१४ मध्ये परत सुटून आले तेव्हां टिळकांना आपला 'केसरी' सुखरूप असलेला दिसला.

टिळकांच्या मागे नुसतें केसरी चालवून भागवण्यासारखें नव्हतें. राष्ट्राच्या सर्व उठाठेवींत केळकरांना मन घालावें लागे. निवडणुका, परिषदा, सभा, उत्सव वगैरे अनेक गोष्टी टिळकांच्या अभावी त्यानी यथाशक्ति सांभाळल्या. या काळांत त्यांच्या हातून मराठींत कांही चांगली नाटकेंहि लिहून झाली, 'तोतयाचें बंड' हें त्यांचें ऐतिहासिक नाटक एक सर्वोत्कृष्ट कृति म्हणून अद्यापि लोकप्रिय आहे.

## टिळक मंडळांतील केळकरांचें अद्वितियस्थान

१९१४ मध्ये टिळक परत आले. त्या वेळीं महायुद्ध चालू झालें होतें. तरुणांनी लष्करांत शिरावें असा उपदेश, इंग्रज सरकारला मदत होईल हें कळूनहि, टिळकांनी केला; कारण अखेर फौजी शिक्षण आपल्या स्वातंत्र्याला पोषकच होईल असा विश्वास त्यांना पोटांतून वाटत होता. युद्ध फारच पेटलें. जर्मनां-

पुढे इंग्रजांचा टिकाव लागतो किंवा नाही अशी शंका उत्पन्न झाली. अशा वेळी इंग्रजांनी जनतेला आपल्याकडे ओढण्यासाठी नाना तऱ्हेचे उपाय योजले. या वेळींच म. गांधी आफ्रिकेंतून आले होते. १९०८ मध्ये टिळकांना शिक्षा होण्यापूर्वी १९०७ मध्ये टिळकपक्षाला सुरत मुक्कामी काँग्रेसमधून बाहेर जावें लागलें आणि नऊ वर्षांनी १९१६ सालीं लखनौ मुक्कामी गांधी, टिळक, बेझंट, रामस्वामी, हॉर्निमन, सुरेंद्रनाथ, जिना, पटेल, लजपतराय वगैरे सर्व पुढारी एक झाले. परंतु दुर्दैवाने ही एकी टिकली नाही. गांधी यांनी पुढे चंपारण्यामध्ये आपला सत्याग्रहाचा प्रयोग केला. टिळकांनी होमरूल लीगची स्थापना केली, आणि मोठ्या जोराने सर्वत्र दौरे करून स्वराज्याचा प्रसार केला. या कामी तात्यासाहेब केळकर यांचे टिळकांना फारच साहाय्य झालें. मागे सांगितलेंच आहे की, टिळकांच्या पदरी हुकमी इंग्रजी लिहिणारे म्हणजे तात्यासाहेब हे एकटेच होते. आणि स्वराज्यासंबंधीची युक्तिवादपूर्ण साधार कैफियत त्यांस इंग्रजीत तात्रडतोबीने करून पाहिजे होती. हा भार तात्यासाहेबांनी अत्यंत परिश्रमाने उचलून मोठ्या कौशल्याने आणि तडफेने पार पाडला. A Case for Indian Home Rule ही पुस्तिका याची साक्ष देईल.

तात्यासाहेबांच्या या कर्तृत्वामुळे त्यांचा वचक एकदम वाढला आणि त्यांचें सिद्धहस्त इंग्रजी लेखनपटुत्व पुन्हा एकदा निदर्शनास आलें. तात्यासाहेबांची ही जागा भरून काढणारा दुसरा कोणीच टिळक-मंडळांत नव्हता. केसरींत पूर्वी आयर्लंडचा इतिहास, ही लेखमाला त्यांनी लिहिली होती आणि नंतर संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन या विषयावरील लेखमालाहि त्यांनी पूर्ण केली. या दोन्ही लेखमाला त्यांच्या विद्वत्तेची आणि विवेचनशक्तीची उत्तम साक्ष देतात, आणि त्यांचें अनेक विषयांवरील प्रभुत्व प्रस्थापित करतात.

केसरींतील केळकरांचें भरीव लेखन १९०८ नंतरचेंच अधिक आहे. आणि या लेखनांतील गुणवत्ता अगदी शेवटपर्यंत चढती वाढती अशीच अनुभवास येते. केसरींतील त्यांचे हे लेख मोठे घाटदार असून त्यांच्या प्रौढ शैलीचा आनंद वाचकांस मनमुराद लुटण्यास संधि देतात. विषय राजकीय असो वा सामाजिक असो तो सरस व सफाईने लिहिण्यांत तात्यासाहेबांनी असें प्रभुत्व आणि वैशिष्ट्य संपादन केलें होतें की, त्यांच्या लेखांशीं परिचित असणारास लेखावर नांव नसतांनाहि अमुक लेख तात्यासाहेबांचाच असें निश्चयाने सांगतां येत असे.

### कटुता आणि अप्रियता स्वीकारूनहि –

मागे सुचविल्याप्रमाणे म. गांधी या देशांत येऊन तर थडकले होतेच आणि त्यांनी आपलें उत्तर आयुष्य हिंदुस्थानांतच नवजीवन उत्पन्न करून हिंदुस्थानाला स्वतंत्र करण्याच्या कामीं खर्च केलें. टिळकांचा मृत्यु १९२० सालीं झाला आणि त्यानंतर म. गांधी यांनी जसा टिळकांच्या शवाला खांदा दिला

तसेंच राजकारणाचीहि धुरा त्यांनी अंगावर घेतली आणि यशाच्या शिगेला पोचविली.

म. गांधींनी एक जुनेंच तत्त्वज्ञान नवा घाट व उजळा देऊन जगापुढे मांडलें. या तत्त्वज्ञानाचीं बीजें भारतीय तत्त्वज्ञानांत सापडतील. म. गांधींचा सर्व भार सत्य आणि अहिंसा या गोष्टींवर होता. सत्य आणि अहिंसेप्रीत्यर्थ प्राणहि वेचावा अशी त्यांची शिकवण होती. जनतेंत नवा निर्धार निर्माण करून त्यांनी तिची शक्ति अपरिमित वाढविली. सत्य-अहिंसेच्या सामुदायिक उपासनेने स्वराज्य जवळ येईल हा कार्यकारण-भाव इकडील लोकांस चटकन् पटण्यासारखा नव्हता. जुन्या भक्तिमार्गासारखा, लोकांनी आचरण्याला सुलभ आणि सोपासा दिसणारा स्वराज्याचा सर्वसुलभ नवा मार्ग गांधींनी प्रतिपादिला आणि त्याला अनुसरून प्रत्यक्ष आचाराचीहि जोड दिली. या मांडणीला जगाच्या पूर्वीच्या इतिहासांत आधार नव्हता. राजकीय मोक्षाचीं इतिहासपूत दुसरींच साधनें प्रसिद्ध होतीं. जग त्याच मार्गाने आजवर वाटचाल करीत आलें होतें. टिळक असतांना त्यांच्या कर्तृत्वाच्या अंत्य पर्वाच्या वेळीं गांधींच्या भारतांतील कर्तृत्वाच्या पहिल्या पर्वाला प्रारंभ झाला. गांधींनी देखील प्राण पणाला लावण्याची आणि युद्धाची भाषा चालू ठेवली. उपाय मात्र अहिंसेचे. त्याला नांव युद्ध, फल स्वराज्य. स्वतः गांधी मोठ्या आत्मविश्वासाने आणि आग्रहाने पुढारी म्हणून उभे होते.

गांधींच्या या उदयकालीं आणि टिळकांचा अस्त झाल्यावर महाराष्ट्रांत टिळकांचें कार्य पुढें चालविण्याची जबाबदारी टिळकांच्या सर्व लहान लहान सहकाऱ्यांवर पडली. केसरीचे चालक म्हणून तात्यासाहेब केळकर यांच्याकडे पुढारीपण झुकत चाललें. तथापि, टिळकांच्या अनुयायांतील जूट गांधींनी एकदोन हिसके दिल्यानंतर मोडून पडली. आणि गंगाधरराव देशपांडे, शिवराम महादेव परांजपे, कृष्णाजीपंत खाडिलकर आणि पुढे माधवराव अणे हे सर्व कमी अधिक प्रमाणांत गांधींच्या छत्राखालीं गोळा झाले. तळावर राहिले कोण ? तर तात्यासाहेब केळकर आणि म्हटले तर जयकर आणि अर्थात् भोपटकर, मुंजे, जमनादास मेहता प्रभृति इतर मंडळी. यांना घेऊन तात्यासाहेबांनी टिळकपक्ष या नावाने गांधींच्या विलक्षण दिसणाऱ्या अभिनव तत्त्वज्ञानावर आपल्या युक्तिवादानें मर्माघात चालू ठेवले व आपल्या लेखनकौशल्याने विरोधकांनाहि चकीत करून सोडले. तथापि टिळक-मंडळांत तात्या हे सौम्य वर्गांतच मोडत असत. त्यामुळे तेथेंहि त्यांचे कौतुक यथान्याय झालें नाही. हळूहळू महाराष्ट्रांतील भावनाप्रधान तरुण पिढी आणि बहुजन समाज हा गांधींच्या निशाणाखाली गेला, तरीहि तात्यांनी चिकाटी न सोडता कटुता आणि अप्रियता स्वीकारूनहि आपल्या मताला मुरड घातली नाही. आपला प्रामाणिक विरोध चालू ठेवला.

### शेकडो लोकांचे आशीर्वाद संपादले

तात्यांची जातीची वृत्ति विरोधापेक्षां सहकाराची अधिक होती. कोणतेंहि-लोकोपयोगी कार्य घेऊन त्यांच्याकडे जावें, होण्यासारखें साहाय्य ते

आडेवेढे न घेतां करीत. उत्कट, भव्य, ध्येयवादी कल्पनांपेक्षां आणि संन्यस्त आचारापेक्षां व्यावहारिक, सुटसुटीत, गृहस्थीबाणा आणि मांडणी त्यांना अधिक प्रिय असे. तात्यांच्या सहानुभूतीचें क्षेत्रहि विस्तृत होतें. ते म्हणत, “ केसरीचा तवा तयार आहे. कोणीहि यावें आणि आपली भाकरी भाजून घेऊन जावें. ” टिळकांच्या वेळीं आणि केळकरांच्या काळीं केसरीनें आपली जागा देऊन आणि लेखणी झिजवून नानाविध कार्यांना जें प्रसिद्धीचें खतपाणी घातलें त्याची किंमत कशानेंहि होणार नाहीं. या कामांत टिळकमंडळांतील केळकर यांनी जोडलें इतकें पुण्य कोणाच्याहि पदरीं येईल असें वाटत नाहीं. तथापि, साहाय्येच्छु लोक इतकें करूनहि संतुष्ट झाले असें म्हणतां येत नाहीं. त्यांची कुरकुर चालूच असे, आणि मला वाटतें ती कधींहि मिटली नसती. कारण केसरी झाला तरी, आणि त्यानें आपलें दार मोकळें ठेवलें तरी, तारतम्य त्याला कसें सोडतां येईल ? तथापि तात्यासाहेबांच्याइतका जनसंतोष दुसरा कोणी संपादन केला नाहीं. शेकडो लोकांचे आशीर्वाद त्यांनी घेतले आणि एक प्रकारचा विशाल पुण्यसंचय केला.

## संस्थासंचालन आणि गृहस्थी बाणा

संस्था निघाव्या, लोकांनीं संघटित व्हावें आणि कांहींना कांहीं उपयुक्त कार्यें व्हावींत ह्याचा तात्यासाहेबांना फार हव्यास होता. त्यांचें सौजन्य, सहजसुलभता, केसरींतील प्रसिद्धीची मुखत्यारी या सर्व दृष्टींनी विचार करतां आणि विशेषतः त्यांची समन्वयाची वृत्ति या गुणांमुळे त्यांना अनेक संस्थांमध्ये लोकांनीं अध्यक्षपदें दिलीं आणि अगदी मोजून १०० हून अधिक संस्थांचें अध्यक्षपद त्यांनी अंगीकारून प्रत्येक संस्थेची कांहींना कांहीं सेवा केली. त्यांत क्रीडासंस्था होत्या, गायन-संस्था होत्या, कीर्तनसंस्था देखील होत्या. राजकीय तर होत्याच होत्या आणि साहित्य हें तर त्यांच्या घरचें आणि खास आवडीचें होतें; त्यामुळे तशा संस्थाहि होत्याच. शिवाय भारत इतिहास संशोधक मंडळ, भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर अशा संस्थांची कार्याध्यक्षपदाची धुराहि त्यांनी वाहिली. मध्यवर्ति सरकारच्या तत्कालीन विधिमंडळांतहि त्यांनी कामें केलीं. सामाजिक आणि राजकीय कामें तर चालूच होतीं. पुढे पुढे तर डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि शिक्षणप्रसारक मंडळी यांच्या नियामक मंडळांतहि त्यांनी फार लक्षपूर्वक कामें केलीं आणि कधी कधी पदाधिकारीपणहि पत्करलें. शेवटी शेवटी कांहीं दिवस स. प. कॉलेजमध्ये प्रबंध-परीक्षेचे सन्माननीय उच्चाध्यापक म्हणूनहि ते ख्याति पावले. असा त्यांच्या संस्थाबद्ध सार्वजनिक कार्यांचा गजबजलेला पसारा फारच गुंतागुतीचा आणि विस्तृत होता. आणि आपली इतर संपादकार्चीं व लेखनाचीं कामें करूनहि ते एवढा व्याप कसा उरकीत याचा विचार केला म्हणजे त्यांच्या विलक्षण उद्योगप्रियतेचें आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. यांतहि आणखी एक गोष्ट उल्लेख करण्यासारखी आहे. वर सांगितलेंच आहे की त्यांचा बाणा संन्यस्त

नव्हता, गृहस्थी होता, आणि त्याचा त्यांना फार अभिमान असे. आपली सर्व सांसारिक जबाबदारी सद्गृहस्थाला शोभेल अशा पद्धतीने त्यांनी फार लक्षपूर्वक पार पाडली. घरें बांधलीं, घरें सोडलीं; मुलामुलींच्या काकापुतण्यांच्या विषयांचीं कर्तव्येंहि पार पाडलीं. मित्र-कर्तव्येंहि केलीं. या कामीं कसलाहि उणेपणाचा डाग लागूं नये म्हणून ते फारच जपत असत. असा त्यांच्या चरित्राचा एकत्रित विचार केला म्हणजे त्यांच्याविषयीचा पूज्यभाव, आदर आणि प्रेम द्विगुणित झाल्याशिवाय राहत नाहीत—हो, आणखी एक सांगायचें राहिलेंच. तात्यासाहेब हे शिस्तीचे आणि वक्तशीरपणाचे भोक्ते होते, त्यामुळे वेळच्या वेळीं कामें करण्यांत कसूर झाली तर ते अस्वस्थ होत. ठरल्या वेळेच्या पूर्वी ते आपल्या कामासाठी हजर असत. मग हें काम सार्वजनिक असो अगर तें भोजनाचें निमंत्रण असो. भोजनाच्या निमंत्रणावरून आठवण झाली. एवढ्या गडबडींतहि कधीं संध्याकाळीं एखाद्या बैठकीला किंवा नाटकाला हजर राहण्याचें आमंत्रण केलेंच तर तेंहि ते प्रेमाने स्वीकारीत आणि हा सर्व कार्यभाग ते मोठ्या लीलेने आणि सहजपणें पार पाडीत.

## आयुष्याच्या उत्तरार्धांतील दोन कार्यें

तात्यासाहेबांनी अनेक संस्थांचीं कामें केलीं, अध्यक्षपदें भूषविलीं, पदेहि चालविलीं, तथापि त्यांनी आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धांत दोन कामांवर अधिक लक्ष केंद्रित केलें होतें. पैकीं एक म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची स्थापना आणि दुसरें पुणें विद्यापीठाची स्थापना हें होय. या दोन्ही कामांविषयी त्यांना महाराष्ट्रांत पुष्कळच जागृति आणि खटपट करावी लागली. वऱ्हाड निजामाला परत करण्याच्या भुमका उठत असत; त्यामुळेहि या प्रश्नाकडे लक्ष वेधलें जाई. जुन्या काळीं रामुणी अय्यंगार यांनी पूर्वीच्या कौन्सिलांत ह्या प्रश्नाचें सूतोवाच केलें होतें. ‘ तिभंगलेला महाराष्ट्र ’ म्हणून जयपूरचे कै. प्रो. ताम्हनकर यांनी त्या वेळच्या ‘ लोकशिक्षण ’ मासिकांत लेखमाला लिहून लोकांचें लक्ष या विषयाकडे वेधलें. पुढे १९२८ त सर्वपक्षीय परिषदेने हिंदुस्थानच्या लोकशाही घटनेचा जो मसुदा तयार केला किंवा जे निर्णय सादर केले त्यांत भाषावार प्रांतांची आखणी करण्याचा एक स्वतंत्र अध्याय जोडलेला असून भाषावार तत्त्वाला जोराचा पाठिंबा दिला आहे. केसरींतून तात्यासाहेबांनी फार पूर्वीपासून या तत्त्वासाठी अतिशय उद्बोधक लेख लिहिलेले आहेत. त्यामुळे टिळक-मंडळांत हा सिद्धान्त साधारणपणाने ग्राह्य झाल्यासारखाच होता. म. गांधी हे तर या तत्त्वाचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यामुळे काँग्रेसची या तत्त्वाला अनुमति होती; पण प्रथम स्वराज्य हातीं आलें पाहिजे, या साऱ्या नंतरच्या गोष्टी होत असें म्हटलें जाई.

लोकमान्य टिळक यांनी आपल्या काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाचा जो जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यामध्ये भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार केलेला आहे. केसरीने या तत्त्वाचा पूर्वीपासून आतापर्यंत एकनिष्ठेने पुरस्कार केला आहे. १९४० सालीं पुण्यांत संयुक्त महाराष्ट्र सभेच्या वतीने पहिली महाराष्ट्र एकीकरण परिषद् नागपूरचे सुविख्यात

ॲडव्होकेट कै. नानासाहेब केदार यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यांत आली. या परिषदेचें काम श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या संमतीने आणि सल्ल्याने चाललें.

दुसरें महत्त्वाचें कार्य पुणें विद्यापीठ. याचाहि ध्यास तात्यासाहेबांनी फार घेतला होता. विशेषतः डेक्कन कॉलेज बंद करण्याची बाटाघाट चालू असतांना त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर सर फ्रेडरिक साइक्स यांनी डेक्कन कॉलेजचें रूपांतर उच्च संशोधनसंस्थेंत करण्याविषयीची अनुकूलता सुचविली. तो इशारा लक्षांत घेऊन तात्यासाहेबांनी 'महाराष्ट्र विद्यापीठ' स्थापण्याच्या कल्पनेला सरकारची अनुकूलता लाभेल असा कयास बांधून त्या धोरणाने हालचाली केल्या. येथून पुढे अनेक कमिट्या वगैरे होत होत प्रत्यक्ष 'महाराष्ट्र विद्यापीठ' हें 'पुणें विद्यापीठ' या नांवाने कसें स्थापन झालें तो समग्र इतिहास येथें देण्याचें कारण नाही. ह्या कामी तात्यासाहेब अत्यंत जागरूकपणाने व दक्षतेने लक्ष ठेवीत असत आणि हालचाली करीत असत. केसरींतून या विषयाचा पुरस्कार होतच असे आणि बाहेरहि सभांतून, व्याख्यानांतून आणि संस्थांच्या द्वारा या कल्पनेला पाठिंबा मिळविण्यासाठी जे जे प्रयत्न झाले त्या सर्वांमागे तात्यासाहेबांची शक्ति असे. आरंभींच्या काळीं या प्रश्नासंबंधी पुष्कळ खडाजंगी झाली. आता तें सर्व इतिहासजमा झालें आहे. तात्यासाहेब यांनी विद्यापीठ स्थापन व्हावें म्हणून फार परिश्रम केले, जातीने हालचाली केल्या, आक्षेप मोडून काढले, आपल्या वजनाने आणि युक्तिवादाने मागणीचें बल वाढविलें. दुर्दैवाने पुणें विद्यापीठ प्रत्यक्ष स्थापन होऊन वाढीला लागलेलें त्यांनी पाहिले नाही. तथापि त्यांच्या अंत्ययात्रेच्या समयीं अख्ख्या पुणें शहराने हजारोंच्या संख्येने तात्यासाहेबांच्याविषयी जी आपुलकी प्रकट केली तिचें विस्मरण कधीहि होणार नाही. हीच आपुलकी तात्यासाहेबांनी संवर्धित केलेल्या सर्व कार्याविषयी सतत वाढती मिळत राहावी अशी अपेक्षा त्यांच्या या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने प्रकट करणें उचित होईल.

— केसरी दिवाळी अंक १९५८

# २

## कृ. पां. कुलकर्णी

### गाढे भाषा पंडित

* *

आडनांवाचे कुलकर्णी पाहूं गेले तर आपल्या या महाराष्ट्रांत जितकीं गांवें तितके आढळून येतील. बरें 'नाना' म्हटलें तरी त्यांची संख्या कांही कमी मातबर नाही. पण 'भाषापंडित नाना कुलकर्णी' म्हटलें तर ते आज तरी एकच आहेत. ज्या पक्षीं ते शब्दांचीं 'कुळें' शोधण्यांत गर्क असतात त्या पक्षीं त्यांस शब्दांचे कुलकर्णी म्हटल्यास युक्तच दिसेल. हेच इस्लामपुरचे नाना कुलकर्णी या वर्षी अमळनेरास भरणाऱ्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाने अध्यक्ष निवडून आलेले आहेत. निवडणूक आता प्रस्तुत युगाची निशाणीच बनून गेली आहे. मग तींतून विद्वान् तरी कुठले सुटणार? एवढें नोबेल पारितोषिक? पण गांधींना कुठं मिळालें? एवढे टिळक पण कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा उपभोग त्यांनी कधी घेतला? मग आमच्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनांतहि हें निवडणूक प्रकरण शिरलें असल्यास काय नवल? आणि निवडणूक म्हटली म्हणजे सर्वत्र आणि सदाच मनासारखें आणि न्यायाचें होतें असें कोठे घडलें आहे! म्हणून मयूरभक्त पांगारकर साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदीं विराजमान होण्याचा योग आला नाही. 'गीतारहस्य' कर्ते टिळक यांचेंहि तसेंच! नाना कुलकर्णी यांचें नांव धुळें संमेलनाच्या वेळीं फार गाजलें! नानांचे परममित्र आचार्य अत्रे यांनी आपला तोफखाना त्यांच्या बाजूने उभा केला तरी देखील योग आला नाही. तो योग

यंदा आला आणि त्यामुळे नानांची मित्रमंडळीच नव्हे तर सर्व महाराष्ट्र-भाषेचे अभिमानी आणि भक्त यांना आनंद वाटला.

नाना म्हणतात त्यांत तथ्यहि असेल की, 'माझ्या आयुष्यांत योगायोगच फार.' परिस्थिति अशी होती की हे कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी या नांवाने आपल्या सातारा जिल्ह्यांत कोठे तरी मराठी शाळेंतले शिक्षक होऊन राहावयाचे; तथापि योगायोगाने त्यांचे शिक्षण पुढे चालून ते पदवीधर झाले आणि सरकारी शिक्षण खात्यांत संस्कृतचे अध्यापक म्हणून त्यांची नेमणूक अहमदाबाद येथील 'गुजरात कॉलेजां'त झाली. ती जबाबदारी योग्य रीतीने पार पाडण्यासाठी म्हणजे आपणाकडे नेमलेलें अध्यापन सुव्यवस्थितपणें करण्यासाठी त्यांनी प्राचीन नाट्यशास्त्राचा अभ्यास केला आणि तदर्थ संकलित केलेली माहिती अिंग्रजींत अेक छोटासा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. या त्यांच्या ग्रंथावरूनहि त्यांचा व्यासंगी स्वभाव कळून येतो. पुढे शाळा खात्यांत हायस्कूल शिक्षक म्हणून, डेप्युटी म्हणून, त्यांनी पडलीं तीं कामें केलीं !

## पदरमोड करून सेवा

नाना जातीचे व्यासंगी. त्यामुळे धुळे येथे ते शिक्षक असताना, महाराष्ट्रेतिहास संशोधनाचे थोर प्रवर्तन विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांची त्यांची अचानक भेट झाली. धुळ्यास समर्थभक्त देव, चांदोरकर, भट हे त्रिमूर्ति, राजवाड्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाल्याने महाराष्ट्र-काव्य-इतिहास-संशोधनाचें कार्य मोठ्या आस्थेनें करीत असत ! या त्रिवर्गांनी धुळ्यासारख्या दूर गांवीं राहून पदरमोड करून मराठी काव्येतिहास-संशोधनच्या क्षेत्रांत जी बहुमोल सेवा केली तिला महाराष्ट्रांत दुसरीकडे कोठेहि तोड सापडणार नाही. महाराष्ट्रांतील सर्व जिल्ह्यांतून जर अशीं त्रिकूटें राजवाड्यांचा मागोवा घेत उभीं राहतीं तर आज काव्येतिहासंशोधनाचें झालें आहे याहून दसपट कार्य होऊन गेलें असतें. धुळ्यास राजवाड्यांचा दीर्घ विश्राम होत रहावा हें सरळच होतें. अशा धुळे गांवी कृ. पां. कुलकर्णी आणि राजवाडे भेटले. दोघांचाहि सकाळ-संध्याकाळ फिरावयास जाण्याचा परिपाठ असल्याने एका पुलावर हा भेटीचा योगायोग घडून आला आणि राजवाड्यांनी कृष्णाजीपंतांना झपाटलें ! त्या काळीं राजवाडे निरुक्तीच्या क्षेत्राकडे मोठ्या आवेशाने वळले होते. हें निरुक्तिक्षेत्र किचकट, प्रथमदर्शनी बिचकवून टाकणारे, कंटाळवाणें दिसणारें असतांनाहि राजवाड्यांची उत्तुंग प्रतिभा त्यांत प्रसन्नपणें विहरतांना पाहून कुलकर्णी यांनी निरुक्ति-व्यासंगाची दीक्षा उचलली.

निरुक्ति–संशोधनाच्या क्षेत्रांत राजवाडे निदान दोन तपं तरी गढलेले होते. त्यांच्या आयुष्याच्या चरमचरणांत तर त्या व्यासंगांत ते एकाग्र झाले होते. त्यांनी सुपतिङ् विचाराचा एवढा प्रचंड व्याप मांडला होता की शब्दशः हजारो चिठ्या यांच्या निरुक्तिनिर्वचनाच्या त्यांनी तयार करून ठेवल्या. परंतु त्यांवर शेवटचा हात फिरवून त्यांचे प्रसिद्धीकरण होण्याच्या पूर्वींच ते दिवंगत झाले. मग धुळ्याच्या भटप्रभृतींनी या कामी

चंग बांधला आणि हें गुरूचे कार्य शेवटास नेण्याची कामगिरी कृ. पां. कुलकर्णी यांवर सोपविली. ही कठीण कामगिरी कृ. पां. कुलकर्णी यांनी चिकाटीने पार पाडली. आणि राजवाड्यांचा धातुकोश आणि नामकोश हे व्युत्पत्तिकोश धुळ्यास प्रसिद्ध झाले. याच धुळ्यास पुढे महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें अधिवेशन भरलें असतां त्याचें अध्यक्षपद कृ. पां. कुलकर्णी यांस लाभलें नाही याची उपपत्ति नाना कुलकर्णी आपल्या आवडत्या 'योगायोगा'च्या सिद्धान्ताने लावीत असले तर आपणांस त्यावर काय म्हणतां येईल? धुळ्यास हुकलें तें धुळ्यालगतच्या अमळनेरास साध्य होत आहे हाहि 'योगायोग' कोणी म्हटला तरी त्यामुळे वाटणाऱ्या समाधानांत कांहीहि उणीव येत नाही.

राजवाड्यांचे कोश संपादन करीत असता आपण एक स्वतंत्र व्युत्पत्तिकोश रचावा अशी कल्पना कृष्णाजीपंतांच्या मनांत दृढावली. ती सफल होण्याचा योगायोग मुंबई संमेलनाच्या वेळीं इ. स. १९३८ त आला. त्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. मुकुंदराव जयकर यांनी त्या कामासाठी एक सहस्र रुपयांचें पारितोषिक देण्याची घोषणा केली. कृ. पां. कुलकर्णी मग त्या कामास लागले. त्या कामी त्यांनी आपली सर्व शक्ति लावली. सतत पांचसात वर्षें खपून त्यांनी हा आपला व्युत्पत्तिकोश प्रसिद्ध केला. निरुक्तीचा विषयच असा आहे की, त्यावर पंडितांत मतभेद व्हावे. तसे ते तेथेहि झाले. या ग्रंथावर टीकाहि पुष्कळच झाली. तथापि त्यामुळे कृ. पां. कुलकर्णी यांनी एकट्याच्या बळावर एवढें मोठें कार्य सिद्धीस नेलें याबद्दल त्यांस वाजवी धन्यवाद देण्यास कोणी खळखळ करण्याचें कारण नाही.

## पेशवे दप्तराचें संशोधन

पुण्यास मराठशाहीचें दप्तर पेशवेदप्तर या नांवाने इंग्रजी सरकारने आपल्या कामाच्या दृष्टीने रक्षून ठेविलें होतें. कै. न्या. मू. रानडे प्रभृतींच्या वेळेपासून या भांडारांत विद्वानांस कांहीसा प्रवेश मिळाला आणि त्यांतील निवडक साहित्य प्रकाशित व्हावें म्हणून त्यांचे सतत प्रयत्न चालू होते. कांही खंड प्रसिद्धहि झाले होते. परंतु पुष्कळ उपयुक्त सामग्री पडून होती. अखेर या कामीं सर यदुनाथ सरकार आणि रियासतकार गोविंदराव सरदेसाई यांच्या प्रयत्नांस यश आलें. त्या योजनेत सरकार-सरदेसाई यांच्या देखरेखीखाली काम करण्यास कोणी वाकबगार अधिकारी सरकारतर्फे नेमावयाची योजना होती. अखेर विसुभाऊ राजवाड्यांचे शिष्य कृ. पां. कुलकर्णी यांची बदली सरकारने या कामी केली आणि मराठी इतिहासाच्या अध्ययनाला अत्युपयोगी असे लहानमोठे शेहेचाळीस खंड मुंबई सरकारने प्रसिद्ध केले. हे संशोधनाचें आवडीचें कार्य करण्याची अपूर्व संधि अनपेक्षितपणे कृ. पां. कुलकर्णी यांस मिळाली; आणि राजवाड्यांच्या निरुक्ति क्षेत्राप्रमाणेच या कागदपत्री क्षेत्रातहि ते तयार झाले. तरीहि त्यांची प्रीति पूर्वीच्या निरुक्ति-क्षेत्रावरच अधिक स्थिर राहिली.

पुण्यास राहणें होऊ लागलें तेव्हा महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या कार्यात

कृ. पां. कुलकर्णी ओढले गेले! म. सा. परिषदेच्या इतिहासांलें एक क्रांतिपर्व रचिलें जाण्याचा तो काळ होता. त्या काळी कृ. पां. कुलकर्णी आणि ज्ञानकोश-कार्यातले केतकर-शिष्य चिं. ग. कर्वे या जोडीने म. सा. परिषदेच्या पुनर्घटनेच्या कर्मी श्री. ना. गो. चापेकर यांस मनोभावें साहाय्य केलें. नाना वाद, नाना खटपटी या प्रकरणीं घडून आल्या आणि त्यांचे सुखद पर्यवसान होऊन म. सा. परिषद् आपल्या स्वतःच्या मंदिरांत पुण्यास स्थिर झाली! या क्रांतिपर्वांतील विविध घटनांचें अंतरंग वर्णन करावयाचें म्हटलें तर निदानपक्षी जे त्यांत जातीने काम करीत होते त्यांस आपापल्या आयुष्यांतील तो एक मोठा घडामोडीचा काळ होऊन गेल्याच्या अनेक सुखदुःखसंमिश्र स्मृति हृत्पटलावर कायमच्या खोदून ठेवल्यासारख्या आठवूं लागतील. या निमित्ताने कृ. पां. कुलकर्णी यांना जवळून पाहण्याचे आणि त्यांच्याबरोबर नांदण्याचे पुष्कळच प्रसंग आले. या वेळच्या मंडळीनी एकमेकांना गमतीने अनेक टोपणनावेंहि दिली होती. त्यांत कृ. पां. कुलकर्णी यांच्या वाट्याला 'सखाराम बापू' हा किताब आला होता. पूर्वीचा 'नाना' हा घरचा किताब त्यांना होताच आणि त्याच्या जोडीला 'बापू' हा नवा किताब आला. नाना-बापू ही किताबांची जोडी कृ. पां. कुलकर्णी यांना एकसमयावच्छेदेकरून लाभावी हाहि एक योगायोगच नव्हे तर काय? आणि मौज ही की, हे किताब भोगवट्यास दिलेले कृ. पां. कुलकर्णी हे प्रत्यक्ष पूर्वी होऊन गेलेल्या प्रख्यात नाना-बापूंच्या रंगांत पूर्ण रंगलेले होते! कुठे धुळे, कुठे पुणें, कोठले राजवाडे, कोठली निरुक्ति, कोठलें पेशवेदप्तर आणि कोठली साहित्य परिषद्! साराच विलक्षण योगायोग! पण जर विसुभाऊ राजवाडे हे एक सूत्र या सर्व प्रसंगांतून ओवून दिलें तर मग हा योगायोगाचा देखावा साफ पुसून जातो आणि महाराष्ट्रकाव्येतिहासाच्या एका निस्सीम, कष्टाळू आणि मायाळू पंडिताची सावयव मूर्ति आपणांपाशी सहजपणे गुजगोष्टी करूं लागते!

## रंगणाऱ्या बैठकी

या गुजगोष्टींना बहर यावयाला आणखी दोन मूर्ति लागतात. कृ. पां. कुळकर्णी यांचा सातारी कृष्णपिंड, टी. बी. चा शत्रु असल्यानेच ते साहजिकच बी. टी. झाले! याच्या जोडीदार दोन मूर्ति म्हटल्या त्याहि बी. टी. च्याच वर्गांतल्या. कोण म्हणाल तर आमचे विठ्ठलराव घाटे आणि बाबूराव अत्रे! हें त्रिकूट जमलें म्हणजे काव्य काय नि नाटक काय, विनोद काय नि इतिहास काय, व्युत्पत्ति काय नि समीक्षण काय, सारी गर्दी हात जोडून उभी! मग बैठक रंगवायला काय उशीर? तेथे कृ. पां. कुळकर्णी पाहावे – डाव्या हातावर 'पंचम' ठेवलेला आणि त्याला सुधा-रसांत घोळवीत घोळवीत मोठ्या आवेशाने आपलें प्रतिपादन करीत असलेले किंवा तसलाच आवेश जोडीदारांना जरा चढलेला दिसला की 'हो, हो,' करीत ती नशा उतरण्याचे मंत्र शांत स्वराने म्हणत असलेले पाहावयास सांपडतील! पण केव्हा? 'योगायोग' असेल तर!! या त्रिमूर्ति जरा अंगाने प्रशस्तच आहेत. त्यांत आमचे

प्रो. पारसनीस सहज खपून जाण्यासारखे असल्याने असले तरी दिसायचे नाहीत. कृ. पां. कुळकर्णी सकाळीं बाहेर पडले म्हणजे सहज कोस अर्धाकोसाची चक्कर लावून यावयाचे. त्यांच्या परिभ्रमणाचे वर्तुळ जसें विस्तृत तसेंच त्यांचें मित्रमंडळहि विस्तृत. त्यामुळे 'मजालसी'-च्या थाटाला कांही तोटा नाही.

आता कृ. पां. कुळकर्णींच्या घरीं जर गेलांत तर सातारी थाट मुंबईतल्या बांद्रोळी निवासांतहि तुम्ही पाहून घेऊं शकाल. बिचाऱ्यांची पत्नी वारल्यानंतर तो लहानगा 'भैया' आणि ती चिमुकली 'इंदी' यांनी त्यांना मायेने वाढविलेलें ज्यांनी पाहिलें असेल त्यांना कृ. पां. कुल्कर्णी मनाचे किती कोमल आणि सोशिक आहेत तें निराळें वर्णन करून सांगण्याचें कारण पडणार नाही. अशा विधुरावस्थेतहि देवदयेने त्यांचा संसार चांगला भरारला असें म्हणावयास चिंता नाही.

शांत, डुलत डुलत चालतात म्हणून कृ. पां. कुलकर्णींना पाहून तुम्ही एखादेवेळीं फसून जाल. ते बैठका रंगवितात, तसे प्रसंगी व्यासपीठहि दणाणून सोडतात. म. सा. परिषदेच्या छत्राखाली मराठी शुद्धलेखनाच्या ज्या अनेक लढाया कृ. पां. कुळकर्णी यांना लढाव्या लागल्या त्यांतल्या कित्येक प्रसंगांतून त्यांचे धोधाट वक्तृत्व ज्यांनी ऐकिलें असेल त्यांना ही कृष्णाकाठची माती किती चिवट आहे याचा प्रत्यय येऊन गेलेला आहे.

## योगायोगाची परंपरा

इकडे १९२० च्या सुमारास मुंबई विद्यापीठाच्या बी. ए. च्या अभ्यासक्रमांत अनेक वर्षांच्या झगड्याला फळ येऊन मराठीचा समावेश झालेलाच होता. मराठीचें अध्यापन सरकारी कॉलेजांतून त्यामुळें सुरू झालेलें होतें. त्यामुळे असा योगायोग आला की, पुण्याहून कृ. पां. कुल्कर्णी मुंबईस एल्फिन्स्तन महाविद्यालयांत मराठीचे प्राध्यापक म्हणून गेले. ती सरकारी सेवा पूर्ण करून निवृत्त झाल्यावर कृ. पां. कुल्कर्णी यांना आणखी एक 'योगायोग' आला. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या द्वारा एक मराठी संशोधन केंद्र सरकारच्या साहाय्यानें चालू झालें. त्याचें पहिलें संचालकत्व कृ. पां. कुल्कर्णी यांचकडेच आलें होतें. गतवर्षीचे म. सा. संमेलनाचे अध्यक्ष श्री. अ. का. प्रियोळकर सांप्रत तें कार्य पुढे चालवीतच आहेत!

आणखी एक 'योगायोग'— मुंबई जवळील मुलुंड येथील टोपीवाला कॉलेजचे प्रमुख म्हणून कृ. पां. कुल्कर्णी यांस पाचारण करण्यांत आलें! पण तोच 'योगायोग' उलटून त्यांनी कांही काळाने त्या पदाचा त्याग केला!

पण योगायोग त्यांना स्वस्थ कसा बसूं देईल? आता त्याने महाराष्ट्र साहित्य-परिषद यांचें धुराकर्म स्वीकारण्यास्तव त्यांना पाचारण केलें आहे. असा सत्विक, रसिक, पंडित, समीक्षक, 'धन्वतरि' यंदा आपल्या वांट्यास आल्यामुळे आपण निश्चितपणे त्यांच्या हाती सूत्रें सोपविण्यास सिद्ध व्हावें हें उचितच होय!

— सह्याद्रि, आक्टोबर १९५२

अनुक्रम 32055 दि: २१२।७
क्रमांक 2025 नों: दि: २५५५

३

# ग. गो. दिवाकर

## पहिले नाट्यछटाकार

♣ ♣

दिवाकर यांना रोजनिशी ठेवण्याची संवय होती. त्यांचें सर्व लिहिणें आधीं कच्चें करून मग पक्कें करून लिहिणें या पद्धतीचें असें. त्यांच्या कच्च्या रोजनिशा माझ्या पाहण्यांत नाहींत; आणि त्या ते दुसऱ्यास दाखवीत नसत. आपल्या कच्च्या रोजनिशां-वरून इ. स. १९१० ते १९२१ अखेर त्यांच्या दृष्टीने घडलेल्या महत्त्वाच्या बाबींची एक पक्की रोजनिशी त्यांनी स्वतः लिहून काढलेली आहे. सन १९१० ते १९१३ पर्यंतचा मजकूर या रोजनिशींत पहिल्या ३४ पानांत आला आहे. आणि पुढें ६५ पानांच्या अखेरीपर्यंत १९१८ ते १९२१ चा मजकूर आला आहे. ६६ पानापासून ९४ पानाच्या अखेर १९१४ ते १९१६ पर्यंतचा मजकूर पुरा झाला आहे. ९५ व्या पानावर १९१७ ची फेब्रुवारी १० पर्यंतची नोंद पक्की लिहून झालेली आहे. पुढल्या मजकुराचें संकलन पक्क्या रोजनिशींत उतरलें नाही. आपल्या रोजनिशींतील या निवडक उताऱ्यांना दिवाकर यांनी 'चार दोन पानांत' असा मथळा मलपृष्ठावर दिलेला आहे.

या 'चार दोन पानांत' अथवा 'संकलित रोजनिशींत' आपण कोणास भेटलों, कोठे गेलों, काय वाचलें, आणि काय पाहिलें त्यांतील निवडक गोष्टींची नोंद तारीखवार केलेली आहे. त्यातून कांही महत्त्वाची माहिती दिवाकर बंधूंनी प्रसिद्ध केलेल्या नाट्य-छटा, या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत आम्ही दिली आहे. दिवाकर हे पुष्कळ वर्षें आमचे

सहाध्यायी होते. त्यांचे सर्व शिक्षण पुणें येथील 'नूतन मराठी विद्यालय' या नामांकित शाळेंत झालें. भालचंद्र नीलकंठ सहस्त्रबुद्धे, रा. भालचंद्रपंत धडफळे, वगैरे सहाध्यायांशीं त्यांचा विशेष संबंध असे. रा. गंगाधर नीलकंठ ऊर्फ बापूसाहेब सहस्त्रबुद्धे यांच्याशीं त्यांच्या पुष्कळ बैठका होत. सहस्त्रबुद्धे कुटुंबाचें बिऱ्हाड बरींच वर्षें शनिवार पेठेंतील गोवर्धनाचे देवळासमोरील लघाटे यांच्या वाड्यांत असे, आणि तेथेंच दिवाकर यांची पहिली नाट्यछटा लिहून झाली.

## दिवाकरांचे प्रेरक

पुण्यात असतां बरींच वर्षें ते रोज नियमानें कै. प्रो. वासुदेवराव पटवर्धन यांचे घरीं जात असत. पटवर्धन यांच्याबरोबर ब्राउनिंग, शेले व कीट्स यांच्या ग्रंथांचें त्यांनी अध्ययन केलें. डिसेंबर ता. ११ रविवार सन १९१० या दिवशीं प्रो. पटवर्धन यांच्याकडे रा. भा. नी. सहस्त्रबुद्धे (बाळू) यांच्याबरोबर ते गेल्याची नोंद आढळते. कधीं कधीं प्रो. पटवर्धन यांच्या तासास ते कॉलेजमध्ये जाऊन बसत असत. आणि प्रार्थनासमाजाच्या मंदिरांत 'स्टूडन्टस ब्रदरहूड'च्या विद्यमानें १९११ मध्यें होणाऱ्या पटवर्धन यांच्या वर्डसवर्थ वरील व्याख्यानासहि ते हजर असत. याच साली ऑगस्ट महिन्यापासून प्रो. पटवर्धन यांजकडे नियमानें ब्राउनिंग वगैरेचें वाचन केल्याची नोंद दिवाकर यांनी केलेली आढळते. ऑक्टोबर ता २६ बुधवार सन १९२१ या दिवशीं दिवाकरांच्या रोजनिशींत पुढील प्रमाणें नोंद आढळते. 'आजचा दिवस उगवला पण त्याचा शेवट अगदींच विपरीत रीतीनें होणार आहे, याची कांही कल्पना तरी! आज १२ वर्षें होत आलीं, दादांचा –प्रो. वासुदेवराव पटवर्धन यांचा– व माझा ऋणानुबंध. ज्या कांही चार ओळी मी लिहिल्या आहेत त्याला उत्तेजन सर्वथैव त्यांचेंच. ब्राउनिंग, वर्डस्वर्थ व शेले यांच्या काव्याचा अभ्यास बहुतेक त्यांच्याचजवळ माझा झालेला, आणि वाङ्मयविषयक चर्चा ही तर आमची रोजचीच. तसेंच उभयतांच्या ज्या जिवाभावाच्या अडचणी असतील त्यांतून धीर धरून मार्ग काढण्याचें बोलणें हेंच तर आमचें मुख्य अस्तित्व! वास्तविक त्यांच्या-माझ्यांत सर्वतोपरीनें किती तरी अंतर. पण गांठ पडली, बोलायला लागलों कीं अगदीं बरोबरीचे! विशेष हें कीं, रोजचें आमचें संध्याकाळीं तास दोन तास उठणें बसणें पण कधीं म्हणून मनाला लागेल असा शब्दहि त्यांचें तोंडून माझ्या बाबतींत निघाला नाहीं!' (१२ सप्टेंबर १९१३ – दि. रो.) एकदां प्रो. पटवर्धन यांच्या बरोबर दिवाकर हे फर्ग्युसन कॉलेजांतील वसतिगृहांतील गुजराथी व सिंधी मित्रमंडळींत गेले. जेवणाचा वगैरे मोठा बहारीचा कार्यक्रम झाला. चांदण्यांत जवळच्या टेकडीवर रात्रींचे १२ वाजेपर्यंत गप्पागोष्टी झाल्या – त्यांत 'कलापि' वगैरे गुजराथी कवींचीं काव्यें येऊन मोठी बहार झाली. यावरून प्रो. पटवर्धन यांचा दिवाकर यांच्या जीवनावर किती परिणाम झाला होता, त्याची उत्तम प्रचीति येते. पुण्याच्या जुन्या

बाजारांत प्रो. पटवर्धन यांची फेरी असावयाचीच; आणि त्यावेळीं कधीं कधीं दिवाकर हेहि त्यांच्या बरोबर असत. अनेक उत्कृष्ट ग्रंथरत्नांची प्राप्ति कैक जिज्ञासूंना या जुन्या बाजारानें करून दिलेली आहे. असो.

## गडकरी व दिवाकर

गडकरी यांचे उल्लेख दि. रो. मध्ये १९१० पासूनच सांपडतात. त्यांच्या उभयतांच्या नेहमीं बैठका होत, आणि वाङ्मयविषयक चर्चाहि चाले. यावेळीं मधून मधून बालकवि ठोंबरे हेही बैठकींत असत. परस्परांची लिखाणें ते उभयतां एकमेकांस वाचून दाखवीत. अशा बैठकांना नेहमींच अतिशय रंग चढत असे. (सोमवार नोव्हेंबर ता. २ सन १९१४) एकदां दिवाकर यांना गडकरी सिनेमाला घेऊन गेले. दिवाकर येण्याला कां-कूं करताहेत 'असें पाहतांच मास्तर (गडकरी) म्हणाले अहो, पैसे माझे खर्च होतील इतकेंच ना! चला, पुण्यप्रभावाचे आतां मिळावयाचे आहेत ते कोणाच्या बापाचे!' 'उभयतांनीं आर्यन् सिनेमांत चार्ली चापलीनचा सिनेमा पाहिला. गडकरी अगदी पोटभर हसले. परत येताना म्हणाले हें असें मला पाहिजे. ट्रॅजेडीची रड रोजचीच आहे आपली. मला नेहमी Boisterous Laughter आवडतो.'

## दिवाकरांचे आवडते ग्रंथकार

### १. शेक्सपीअर

रोज कांही तरी वाचावयाचें असा दिवाकर यांचा नेम असे. महाकवि शेक्सपीअर यांच्या नाटकांची दिवाकर यांनी कसून पारायणें केली होती. 'हरिभाऊनीं शेक्सपीअर वाचला. ते मोठे झाले, आपणहि कां वाचू नये असें इंग्रजी पहिल्या दुसऱ्या इयत्तेंत आल्यापासून मला वाटूं लागलें. आणि परमेश्वरानें ही माझी गरिबाची इच्छा खरोखरीच पूर्ण केली.' असे उद्गार दिवाकर यांनी पटवर्धन यांजवळ कृतज्ञतेनें काढले (दि. रो. ५ फेब्रुवारी १९१९). सन १९११ सालीं दिवाकर यांचा शेक्सपीअर संपूर्ण वाचून झाला. त्या सालच्या रामनवमीस (एप्रील ता. ७) त्यांनी All's well that ends well हें नाटक वाचून पुरें केलें. 'आज रोजीं शेक्सपीअर संपूर्ण वाचून झाला. जीवाला अतिशय समाधान वाटलें व कृतज्ञतापूर्वक ईश्वरास शरण गेलो.' शेक्सपीअरच्या नाटकांतील कित्येक भूमिका अत्यंत यशस्वीपणानें करणारे महाराष्ट्रांतील प्रसिद्ध नटवर्य कै. गणपतरावजी जोशी यांच्या बिऱ्हाडीं जून १८ सन १९१३ रोजीं मुद्दाम जाऊन दिवाकर यांनीं आपली कृतज्ञता त्यांच्या चरणावर मस्तक ठेऊन पुढीलप्रमाणें व्यक्त केली. 'लहानपणीं आपलीं नाटकें पाहावयास मिळालीं व तेव्हापासून इच्छा ही की शेक्सपीअरचीं नाटकें मुळांतून वाचून व्हावींत. आणि त्याला कारण आपण आहांत. तेव्हां दर्शनार्थ आलों आहें.' रा. गणपतराव प्रसन्नपणानें

हसले. व, १५/२० मिनिटें आपल्या जवळ गादीवर मला बसवून घेतलें !' याप्रमाणें जोशी आणि आपटे यांचा दिवाकरांच्या शेक्सपीअरवरील व्यासंगाबद्दलचा ऋणानुबंध होता.

## २. इब्सेन

१९१३ सालच्या नोंदींत इब्सेनचे ग्रंथ वाचल्याचा उल्लेख आहे. त्याचें 'Ghost' हें नाटक त्यांस 'अतिशय उत्कृष्ट' वाटलें,–आणि त्यावर 'नाटककार मोठा तेजस्वी आणि दणदणीत लेखक दिसतो आहे' असा अभिप्राय नमूद केला आहे. 'Dolls' House' वाचल्यावर 'सारा दिवस भणभणत होतें' असें दिवाकर म्हणतात. आणि सांगतात कीं, 'सारखा शेवटचा प्रयोग डोळ्यासमोर येत होता.' इब्सेनच्या बहुतेक कृति सन १९१३ च्या एप्रील महिन्याच्या ता. १३ ते २३ पर्यंत त्यांनीं वाचून टाकल्या असें दिसतें.

## ३. टॉलस्टॉय

कै. रा. सहकारी कृष्ण हे व दिवाकर सन १९११ सालीं एका ऑफिसांत होते. अर्थात्, त्यांचें बोलणें मधून मधून होत असे. त्यांच्या सांगण्यावरून टॉलस्टॉयचें 'कोसॅक्स' त्यांनीं वाचावयास आणिले पण ७१ पृष्ठेंच वाचलीं. कारण 'कोठे कांही जिवाला पकड बसेना म्हणून तितकेंच ठेवलें' (दि.रो.) पुढें १९१८ त टॉलस्टॉयची 'रिसरेक्शन' ही उत्कृष्ट कादंबरी त्यांनीं वाचून संपविली. सन १९२० मध्ये दिवाकर यांची टॉलस्टॉयवरील भक्ति क्रमाक्रमानें वाढीला लागल्याचें दिसतें. कारण त्यांनीं ऑगस्ट महिन्यांत दुसरीं पुस्तकें वाचण्याचें काम चालू असतांनाहि टॉलस्टॉयची प्रख्यात कादंबरी 'ॲनाकरीनिना' ही ३ रु. खर्चून मुद्दाम विकत घेतली. आणि रोजनिशींत लिहिलें कीं 'केवळ पुस्तक जवळ असणें म्हणजेच केवढा थोरला धीर पण असे जगांतल्या कित्येक पुस्तकाबद्दल वाटत असेल.' सन १९२० च्या डिसेंबरांत टॉलस्टॉयची 'ॲनाकरीनिना' दिवाकरांनी वाचून संपविली आणि ते नेहमीप्रमाणें कृतज्ञता पूर्वक ईश्वरास शरण गेले. टॉलस्टॉयच्या या वाङ्मयसंगतीबद्दल त्यांस फार धन्यता वाटली. सन १९२१ ला डिसेंबर २२ तारखेस दिवाकर लिहितात, 'सकाळीं ७ ते ९॥ पर्यंत टॉलस्टॉयचें वॉर ॲन्ड पीस हें पुस्तक वाचीत बसलो व उपसंहाराचीं १० – ११ व १२ वें अशीं तिन्ही प्रकरणें वाचून ईश्वरकृपेनें हा महाग्रंथ आज समाप्त केला.'

'ता. १ ऑगस्टपासून आज तारखेपर्यंत म्हणजे सहा महिन्यांचा प्रवास आणि तो कोणा बरोबर ? तर प्राणिमात्रांचीं सुखदु:खें, त्यांच्या आकांक्षा यांकडे मोठ्या सदय अंत:करणाने पाहणाऱ्या व गाढ निराशेच्या समयी वरचेवर धीर देणाऱ्या महात्मा काउन्ट टॉलस्टॉय बरोबर ! यापुढें माझ्या आयुष्यांत सुखदु:खे येतील जातील ! पूर्वकर्मानुसार कदाचित् अधोगतीलाहि जाईन. पण टॉलस्टॉयचे ग्रंथ आपल्याला वाचायला मिळाले हे समाधान जीवाला राहीलच.'

'शेले, कीट्स, हार्डी, डॉन्टे, टागोर, शॉ, मेटरलिंक, वेल्स, बायरन, गटे, गॉल्सवर्दी वगैरे अनेक ग्रंथकारांचे ग्रंथ वाचल्याचें दिवाकर यांच्या टिपणावरून दिसते. त्यांत हॉथॉर्न याचें ' Wonder Book and Tangle wood tales 'या पुस्तकाबद्दल दिवाकरांना अत्यंत भक्ति वाटत होती असें दिसतें. ते म्हणतात, 'हा माझा एक आवडता ग्रंथकार आहे. हातांत पुस्तक घेतांच जें कांहीं " मोकळें " वाटलें तें अपूर्वच. या लेखकाच्या गोष्टी व त्यांतील फुलेंमुलें वगैरे सृष्टि किति अद्भुत आणि रमणीय वाटते. वाचायला लागलों कीं, आपण बाल आहोंत, पाळण्यांत अर्धवट निजलों आहोंत, अर्धवट स्वप्नांत आहोंत, कोणीतरी आपणाला झोंके देत आहे, असेंच खरोखर वाटावयाला लागतें. '

## दिवाकर यांच्या नाट्यकृति

सन १९११ सालीं मार्च महिन्यांत दिवाकर यांनी Yorkshire Tragedy या शेक्सपीयरच्या कृतीच्या आधारें ' रंगेल रंगराव ' हें नाटक लिहिण्यास सुरुवात केली. त्याच सालच्या मे महिन्यांत गटेच्या ' फाउस्ट'च्या आधारें ' पंडित विद्याधर ' नांवाचें नाटक लिहिण्यास घेतलें. अवघड काम होतें म्हणून त्यांस शंका वाटत होती. यामुळें या प्रयत्नाविषयीं ' वाजली तर गाजराची पुंगी, नाहींतर खाऊन टाकली ' असा सावधगिरीचा इशारा त्यांनीं लिहून ठेवला आहे. या सालच्या जुलै महिन्यांत २७ तारखेस पंडित विद्याधर नाटकाचा ५ वा अंक पुरा करून त्यांनीं तें संपविलें. आणि ऑगस्टमध्यें ' सुख कीं दुःख ' हें नाटक लिहावयास सुरुवात केली. याच महिन्यांत ' सारेंच विलक्षण ' या कादंबरीचें ६ वें प्रकरण त्यांनीं पटवर्धन यांस वाचून दाखविलें, सप्टेंबर महिन्यांत त्यांनीं ब्राउनिंगच्या धर्तीवर ' महासर्प ' हा नाट्यप्रसंग ( नाट्यछटा ) लिहिला आणि आक्टोबर महिन्यांत ' सुख की दुःख ' हें ५ अंकीं नाटक पुरें केलें. महाकवी शेक्सपीअर, आनंद कोठें आहे येथें, म्हातारा इतुका न, माझेंहि पण मत असेंच आहे, मग तो दिवा कोणता ?, दिव्याभोंवतीं पतंग उडत आहे, अहो अजून गिऱ्हाईकच आलें नाहीं, अहो कुंभार दादा असे कां रडतां ?, तनू त्यागितां कीर्ति मागें उरावीं, काटर्या, तुला आतां अक्कल तरी केव्हां येणार ?, किती रमणीय देखावा हा, चांडाळणी, अशा शुभदिनीं रडूं नकोस, बाळ, या नारळाला धक्का लावूं नकोस बरें, सगळें जग मला दुष्ट नाहीं कां म्हणणार ?, हें सगळें माझ्यामुळें झालें आहे, मुंबईत मजा गमतीची, म्याऊं, म्याऊं, आणि जातीभेद नाहीं कोठें, इतके नाट्यप्रसंग ऑक्टोबर २९ ते डिसेंबर ३० पर्यंत लिहून पुरे झाले. कोकिळाबाई चंद्रकिरणे, कोणी तरी मला सोडवा हो, वर्डस्वर्थचें फुलपाखरूं, स्मशान, काटलेला पतंग, चिंगी महिन्याची झाली नाहीं तोंच, अरेरे ओझ्याखालीं बैल मेला, कोण मेलें तें, रडूं येत नाहीं; शेवटची किंकाळी, जो तो हसतो कां ?, पाण्यांतील बुडबुडे, पंत मेले, राव चढले, सबझूट, पोरटें मुळांवर

आलें, तुफान, शिवी कोणा देऊं नये, एका भटाची आत्महत्या. लग्न कशाला करावयाचें तर, एक घड्याळ दुरुस्त करणारा आणि मेले सगळे फार छान झाले, इतके नाट्यप्रसंग १९१२ सालीं क्रमानें लिहिलेले आहेत. याशिवाय 'निपात्री संवाद' म्हणून एक नवीन लेखनप्रकार सुरू करून ता. १३ मे १९१२ रोजीं 'रिकामी आगपेटी!' हा नमुना पुरा केला. त्याशिवाय शाळेंतील मुलांकरितां एक ५ अंकी नाटक लिहिलें. बापाचें श्राद्ध कसें होईल? मी जर बाईच्या जागीं असतों, कशाला उगीच दुखवा! आंत बाहेर, फ्रान्स,—सैन्य, जोजफीन, ऐकल कां, वेश्या रडत आहे, मादी आहे मादी, बाबा मी येतें गाडींत बसून, एका दृष्टीनें साहाय्यच केलें आहे, असें केल्याशिवाय जगांत भागत नाहीं, कचेरींतून येत असलेला कारकून, भारीच बाई पोर हट्टी आणि रडकें आहे, कल्पना शक्ति, बापाचें हृदय, पण बॅट नाहीं, नासलेलें संत्रें, मृत्यु, ता. ७ नोव्हेंबर, आपल्याला साफ नाहीं खपावयाचें, स्वर्गातील आत्मे, इतक्या नाट्य-छटा सन १९१३ सालीं लिहून झाल्या. याच सालीं यांच्या नाट्यछटांना केसरीच्या द्वारा प्रथम प्रसिद्धि मिळाली. पुढें केशवसुतांचीं हस्तलिखितें मिळवून रा. हरीभाऊ आपटे यांच्यामार्फत त्याची प्रसिद्धि घडवून आणण्याचें कामीं दिवाकर यांस बरीच मेहनत करावी लागली व त्यांतच त्यांचा बराच वेळ गेला, आणि नाट्यछटांच्या निपजाची भर हळूहळू ओसरूं लागली असें दिसतें. शिवाय निपात्री संवाद आणि लहान लहान नाटिका लिहिण्याकडे त्यांचें अधिक लक्ष लागलें. जानेवारी ता. १९ सन १९१४ रोजीं त्यांनीं आपलें सुप्रसिद्ध नाटक 'कारकून' हें लिहिण्यास सुरुवात केली, व दोन बोल लिहिले. या मालेंत स्वताचें स्वतांशींच बोलणें आहे. ता. २६ एप्रील रोजीं १९ बोल लिहून झाले. ता. १३ मेला २३ बोल पुरे झाले. शिवाय ती बिचारी रडतेच आहे, निजलेलें मूल, प्रवासी, आज शाळेला सुट्टी, पाऊस, इतके निपात्री संवाद पुरे केले. 'सगळेच आपण माकडाचे वंशज' हें नाटक रा. दिवाकर यांनीं १९१५ सालीं लिहिलें. घरांतून चालते व्हायचें. कोणी? हेंहि नाटक पुरें केलें. मे महिन्यांत 'आय्. सी. एस.' हें नाटक लिहावयास घेतले व जूनमध्यें संपविलें. 'ऐट करूं नकोस' हेंहि एक अंकीं रचनी नाटक त्यांनीं याच सालीं पुरें केलें. सन १९१६ सालीं 'मी माझ्याशीं' ही लेखनमाला पुढें चालू होती. आणि Anderson च्या तीन गोष्टींचे अनुवाद त्यांना नापसंत वाटून ते रद्द करावे असा अभिप्राय त्यांनीं लिहून ठेवला. 'सोळा आणे उडाली, हें विनोदी प्रहसन त्यांनीं याच सालीं संपविलें. 'आपले सहकारी कृष्ण' हा लेख त्यांनीं १९१७ सालीं लिहिला.

येणें प्रमाणें दिवाकरांच्या लिखाणाबद्दल त्यांच्या रोजनिशीवरून संकलित माहिती येथें दिली आहे.

त्यांच्या वाचनाचा आणि लिखाणाचा परस्पर संबंध शोधण्यास त्यांच्या रोजनिशींतील उभयविध नोंदींचा पुष्कळ उपयोग होईल असें वाटतें. याहून अधिक विस्तार येथें करीत नाही.

## मोबदला

मोबदल्याशिवाय आपलें लिखाण कोठें द्यावयाचें नाही असा दिवाकर यांचा निर्धार होता. 'केसरीत' श्री. केळकरांनी त्यांच्या नाट्यछटा प्रसिद्ध करून त्यांस उत्तेजन दिलें इतकेंच नाही तर त्यांस १० नाट्यछटास ७ रुपये मोबदला दिला. 'मनोरंजन'चे मित्र यांनीं दिवाकरांचें 'कारकून' छापलें त्याबद्दल निदान २० रुपये मिळावे अशी दिवाकरांची अपेक्षा होती. बरीच घासाघीस झाली. १५ ठरले व अखेर १०च हातीं आले.

तात्पर्य मोबदला तरी मिळाला एवढेच समाधान. यावरून त्या काळीं मराठी लेखकांची स्थिति कशा प्रकारची होती याचें अनुमान निघतें.

पगार म्हणावा तर १९०९ सालापासून बरींच वर्षें १५ टिकल्यांवर कांहीच आला नाहीं. १९१४ साली प्रथम १७ रुपये दृष्टीस पडले. आणि १५ साली २० रुपये पगार हाती पडला. या सुखाच्या दिवसांबद्दल दिवाकरांनी परमेश्वराचें स्तवन केलें. नूतन मराठींत आल्यापासून त्यांची स्थिति सुधारत गेली आणि १९१३ ता. १३ एप्रील रोजीं जन्माला आल्यापासून प्रथमच पगाराचे ३० रुपये हातीं पडले. येथून पुढे पगार चढत जाऊन दिवाकर यांस अखेरी अखेरीस दर महा ६५ रुपये पगार मिळूं लागला होता. विस्तारभयास्तव दिवाकर यांजविषयी संकलन आतां येथेंच संपवितों. बहूतेक महत्वाची आणि उपयुक्त माहिती या लेखांत शक्य तों दिवाकर यांच्या शब्दांतच जुळवून मांडली आहे. तिचा दिवाकर – वाङ्मयांच्या अभ्यासकांस उपयोग झाल्यास समाधान वाटेल.

ज्योत्स्ना, ऑगस्ट १९३५

# ४

## प्र. के. अत्रे

### झुंझार पुरुष

♣ ♣

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांचें नांव आज महाराष्ट्रांतल्या खेडोपाड्यांतून आणि कानाकोपऱ्यांतून गर्जत राहिलें आहे ही गोष्ट कोणालाहि कबूल करावी लागेल. आ. अत्रे हे एक विलक्षण कर्तबगारीचे गृहस्थ आहेत. एक लहानसा शाळामास्तर आज एवढ्या प्रख्यातीला पोचला हें मोठ्या पराक्रमाचें फळ म्हटलें पाहिजे. ना धन ना दौलत ना सत्ता ना अधिकार, ना कोणा थोरामोठ्यांचा आश्रय, असें असता अत्रे यांनी ज्या उलाढाली केल्यां आणि जी लोकप्रियता मिळविली ती केवळ त्यांच्या कर्तबगारीमुळेंच यात शंका नाही. आम्ही त्यांचें चरित्र ते उदयास येऊं लागल्यापासून आज चाळीस वर्षें पाहात आहोंत, आणि तें आठवून आमचें मन क्षणभर चकीत झाल्यावांचून राहत नाही म्हणून त्यांना ६१ वें वर्ष लागण्याच्या शुभसमयी त्यांच्या अभिनंदनपर गुणग्रहणात्मक लेख लिहिण्याची केसरीकारांची विनंती स्वीकारतांना आम्हांला एक प्रकारचा आनंद वाटत आहे.

#### *क्षीण नाट्यकलेला नवजीवन*

आचार्य अत्रे यांनी केलेल्या कर्तबगारीची दोन प्रमुख साधनें म्हणजे त्यांची वाणी व लेखणी हीं होत. त्यांतहि प्रथम त्यांनी लेखणी पुढे

सरसावली. वाणीचें बळ त्यामागून दिसलें. लेखणीचा उदय होतांना अत्रे हे 'झेंडूचीं फुलें' हातांत घेऊन आले आणि त्यांतील काव्याचा केशरी रंग आणि उपहासाचा सुरंगासदृश उग्र दर्प लोकाना फार आकर्षक वाटला. त्यांच्या लेखणीतील हे दोन धर्म अद्यापिहि टिकून आहेत. त्यांच्या भाषेची रचना वाचकांना मोह पाडते आणि तींतील शब्दांची धार विरोधकांना कापीत जाते.

काव्याचा बहर ओसरल्यावर अत्रे नाटककार म्हणून पुढे आले; आणि ते अशा वेळी की खंगत चाललेल्या नाट्यकलेला एक जीवनदाता मिळाला असें लोकांस वाटलें. महाराष्ट्रांतील लोकांच्या अंतःकरणांत खोलवर रुतून बसलेली नाट्यप्रीति अत्रे यांच्या नाटकांमुळे पुनः बहरून आली. मुंबईत अलीकडे फार झपाट्याने विलक्षण उत्कर्षाला गेलेल्या बालमोहन विद्यालयाप्रमाणें बालमोहन नाटक मंडळीने पुण्यांत नाटकांचा उदय अत्रे यांच्या नाटकांच्या योगाने साधला.

## मराठीच्या मानाची पताका

आचार्य अत्रे यांनीं नाटकाप्रमाणेच चित्रपट-सृष्टींत हि चाल केली. आणि तेथेहि जेव्हा त्यांच्या भावनेला अगदी आंतून हलवून सोडणारा असा सानेगुरुजींच्या 'श्यामची आई' सारखा विषय मिळाला तेव्हा त्यांनी ज्या स्वाभाविक सुज्ञ प्रवृत्तीचा आणि मातृप्रेमाचा अतुलनीय आविष्कार करून दाखविला त्या वेळी सानेगुरुजी आणि अत्रे यांत कोणी कोणाला जिंकलें असा भ्रम उत्पन्न झाला. क्षणभर सज्जन लोक इतर सर्व गोष्टी विसरून गेले आणि या चित्रपटाच्या सात्त्विक लहरींत परीक्षकहि विरघळून गेले आणि परिणामी राष्ट्रपतिपदकाच्या रूपाने सर्व सद्भाव गोठून अलंकृत झाले. अत्रे याप्रमाणे महद्यशाचे धनी झाले.

या उद्योगांत अत्रे यांनी पैसा खेळवला पण मिळवला नाही. मिळवलें तें हें यश आणि तें त्यांच्या निरंतर कौतुकाचें कारण होऊन बसलें. या चित्रपटउद्योगांत प्रवेश केल्यानंतर पश्चात्तापाचे विचार अत्रे यांच्या मनांत कधी उद्भवले असतील तर या यशश्चंद्राच्या धवल तेजात ते पार विरघळून गेले असले पाहिजेत. आपल्याबरोबर आणि साने गुरुजींच्या बरोबर मराठीच्या मानाची पताकाहि अत्रे यांनी उंचावली यांत शंका नाही.

प्रथम शिक्षक, नंतर कवि, नंतर नाटककार, नंतर दिग्दर्शक अशा कीर्तिमंदिराच्या पायऱ्या अत्रे चढत असतांनाच त्यांनीं पुण्याहून मुंबईस स्थलान्तर केलें आणि चित्र-पटांच्या निर्मितीबरोबर पत्रकार म्हणून 'नवयुगाची' जाणीव मुंबईकरांना ते देऊं लागले. ज्या पुरंदर किल्ल्याच्या परिसरांत अत्रे कुळाचा उदय झाला त्या पुरंदर किल्ल्यावर अत्रे यांनी आपल्या 'नवयुगा'ची पहिली पत्रिका फडकावली. असा त्यांना या परिसराचा जिव्हाळा आहे. आणि कऱ्हेचें पाणी पितांना अजूनहि त्यांना उत्साहाचें भरतें येतें.

## मनाचा निर्मळ कातळ

अत्रे यांचा स्वभाव जात्याच भावनाप्रधान आहे. मनानें एकदा ठरवलें की अत्रे कशाचीहि पर्वा न करता आपल्या मनासारखें घडवून आणण्या. साठी जिवाचें अगदी रान करतात. अत्रे यांच्या स्वभावात बालसहज खिलाडूपणा मुरलेला आहे. त्यांच्या विद्यार्थिदशेपासून लोकमान्य टिळकांची त्यांनी मनापासून पूजा केली आहे. गडकरी हे त्यांचे दुसरें दैवत. त्यांचें मन महाराष्ट्रमय आहे. आणि त्या मनाला सैराबैरा धावण्याची जरी पुष्कळ आवड असली तरी त्यांची महाराष्ट्रनिष्ठा अभंग आणि निश्चल राहिली आहे. साप्ताहिक पत्र चालवणें हा त्यांना नवा अनुभव होता. समोर कोणी तरी झोडपायला असल्याशिवाय त्यांच्या लेखणीला चैन पडत नाही. त्राताराम त्यांना पुष्कळ दिवस पुरला, तथापि त्यांच्या मनाचा कातळ अगदी निर्मळ आहे. त्यांच्या भावनांना मोठा पूर आला म्हणजे त्यामध्ये साचलेला पालापाचोळा, झाड-झाडोरा सारे वाहून येतें. पूर ओसरला म्हणजे निवळ संथ पाणी वाहतांना दिसून येतें. ' मराठी माणसें आणि मराठी मनें ' म्हणून त्यांनी जे बारा नमुने पुढे मांडले आहेत त्यांत त्यांच्या लेखणीची प्रसन्नता, गोडी आणि डौल कुणालाहि पाहून घेतां येईल.

## विसंगतील संगति

कुणावरहि कितीहि कडाडून हल्ला ते करतील, वेळी त्याला लाखोली वाहतील, पण गुणग्रहणाचा समय येईल त्यावेळी त्यांची लेखणी कोणालाहि हार जाणार नाही. संयुक्त महाराष्ट्राचा शब्दसंगर आपल्या झुंझार वृत्तीने अत्रे सांप्रत मराठा दैनिकांतून चालवीत आहेत. त्यांतच जेव्हा एखादा पुरुषोत्तम मंगेश लाड, काळ आपल्यांतून उचलून नेतो, तेव्हा आपलें केवढें श्रेय हरपलें आहे त्याची अत्रे उत्तमोत्तम कल्पना आणून देतात. पण अत्र्यांनी याच लाडावर पुण्यांत ब्राह्मण नाहीत म्हटल्याबद्दल पूर्वी कडाडून समाचार घेतलेला असतो. इथे वरवर पाहतांना मोठी विसंगति वाटते पण त्यांतहि सुसंगतीचा धागा अनुस्यूत आहे, असें जरा अधिक विचार करतांना ध्यानांत येईल.

अत्रे यांना जें प्रिय आहे व पूज्य आहे तें कोणच्याहि रूपाने पुढे आले तर आपल्या प्रतिभाविलासाने अत्रे त्याच्या स्वागताला आणि पूजनाला नेहमीच सिद्ध असतात. त्या पूज्य आणि प्रिय वस्तूला कुणी जरा धक्का लावला तर ते बेभान होऊन आपली सर्व शस्त्रें घेऊन त्यावर धावून जातात. महाराष्ट्राचा अभिमान हा अत्रे यांचा स्थायीभाव आहे आणि महाराष्ट्राचें महाराष्ट्राला मिळालें पाहिजे हा त्यांचा अट्टाहास आहे. याकरिता पडेल तें मोल देण्याला ते तयार आहेत. कुणाच्या रागालोभाची पर्वा ते ठेवीत नाहीत. त्यांच्या शब्दाचें यज्ञकुंड अशा वेळी ते धगधगत ठेवतात. साध्य हातीं आलें म्हणजे ज्या भूतगणाना आणि देवदेवतांना त्यांनी वेळोवेळी इष्टकामना-सिद्ध्यर्थ

आवाहन केले असतें त्यांना स्वस्थानी परत जाण्यास ते आपण होऊनच प्रार्थना करतील यांत कांहीच शंका नाही.

## ' मराठ्या ' चा तोफखाना

आपलें मनोगत सरळ शब्दांत छातीठोकपणें अत्रे पत्रकार म्हणून पुढे मांडीत असतात. ज्यू कांही आपण करतो तें केलें नाही तर मोठा घात होईल अशा आवेशाने ते आपलें युद्ध सर्व वळ एकवटून चालवीत असतात. राजकारणाच्या धकाधकीत शरिल्यापासून आपल्या धप्पिाड शरीराने लाखो श्रोत्यांपुढे उभे राहून ते आपल्या वाणीची फेक करीत वद्यिुत्वेगाने चहूंकडे संचार करीत असतात. इकडे लेखणीची टाकसाळ चालूच असते. पैसा उभा करतां येईल अशी एक बनिहिशेबी पण धाडशी श्रद्धा त्यांना प्रेरणा देत असते. त्या बळावर आज ' दैनकि मराठा ' त्यांनी गावोगाव पोचवला आहे आणि महाराष्ट्राची अभमिानी जनता एकाच्या जागी चार पैसे देऊन आणि चाराच्या जागी चाळीस पैसे देऊन मराठा वकित घेतांना आढळते. अत्रे आता रोटरी यंत्राने मराठ्याची वाढती मागणी पुरी करण्याच्या उद्योगांत आहेत. मराठवाडा आणि वदिर्भ येथे संयुक्त महाराष्ट्राचे यज्ञकुंड अधकि प्रज्वलति करण्यासाठी अत्रे पुढे सरसावले आणि मराठ्याची गर्जना संयुक्त महाराष्ट्राच्या तन्हिी वभिागांतून सतत होत राहील अशी व्यवस्था करून आपल्या तोफखान्याच्या. मार्याने वरिोधकांना आपण सपशेल पराभूत करूं ही अत्रे यांची उमेद सारखी वाढतच -आहे. आज असो कवि उद्या असो, लवकर होवो कवि जरा उशरिा होवो, पण व्यावधि मराठी जनांच्या मनांत खोल रुजलेली संयुक्त महाराष्ट्राची मागणी फलद्रूप झाल्याशवािय अत्रे यांच्या वाणीला नि लेखणीला वरिाम मळिणार नाही हें नश्चिति.

अत्रे यांचा ' मराठा ' कवि त्यांचें नवयुग हयांचा तोंडावळा ' केसरी ' प्रमाणे गंभीर नाही. ' काळा 'प्रमाणे मूषकी मर्माघात करणारा नाही. अच्युतरावांच्या ' संदेशा 'प्रमाणे ववििध ढंगानी नटणारा नाही. पण तरीहि न दमता, न थकता, सतत वर्षाव करणार्या अक्षय्य भात्याप्रमाणे अचूक शरसंधान करणारा आहे. कांही अशी काळ, केसरी आणि संदेश यांचे कांही कांही अंश अत्रे यांच्या लेखणीतून मधून मधून प्रकट होतात. ववििध वृत्तांतील उभालमगीरी चमकहि ते अधून मधून दाखवतिात.

## बांदेकरांची जोड

नातू नीला कवि हार्ट ऑफ इंडीयामधील कॅबेल-कथन हें अत्रे लेखन

दत्तू बांदेकर यांनी कमालीच्या उत्कर्षाला नेला आहे. आणि ही जोड अत्रे यांना मिळाल्यामुळे त्यांचें कार्य बरेंच हलकें झालें. बहुजनसमाजावर परिणाम करण्याच्या दृष्टीने ही गोष्ट उल्लेखण्यासारखी आहे. बांदेकरांच्या लेखणींतील दाहकता, मार्मिकता आणि मारकता कधी कधी फारच विस्मय उत्पन्न करते. आचार्य आता साठीला पोहोचले असले तरी त्यांचा उत्साह अजून तिशीचाच आहे. नव्या नव्या क्षेत्रांचें आक्रमण करण्याकडे तो उसळी घेत आहे आणि संयुक्त महाराष्ट्र स्थापन होईल तेव्हाच त्याच्या आविष्काराचा नवा अवतार घडण्यास अवसर प्राप्त होईल.

केसरी, ऑगस्ट १९५८.

अनुक्रम 3२०५१ वि: २१।२
क्रमांक ....२०२८......... नों: दि: ...२१.२

५

# सर यदुनाथ सरकार

## विख्यात इतिहासकार

सर यदुनाथ सरकार यांच्या मृत्यूने हिंदुस्थानातील एक पहिल्या श्रेणीतील अत्यंत वयोवृद्ध आणि तपोवृद्ध असा इतिहासकार आपल्यांतून गेला याबद्दल भारतांत आणि भारताबाहेर सर्व विद्याप्रेमीजन हळहळल्याशिवाय राहणार नाहीत. यदुबाबू तसे म्हटले तर वयाने पुष्कळच वृद्ध झाले होते. मृत्युसमयीं त्यांचें वय ८७ वर्षांचें होतें. त्यांचा जन्म ता. १० डिसेंबर १८७० सालीं झाला. थोड्याच दिवसांपूर्वी त्यांच्याच पिढींतील आपल्या इकडील एकनिष्ठ रामदासी संशोधक शंकरराव देव हेहि ८७ वर्षांचेच होऊन वारले. दोघांनीहि संशोधनास आरंभ ५०–६० वर्षांपूर्वी केला आणि दोघांनींहि तो व्यासंग दृढतेने आमरण चालविला. श्री. देवांपेक्षा श्री. यदुनाथ यांचा व्यासंग अर्थात् फार व्यापक होता. परंतु देवांना यदुनाथांपेक्षा साहित्य जमविण्यासाठी अधिक कष्ट करावे लागले. हें बोलणें तारतम्याचें आहे. यदुनाथांनी कांही कमी कष्ट केले असे नाही. परंतु आपल्या श्रेष्ठ बुद्धिमत्तेच्या जोरावर मिळविलेल्या साहित्याचा यदुनाथांनी फार उत्कृष्ट परिपाक करून जनतेला ज्ञानदान केलें. कै. देव यांनी यद्यपि आयुष्याच्या अखेरीस त्रिखंडात्मक समर्थचरित्र लिहिलें, तथापि त्यांनी आपलें सर्व बळ साधारणतः संशोधनांत आणि प्रकाशनांतच खर्च केलें. यदुनाथांनीहि साधनें शोधिलीं परंतु त्यांच्या यद्यावत् प्रकाशनावर यदुनाथांनी द्यावें तसें लक्ष दिलें नाही. साधनांचा परिपाक करून साधारण

वाचकालाहि वाचतां येईल अशा रीतीने साधनांतील ज्ञान संकलित करून लोकांस वाढलें. पण यामुळे मूळ साधनें अप्रकाशित राहत आणि तक्रारीचें कारण कायम राही. असा हातचा ठेवणें वादाला प्रोत्साहक होई.

## अर्थशास्त्रावर ग्रंथलेखन

यदुनाथ यांनी कलकत्ता विद्यापीठांत प्रेमचंद रामचंद छात्रवृत्ति मिळवून आपलें नांव काढलें आणि पुढे शिक्षकाचा व्यवसाय पत्करला. ते इंग्रजी, अर्थशास्त्र आणि इतिहास या विषयांचे प्राध्यापक होते. आवाज फार लहान आणि स्वभाव किंचित घुम्या यामुळे त्यांच्या अध्यापनाला उठावाचा भाग कमी असावा. पण विद्वत्ता आणि व्यासंग यांची त्यांची सखोलता केव्हाहि जाणवल्याशिवाय राहत नसे. अर्थशास्त्रावर विद्यार्थ्यांना उपयोगी पडणारें एक पुस्तकहि त्यांनी लिहिलें आणि त्याच्या बऱ्याच आवृत्त्या झाल्या आहेत; त्यावरून तें फार लोकप्रिय असलें पाहिजे. पुस्तकाचें नांव इकॉनॉमिक्स ऑफ ब्रिटिश इंडिया असें असून १९१९ त त्याची चवथी आवृत्ति चालू होती.

## ऋणनिर्देश

मोगल इतिहासाचे सूक्ष्म अभ्यासक म्हणून विल्यम आयर्व्हाईन, आय. सी. एस्. यांचें नांव आदर्श अभ्यासक म्हणून सर्वांना घ्यावें लागेल. आयर्व्हाईन यांची यदुनाथ यांस फार मदत झाली. उत्तर-कालीन मोगल (लेटर मुघल्स्) हें आयर्व्हाईन यांचें अपुरें राहिलेलें काम यदुनाथ यांनी शेवटास नेलें. आयर्व्हाईन फारच उदार वृत्तीचे गृहस्थ होते. आपण मिळविलेलें ज्ञान लोकांसमोर ठेवलें आहे, कधी कोणी पुढे एखाद्या तळटीपेंत आपला उल्लेख केला तरी आपल्या श्रमाचें सार्थक झालें असें आयर्व्हाईनने लिहून ठेवलें आहे. या पंडिताचें ऋण यदुनाथ यांनी मोकळेपणें गायिलें आहे. या देशांतूनच नव्हे तर लंडन, पॅरिस वगैरे परठिकाणाहूनसुद्धा अभ्यासार्थ लागणारीं हस्तलिखितें मिळविण्याच्या कामी आयर्व्हाईन यांनी यदुनाथ यांना फार मदत केली. अशीच मदत श्री. एडवर्ड गेट यांच्याकडूनहि झाली. यदुनाथांचा भर मुख्यतः फारसी साधनांवर होता. रामपूरच्या नबाबांकडून जें मिळत नव्हतें, नुसत्या हुलकावण्याच चालू होत्या तें पुस्तक युरोपियन अधिकाऱ्यांचा दस्या येतांच कातडी पुठ्यांत मढविलेलें सोनेरी अक्षरें घालून साहेबांचेद्वारें यदुनाथांस कसें प्राप्त झालें तें त्यांनी स्वतःच वर्णिलें आहे.

## फारसी साधनांना महत्त्व

हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासासाठी फारसी साधनें अत्यंत उपयुक्त आहेत याविषयीं अगदी संशय नाही; आणि युरोपियन लोकांनी

आपले इतिहास सजवतांना या फारसी साधनांचा मुख्यतः उपयोग केला आहे तें सरळच आहे. इलिएट आणि डौसन यांनी फारसी भाषेतील ऐतिहासिक ग्रंथांतील सारभूत भाग निवडून जे सात मोठाले बहुमोल खंड इंग्रजीमध्ये १८६७ पासून प्रकाशित करण्यास प्रारंभ केला होता त्यांचा हिंदुस्थानच्या इतिहासाचा अभ्यास करणारास अत्यंत उपयोग होतो. फारसी तवारिखा वगैरे साधनें फार महत्त्वाची आहेत यांत शंका नाही. उणीव एवढीच की ऐतिहासिक पुरुषांचीं पत्रें जीं फारसीद्वारा उपलब्ध आहेत तीं इतरांनी करून ठेवलेल्या इन्शाप्रभृति पत्रसंग्रहरूप ग्रंथांच्या द्वारा उपलब्ध झालीं आहेत. प्रमाणांच्या दृष्टीने तीं आज जरी अस्सल प्रमाणेंच मानलीं जातात तरी तीं मूळ नसल्याने अस्सलपणांत त्यांचा कस १०० नंबरी मानतां येत नाही. हीं जीं फारसी साधनांच्या अभ्यासाची परंपरा युरोपियन संशोधकांच्या द्वारा हिंदुस्थानांत चालत आली होती तींत सर यदुनाथ यांनी प्रवेश करून आपल्या परिश्रमाच्या आणि बुद्धीच्या बळावर त्या वर्गातील इतिहासकारांत आणि संशोधकांत आपलें नांव आपल्या कामगिरीने प्रकाशमान करून टाकलें यांत शंका नाही.

## औरंगजेबावर पांच खंड

यदुनाथांचे लक्ष औरंगजेबाच्या चरित्राकडे गेलें. या आपल्या अभ्यासाची टिपणें आणि निबंध ते प्रख्यात रामानंद चतर्जी यांच्या 'मॉडर्न रिव्ह्यू' नावाच्या तत्कालीन एका सर्वश्रेष्ठ इंग्रजी मासिकाच्या द्वारा प्रकट करीत असत. या निबंधाचाच उपयोग त्यांच्या पुढील ग्रंथरचनेस झाला. अहकाम ई–आलामगिरी या ग्रंथाचें इंग्रजी भाषांतर 'अनेकडोट्स् ऑफ औरंगजेब' या नांवाने यदुनाथ यांनी प्रसिद्ध केलें. आपल्या औरंगजेबचरित्राचा पहिला खंड यदुनाथ यांनी १९१२ मध्ये प्रकाशित केला. तेव्हापासून पुढे १२ वर्षें ते आपल्या औरंगजेबाच्या इतिहासाचे खंड प्रसिद्ध करीत होते. या अभ्यासाचें एक तप पूर्ण झालें तेव्हा त्यांनी आपला औरंगजेब इतिहासाचा शेवटचा म्हणजे ५ वा खंड प्रसिद्ध केला. यदुनाथ याचे प्रकाशक एम्. सी. सरकार. अँड-सन्स कलकत्ता हे होत. 'स्टडीज इन मोगल इंडिया' या यदुनाथ यांच्या पुस्तकांत ऐतिहासिक चरित्रें आणि निबंध मिळून २२ प्रकरणें आहेत. यदुनाथ यांनी २० वर्षांपूर्वी म्हणजे १९०४ च्या सुमारास औरंगजेबाच्या इतिहासाच्या अभ्यासास प्रारंभ केल्याचें १९२४ त नमूद केलें आहे. प्रपंच आणि नोकरी संभाळून यदुनाथ यांनी आपला अवाढव्य उद्योग सिद्धीला नेलेला आहे.

## राजवाडेकृत भ्रमनिरास

औरंगजेबाच्या अभ्यासाच्या निमित्ताने यदुनाथ यांना शिवाजीच्या चरित्राचा अभ्यास घडला, आणि छत्रपतींचें चरित्र यदुनाथ यांनीं १९१९ सालीं प्रसिद्ध केलें. शिवाजीची सुटका दिल्लीहून झाली नसून आग्र्याहून झाली ही गोष्ट

यदुनाथ यांनीं फारसी साधनांच्या आधारें प्रथम प्रकट केली. पुढे एका भेटींत सुमारे ( १९१०–११ ) राजवाडे यांनीं यदुनाथ यांना शिवाजीची सुटका आग्र्याहून झाली ही गोष्ट आपण प्रसिद्ध केलेल्या 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' या मालेंतील ८ व्या खंडांत आलेली आहे असें दाखवून दिलें. तो पुण्यास भारत इतिहास संशोधक मंडळांत घडलेला प्रसंग आज अजून आमच्या डोळ्यासमोर उभा राहतो. या प्रसंगीं यदुनाथ यांचा मंडळांत सत्कार झाला आणि त्यांच्या समवेत कै. हरि नारायण आपटे हे होते. 'आनंद'कर्ते कै. वासुदेव गोविंद आपटे हे तर कलकत्ता विद्यापीठाचे पदवीधर होते. त्यांस आणि हरिभाऊ आपटे यांस बंगाली भाषा उत्तम येत असल्यानें यदुनाथ यांजविषयी त्यांस जवळीक वाटत असली तर नवल नाही. याच भेटींत राजवाडे यांनी यदुनाथ यांस इंग्रजींत उपदेश केला की, ज्याप्रमाणे वृद्ध ह्यूमने तरुण गिबनला आपला इतिहास फ्रेंच किंवा लॅटिनमध्ये लिहिण्याच्या मोहाला बळी न पडतां स्वभाषेंत म्हणजे इंग्रजींतच लिहिण्याचा आदेश केला तद्वत् यदुनाथ यांनी आपलें लेखन बंगालींतच करावें. याचेंहि आमचें स्मरण अजून ताजें आहे.

पुण्यास यदुनाथ यांची व आमची पहिली भेट कै. प्रो. हरिभाऊ लिमये यांच्या बंगल्यावर १९१७-१८ च्या सुमारास पडली असावी. तेव्हापासून त्यांचा आमचा पत्रव्यवहार कांही वर्षें चालू होता. त्यांचे 'शिवाजी आणि शिवाजीचा काळ' हे प्रख्यात पुस्तक १९१९ साली प्रसिद्ध झालें. तोंवर त्यांचे औरंगजेबाच्या इतिहासाचे ४ खंड प्रसिद्ध होऊन गेले होते.

## मराठीचा अभ्यास

शिवाजीच्या चरित्राच्या अभ्यासासाठी यदुनाथ यांनी मराठीचा मुद्दाम अभ्यास केला आणि मुद्रित-मराठी ते चांगल्या प्रकारें वाचीत असत. पण त्यांस मोडी मूळ लेख वाचतां येत नसल्यानें एखादा जुना मोडी लेख खरा की खोटा की बनावट या त्यांच्या शेऱ्यांना द्यावयास पाहिजे तेवढें प्रामाण्य देतां येत नाही. या निमित्तानें पुढे त्यांच्याशी निर्भिड झुंज करण्याचा प्रसंग आम्हांवर आला आणि तेव्हांपासून त्यांची मर्जी फिरली. आपले जिव्हाळ्याचे आणि सहकारी मित्र रियासतकार श्री. नानासाहेब सरदेसाई यांच्यासमवेत यदुनाथ यांचा मुक्काम भा. इ. सं. मंडळांत अनेकवार होत असे.

यदुनाथ आपल्या अभ्यासांत फार पक्के होते. फारसी साधनांच्या बरोबर मराठी साधनांचा त्यांनी अभ्यास केला व उपयोग केला. मराठी साधनांत क्वचित् बनावट कागद आढळतात. तेवढ्यावरून आपल्या मनाला येईल ते कागद बनावट असे जाहीर करण्याचा ( प्रमाणें न देतां ) अरेरावी उद्योग यदुनाथ हे करीतच राहिले. हा भाग कसाहि असला तरी आपल्या साधनांचे काल ठरविण्याच्या कामीं यदुनाथ यांनी पुष्कळ मेहनत केली. या किचकट कामांत त्यांचे बरेच हाल झाले. कै. दत्तोपंत आपटे यांच्या-

सारखे ज्योतिषी आणि गणिति यदुनाथ नव्हते. यामुळे त्यांची मराठी साधनांची चिकित्सा पाहिजे तशी बळकट आणि अभेद्य झाली नाही.

मिळतील तीं सर्व साधनें नीट पाहून आपले ग्रंथ शक्य तेवढे निर्दोष आणि संपूर्ण करण्याचें धोरण यदुनाथ यांनी पार पाडलें. इंग्रजीबरोबरच फ्रेंच, डच आणि पोर्तुगीझ साधनांचाहि त्यांनी परामर्श घेतला. दक्षिणेकडे उपलब्ध होणारीं संस्कृत भाषेंत रचलेलीं ऐतिहासिक काव्यें यदुनाथांच्या अवकृपेस पात्र झालीं. त्यामुळेच शिवभारत, किंवा त्याचा कर्ता कवींद्र परमानंद यांच्याविषयी यदुनाथांचें मन प्रसन्न राहिलें नाही. वास्तव त्यांनी या कामीं दिलेले अभिप्राय चुकलेले आहेत. जयपूर अखबारांतच शिवाजीच्या हालचालीचें वृत्त जयपूरकरांच्या सेवकाने पाठविलेलें तारीखवार जयपूरमहाराजांच्या संग्रहांत आढळतें. त्यांत कवीन्द्र परमानंदांचा उल्लेख आहे. यदुनाथांच्याच हाती हे उल्लेख यावे आणि त्यायोगें शिवभारताच्या प्रामाण्याला बळकटी यावी हा विचित्र योगायोग समजला पाहिजे. असो.

## इतर बहुमोल ग्रंथ

औरंगजेबाच्या व शिवाजीच्या चरित्रानंतर यदुनाथ यांनी मोगल वंशाच्या औरंगजेब–उत्तरकालीन इतिहासाला प्रारंभ केला आणि तीन खंडांत 'फॉल ऑफ दी मोगल एंपायर' या नांवाने तो त्यांनी १७८८ पर्यंत आणून सोडला आहे. 'मोगल ॲड्मिनिस्ट्रेशन' हें लहानसेंच पण महत्वाचें पुस्तक १९२० मध्ये त्यांनी प्रसिद्ध केलें. पाटणा युनिव्हर्सिटीमध्ये रीडरशिप लेक्चर्स त्यांनी दिलीं तीं हींच. दस्तुरुल अमालच्या आधारें या ग्रंथांत मोगली कारभाराचा आराखडा देण्यांत आला आहे. प्रख्यात बंगाली साधु चैतन्य यांच्या तीर्थयात्रेचें वर्णन यदुनाथ यांनी इंग्रजींतून प्रसिद्ध केलें आहे. याशिवाय 'स्टडीज इन मराठा हिस्टरी' (हाऊस ऑफ शिवाजी) आणि 'इंडिया ऑफ औरंगजेब – स्टॅटिस्टिक्स, टोपोग्रफी ॲण्ड रोडस्' हीं पुस्तकेंहि त्यांनी प्रसिद्ध केलीं.

## यदुनाथ सरकार 'सर' झाले

आपलें लेखन बिनचूक आणि निर्दोष व्हावें म्हणून कालाप्रमाणे स्थलांचीहि निश्चिति यदुनाथ यांनी सरकारी नकाशांच्या आधारें करून केली. पोर्तुगीज, डच साधनांचाहि त्यांनी उपयोग केलेला आहे. यदुनाथ यांची विद्वत्ता आणि ग्रंथनिष्पत्ति पाहून पूर्वीच्या ब्रिटिश सरकारने त्यांस के. टी. आणि सी. आय. ई. चे हुद्दे देऊन सर यदुनाथ या नांवाने त्यांचा बहुमान केला. रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन संस्थेने यदुनाथ यांस आपले सन्मान्य सदस्यपद दिलें (१९२३). हा मान त्या वेळेपर्यंत हिंदी लोकांस क्वचितच मिळाला होता. लंडनच्या रॉयल हिस्टॉरिकल सोसायटीचे यदुनाथ हे कॉरस्पॉंडिंग मेंबर होते. तसेंच

इटालियन इन्स्टिट्यूट ऑफ मिडल ॲण्ड एक्स्ट्रीम ओरिएंट रोम या संस्थेचेहि ते कॉ. सदस्य होते. डाक्का विद्यापीठाने त्यांस सन्माननीय अशी डी. लिट्. ची पदवी दिलेली होती. १९१९ मध्ये हिंदुस्थान सरकारने इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड्स कमिशन नांवाची फार महत्त्वाची संस्था स्थापन केली. तींत यदुनाथ हे सर्वप्रमुख होते. या संस्थेची सूत्रें जवळ जवळ २० वर्षे त्यांच्याच तंत्राने बहुतांशी चालत असत. ते कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु ( १९२६ ते २८ ) होते. मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीने कॅम्पबेल सुवर्ण पदक देऊन त्यांचा सत्कार केला. बनारसचें हिंदु विद्यापीठ, बिहारमधील पाटणा विद्यापीठ आणि उडियामधील रॅव्हेनेशॉ कॉलेज वगैरे ठिकाणीं यदुनाथ यांनी अध्यापकाचें काम केलें. १९२८ मध्ये त्यांनी मद्रास विद्यापीठांत ‘ मेयर ’ व्याख्यानें दिलीं.

अलीकडे श्री. सरदेसाई यांनी पेशवे दप्तरांतील निवडक साधनांचे जे ४६ खंड प्रसिद्ध केले त्या कामी आणि पुढें मुंबई सरकारच्या संग्रहांतील इंग्रजी वकालतीच्या विभागातील ( रेसिडेन्सी रेकार्ड्स ) निवडक उतारे संपादून प्रसिद्ध करण्याच्या कामीं सरदेसाई यांजबरोबर यदुनाथ यांचें मार्गदर्शन झालें आहे.

### कामशेतच्या तपस्व्यांच्या सहवासांत

अगदी वृद्धापकाळापर्यंत त्यांचा व्यासंग सतत चालू असे. ते एकदा मांडी घालून बसले म्हणजे मान वर न करतां खडा अभ्यास करीत. बंगाली भाषेंतहि ते लिहीत असत. किंबहुना वंगीय साहित्य परिषद या सर्वश्रेष्ठ बंगाली संस्थेचे ते एक प्रमुख सूत्रधार आणि अध्यक्षहि होते. महाराष्ट्रांत कामशेत आणि तळेगाव येथे सरदेसाई यांच्याकडे ते बहुधा प्रतिवर्षी येऊन राहत असत. उभयता सहकारी एकत्र बसून अनेक चर्चा करीत. कामशेत येथे या वृद्ध तपस्व्यांच्या सहवासाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ मिळण्यासाठी पुष्कळ मंडळी जमत असत आणि कधीकधी आपोआपच छोटया मेळाव्याचे स्वरूप कामशेतला दिसून येई. एकदा तर औपचारिक परिषदहि कामशेत येथे भरविण्यांत आली होती.

### महाराष्ट्रीय संशोधकांना श्रद्धांजलि

सरदेसाई यांच्या सत्तरीच्या निमित्ताने जे दोन खंड त्यांस अर्पण करण्यांत आले त्यांत सरदेसाई यांच्या चरित्रकथनाच्या प्रसंगाने यदुनाथ यांनी जें भावदर्शन केले आहे त्यावरून त्यांच्या स्वभावाची बांधणी कशी होती त्याचा उत्तम पुरावा कळून येतो. राजवाडे, खरे, साने, पारसनीस या आमच्याकडील विख्यात संशोधकांसंबंधी यदुनाथ यानी जी श्रद्धांजली वाहिली आहे तीहि वाचण्यालायक आहे. दीर्घ परिचयाने आणि अभ्यासाने श्री. यदुनाथ यांनी महाराष्ट्र, मराठे आणि शिवाजी यांच्याविषयी अत्यंत मननीय असे अभिप्राय प्रकट केले आहेत. महाराष्ट्राचे विशेष

गुण आणि दोष दोन्हीहि यदुनाथ यांनी फार मार्मिकपणें प्रकट केले आहेत. मराठी वाङ्मयाचा दाट परिचय नसल्याने यदुनाथ यांच्या विवेचनांत एकांगीपणा आला असला तरी मराठ्यांच्या इतिहासाच्या कुणाहि अभ्यासकाला यदुनाथांच्या ग्रंथांचा अभ्यास केल्याशिवाय कधीहि चालणार नाही एवढी भरीव कामगिरी त्यांनी करून ठेवली आहे. त्यामुळे महाराष्ट्रांत जोवर मराठी इतिहासाचा अभ्यास होत राहील तोंवर त्यांचे नांव निघाल्याशिवाय राहणार नाही.

## उत्तरभारतांतील संशोधनास मार्गदर्शन

यदुनाथ यांनी अनेक शिष्य तयार केले आणि ते आज अनेक विद्यापीठांतून इतिहासाचे प्रमुख आचार्य म्हणून काम करीत आहेत. अनेक विद्यापीठांतून जें संशोधन, विशेषतः उत्तरेकडे चालू आहे, त्याला यदुनाथ यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन पुष्कळ अंशी कारणीभूत झालेलें आहे. कलकत्ता विद्यापीठाचे नवजनक सर आशुतोष मुकर्जी यांचें व यदुनाथ यांचें कधी पटलें नाही. तरी यदुनाथ यांच्या एकनिष्ठ व्यासंगी कामगिरीचा आदर सर्व वेळीं केला गेला आहे. त्यांनाहि मानाचे ग्रंथ समर्पण करण्यांत आले आहेत. प्रख्यात विद्वान् डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांनी आणि यदुनाथ यांनी मिळून बंगाल प्रांताचा सविस्तर इतिहास निराळाच प्रसिद्ध केला आहे.

यदुनाथ यांचा जन्म खानदान श्रीमंत घराण्यांत झाला होता. श्रीमती कादंबरी चौधरी यांच्याशी त्यांचा विवाह झाला होता. वृद्धापकाळीं त्यांच्यावर कौटुंबिक दुःखाचे फार मोठाले डोंगर कोसळले त्यामुळे ते खचून गेले होते. तरी पण त्यांनी आपला व्यासंग सोडला नाही. ते पुष्कळ वेळेला दार्जिलिंग या थंड हवेच्या ठिकाणीं राहत असत. त्यांचा ग्रंथसंग्रह आणि साधनसंग्रह अत्यंत मोलवान आहे. तो सुरक्षित राहून विद्याभ्यासी लोकांना उपलब्ध होईल अशी व्यवस्था झाली पाहिजे. किंबहुना त्या संग्रहाच्या आधारें भांडारकर संस्थेप्रमाणे एखादी ' यदुनाथ संस्था ' स्थापन झाली तर तें योग्यच होईल.

—केसरी मे १९५८

# ६

## गोपाळराव देशपांडे

## रयतेचे कुलमुखत्यार

♣ ♣

मधून मधून आपल्या कामांतून विसावा घेऊन आपण आपली नजर मागें वळवावी आणि पूर्वी होऊन गेलेल्या घटना स्वच्छ तपासून पहाव्या. असें केल्यानें पुष्कळ लाभ होतात. आपल्याला पुष्कळ माहिती मिळते. जुन्या काळीं झालेल्या कित्येक प्रयत्नांची अभिनवता पाहून मनाला चमत्कार वाटतो. माणसें, कालाच्या ओघांत होऊन गेलेल्या घटना किती लवकर विसरतात तेंहि यावरून लक्षांत येतें. याचा विस्मय वाटतो व दुःखहि होतें. परंतु ज्या वेळीं एखादी जुनी घटना समजून येते, त्या वेळेला कांही अनाहूत असा आनंदहि होतो. अशा एका संशोधनाचें फल येथें देतों.

सुमारें ८०–८५ वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. काँग्रेसचा अद्याप जन्म झाला नव्हता. तो १०–१५ वर्षांनी नंतर झाला. म्हणजे काँग्रेसपूर्व कालांतील हें चरित्र आहे. शिवाय तें आपल्या पुणें जिल्ह्यांतील आहे. त्यांतहि विशेष म्हणजे एक ग्रामीण असें आहे. मग विस्मय आणि आनंद कां वाटूं नये ?

### गोपाळ नरसिंह देशपांडे

सुमार १८३५ या ख्रिस्ती सालामध्यें या गृहस्थांचा जन्म झाला असें दिसतें. हे पुणें जिल्ह्यांतील इंदापूरचे राहणारे. वयाच्या २० वर्षापर्यंत यांनी

हातीं नांगर धरून फक्त शेती केली आणि उत्तम शेतकरी म्हणून नांवाजले. या वयापावेतों गोपाळराव अक्षरशत्रु होते. त्याना लिहितां वाचतां येत नव्हतें. आपल्या इतर शेतकरी बंधूंप्रमाणेंच त्यांचीहि परिस्थिति होती. ते स्वतः वतनदार ब्राह्मण घराण्यांतील होते. तरीहि त्यांना लेखन-वाचनाचा संस्कार घडला नाहीं. मग एका ब्राह्मणाच्या साहाय्यानें ते थोडें लिहिणें-वाचणें शिकले. नंतर त्यांनी सरकारी नोकरी पत्करली.आणि काळीच्या वसुली खात्यांत शिरस्तेदार झाले. त्यांनी पुष्कळ प्रशंसापत्रें मिळविलीं. येणें-प्रमाणें सरकारी नौकरी इमानें इतबारें १५ वर्षें गोपाळरावांनीं केली. त्यांत प्रथम त्यांना ६ रुपयांवरती कर्नल हौटन साहेब जिल्हा सोलापूर यांच्या हाताखालीं कारकुनाची जागा मिळाली. ' माझे वरिष्ठ अंमलदार रावसाहेब मल्हार गोविंद सबनीस होते, ' असें गोपाळराव लिहितात. त्यांस हौटन साहेबानें ताकीद दिली होती कीं, गोपाळला सगळें काम नीट शिकव. त्याप्रमाणें सबनीस यांनी मला शिकविलें आणि माझें काम पाहून अधिकारी संतुष्ट झालें, असेंहि गोपाळराव लिहितात. मग गोपाळरावांस १ वर्षानें १० रुपये पगार चालू झाला. ३ सालांनंतर पगार २० रुपये दरमहा झाला आणि गोपाळराव मिस्त्री झाले. सोलापूर जिल्ह्यांत १२ वर्षें नौकरी झाली. नंतर इ. स. १८७७ त नाशिक जिल्ह्यांत एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर साहेबांचे शिरस्तेदार या हुद्द्यावर त्यांची बदली झाली. शके १७९२ ( १८७० ) या सालीं अक्कलकोटचे सत्पुरुष स्वामी महाराज यांचा अनुग्रह गोपाळरावांवर झाला. नाशिक जिल्ह्यांत ३ वर्षें नौकरी झाली. आणि नाताळच्या सुट्टींत स्वामींचे दर्शनास गोपाळराव गेले. स्वामींनीं गोपाळराव यांस शपथ घालून विचारलें कीं, ' गोपाळ, लोकांच्या भलाईसाठी तनमनधन खर्च करून कांहीं केलें आहेस का? खरें बोल. ' गोपाळराव उत्तरले, ' मीं कांहींहि केलें नाहीं. ' ' महाराज ' म्हणतात, ' स्वधर्माला फार ग्लानि आली आहे. परमेश्वर कोपला आहे म्हणून पाऊस वेळेवर पडत नाहीं. आणि पटकीचा फैलाव होतो, तरी प्रजेच्या कल्याणासाठी तूं चारीधामाच्या यात्रा कर आणि आपला धर्म बळकट राहण्यासाठीं मोठमोठ्या समाजांतून व्याख्यानें देत जा. ' गोपाळरावांनीं हात जोडून प्रार्थना केली कीं, ' महाराज, मला वेदशास्त्र कांहीं येत नाहीं. उगीच थोडें ब्रह्मकर्म येतें, तेव्हां मोठमोठ्या विद्वानांपुढें मी व्याख्यानें कशीं देऊं ? ' स्वामींनीं सांगितलें कीं, ' गोपाळ, तूं विद्वान ब्राह्मण व साधू यांच्याशीं तंटा करीत जाऊं नकोस. नमस्कार करून त्यांची कृपा संपादन करीत जा. आणि मनुष्यजन्माचे सार्थक करण्याविषयीं लोकांना उपदेश कर. ' लगेच सरकारी नौकरीचा बंद तोडून टाकला आणि हळूहळू सार्वजनिक सेवेला गोपाळराव यांनी वाहून घेतलें. नंतर गोपाळराव हे अक्कलकोट सोडून आपल्या भागांत म्हणजे इंदापूर तालुक्यांत आले.

## इंदापुरांतील रयतेची सेवा

इंदापुरांत आल्यानंतर म्युनिसिपालिटीनें भंगीटॅक्स २०८० रुपयांचा बसवला आणि त्याच्या वसुलीसाठी शीरभुजा कर बसविला. आणखीहि

काहीं कर बसविले. रयतेला भार फार झाला. मग गोपाळराव यांनीं रयतेच्या सह्या घेऊन रयतेचे मुख्त्यार म्हणून ३ वर्षेपर्यंत या बाबतींत पुष्कळ अर्ज वगैरे केले. नेक नामदार गव्हंडल (गव्हर्नर) साहेबापर्यंतहि अर्ज भिडविले. परंतु कांहींहि परिणाम होईना. अखेर पांच हजार रयतांच्या सह्या घेऊन कलकत्याच्या वड्या नेक नामदार गव्हर्नराकडे अपील केलें. आणि तें लागू पडून महसूल घेणें माफ केलें. इ. स. १८६७–६८ मध्यें जमिनीच्या दुसऱ्यां पैगाशाची मुदत आली. त्या वेळेला कमिशनर फ्रान्सीसनें आकार दुप्पट तिप्पट वाढविला. १०–१५–२० चे २०–४५–६० केले. गरिबांची दाद कोण घेणार ? ४ वर्षेपर्यंत असा जुलूम चालला. मग खातेदार लोकांनीं गोपाळराव यांचे नांवें ७ रुपयांच्या स्टॅम्पावर कुलमुखत्यारनामा लिहून दिला. ४ वर्षें गोपाळराव यांनी खटपट केली. परंतु दाद लागली नाहीं. अखेर थेट विलायत सरकारपर्यंत तक्रारी नेल्या. नेकनामदार हॅवेलॉकसाहेब बहाद्दर रेव्हिन्यू कमिशनर यांनी रयतेच्या बाजूनें साक्ष दिली. अखेर खटपटीला यश येऊन दरसालच्या रेव्हेन्यू मागणींतून २५ हजार रुपये कमी झाले. परंतु जमिनीवरील कर कांही फार कमी झाला नाही. इतका महसूल घेऊनहि रयतेची स्थिति कांही चांगली नाही. पुष्कळ जमीन रिकामी पडली आहे. १८७८ त सरकारनें फारिष्ट खातें कायम केलें. त्यानें डुकरांचा त्रास वाढला. रयतेजवळ हत्यार नाही; रयत नाउमेद होते म्हणून गोपाळरावांची खटपट कायम धान्याच्या बाजूने होती.

## लवाद कोर्टाची स्थापना

गोपाळरावांचा दुसरा विषय लवाद कोर्टाची स्थापना हा होय. म्हणून इंदापुरास लवाद कोर्टाची स्थापना त्यांनी केली. मग तालुका भिमथडी, तालुका पुरंदर, मग पुणें येथेंहि लवाद कोर्टाची स्थापना केली. त्याप्रमाणें खेड, जुन्नर, शिरूर, पुणें जिल्हा आणि नंतर तालुका करमाळा आणि सोलापूर जिल्हा इतक्या जागीं वर्षभर दौरा करून पंचकोर्टें स्थापन करण्याचा प्रयत्न केला. रयतेचा भांडणखर्च पुष्कळ कमी झाला. सर्व तालुक्यांमध्यें ८-८ रुपयांच्या स्टॅम्पावर रयतेनें गोपाळरावांच्या नांवावर कुलमुख्त्यारनामे लिहून दिले. या कामीं प्रसिद्ध सार्वजनिक काका (रावसाहेब गणेश व्यंकटेश जोशी) यांचें मार्गदर्शन गोपाळरावांस मिळालें.

## दुष्काळांतील कामगिरी

शके १७९७, १७९८ व १८०० (या काळास ७६ चा दुष्काळ म्हणतात) हीं तीन वर्षे जबर दुष्काळाचीं गेलीं. तेव्हां गोपाळरावांनीं फार मोठा दौरा काढला. आणि लोकांच्या बचावासाठीं वर्गणी जमा केली. या दौऱ्यांत गोपाळराव आपल्याबरोबर एक कारकून व एक चपराशी घेऊन हिंडत असत. मराठी, गुजराथी व हिंदी या तीन भाषांत या विषयावर त्यांनीं पुस्तकें लिहून तीं मोठमोठ्या

क्रमांक ...१०७२... नों: दि. ...२।२।६२...

लोकांस आपल्या टपाल खर्चानें पाठविलीं. अनेक मोठमोठ्यांच्या भेटी घेतल्या. गोपाळराव गुजराथ-काठेवाडपर्यंत दौरा करून आले. दौऱ्यांत गोळा होणारी वर्गणी इंदापूर सार्वजनिक सभेकडे पाठविण्याची योजना केली. पुढें डेक्कन खानदेश फॅमिन कमिटीचे प्रेसिडेंट नेक नामदार उटसावबहाद्दूर यांचेकडे अर्ज दिला आणि छापील तिन्ही पुस्तकें दिलीं. भाटिया कमिटीचे ऑनरेबल सेक्रेटरी मुरारजी गोकुळदास या दयाळू पुरुषानें इंदापूर सभेचे खजांची रावसाहेब रंगो सखाराम नाईक दुखाने यांजकडे पांच हजार रुपयांची रक्कम रवाना केली. गोपाळरावांनी मोरवी, झालावाड वगैरे वगैरे संस्थानांच्या दरबारांत जाऊन भाषणें केलीं. एकंदर अठरा हजार रुपयांचा फंड त्यांनीं जमा केला. मोफत अन्नछत्र अडीच वर्षें सहा ठिकाणीं चालविलें. असा रयतेचा बचाव केला.

## गुलबुर्ग्याचें प्रकरण

इतक्यांत शके १८०२ (इ.स. १८८०) मध्यें हैद्राबाद संस्थानांतील गुलबुर्गा येथें एक विचित्र घटना घडली. या गांवीं बाळाबोवा नांवाचा एक हिंदु संन्यासी समाधिस्थ झाला. त्याची समाधि तेथील देवळाच्या आवारांतच बांधली. तो बाळाबोवा समाधिस्थ झाल्यावर ४० व्या दिवशीं (श्रावण शुद्ध द्वादशी शके १८०२) पांच हजार मुसलमान लोक एकत्र झाले आणि त्यांनीं राम, विठ्ठल आणि हनुमान यांची मंदिरें आणि बाळाबोवाची समाधि पार उद्ध्वस्त केली. बाळबोवानी वीस हजार रुपयांची भिक्षा करून ही मंदिरें बांधलीं होतीं आणि मंदिराच्या आवाराच्या आंतच त्यांची समाधि होती. सामेज्य समधी मुसलमानांनी उरकली. त्याचें शव बाहेर काढलें आणि एक गाय आणून ती कापली व गोमांसाचा एक तुकडा प्रेतभूत बाळाबोवाच्या तोंडात घातला. त्या तोंडावर लघवी केली, नंतर त्याचे धड शिरापासून वेगळें केलें आणि प्रेत रस्त्यावर फेकून दिलें. बाळाबोवांची स्त्री बाळाबोवा समाधिस्थ झाले तेव्हा केशवपन वगैरे करून दुःखांत होती. तिला पकडून तिच्या समक्ष प्रेताची विटंबना केली. तिच्या तोंडातहि गोमांस जबरीनें घालण्याचा प्रयत्न केला आणि तिचें शिर उडविण्याच्या तजविजींत असतां वृद्ध मंडळींनी हें काम थांबवलें. पोलिसांनी कसलीहि मदत केली नाही. शेवटी हिंदु पुढारी एकत्र होऊन त्यांनी राजमुख्त्यार सर सालारजंग आणि ब्रिटिश रेसिडेंट नामदार माटसाहेब आणि कलकत्त्याचे बडे लाट या सर्वांकडे तारा पाठविल्या. पांच हजार हिंदु एकत्र झाले. मुसलमानांवर हल्ला करण्याची तयारी केली. या वेळीं गुलबुर्ग्याचे देसाई देवराव पांडुरंग यांनी लोकांची समजूत केली. इतक्यात मुख्यत्यार उलमुख सर सालारजंग यांनी पाठविलेले दोन हजार स्वार आणि २ फलटणी येऊन गुलबर्ग्यास पोंहोचल्या. यामुळें खून खराबी बहुत झाली नाही. आठ महिने फौजेचा तळ पडला. चौकशीसाठीं कमिशन नेमण्यात आलें. प्रथम हिंदुलोकांनी पुण्याचे रावसाहेब नारायण जगन्नाथ भिडे यांना रोजी शंभर रुपायांवरती आपल्या-

तर्फे हजर केलें. परंतु कमिशनचे अध्यक्ष मौलवी यांनी भिडे यांस 'फारसी येतें काय ?' असें विचारलें. त्यांनी 'नाही' म्हणतांच, 'आपला येथें उपयोग नाहीं' असें सांगितलें. आणि भिडे यांना परत जावें लागलें. पुन्हां हिंदूंनी प्रयत्न केला. कलकत्त्यास तक्रार केली आणि सोलापूरचे दिनकर वल्लाळ चक्रदेव यांस आपल्यातर्फे वकील नेमलें. चक्रदेवांनाहि भिड्याप्रमाणेंच हात हालवीत परत यावें लागलें. त्यांनी गोपाळरावांना सोलापुराहून हकीकत कळविली. गोपाळरावांनी सोलापुरास दिनकररावांची भेट घेऊन सर्व माहिती करून घेतली आणि स्वतः गुलबुर्ग्यात दाखल झाले. येतांच त्यांनी सदर तालुकदार इमायुतुल्ला यांची भेट घेतली आणि आपल्याजवळील सर्व मुख्त्यारनामे वगैरे दाखले दाखविले. करारनाम्यावर हिंदूंबरोबरच मुसलमानांच्या सह्या होत्या, त्या पाहून मौलवी साहेबांनी गोपाळरावांना कुलमुख्त्यार मंजूर केलें. मग अव्वल तालुकदारसाहेब आणि सदर तालुकदारसाहेब यांच्या सल्ल्यावरून श्रीमान् देवराम देसाई यांच्या दिवाण-खान्यात हिंदु-मुसल्मान यांची सभा बोलाविली. या सभेपुढें गोपाळरावांनी तीन तास भाषण केलें. त्यामुळें शांतीला मदत झाली. ही हकीकत तालुकदारानें सालारजंग यांस कळविली. सालारजंग खूष होऊन त्यांनी गोपाळरावांच्या बाबत तार पाठविली. आणि त्यांस ताबडतोब हुजूरभेटीस पाठविण्याविषयी लिहिलें. हैद्राबादेस यज्ञेश्वर बाळकृष्ण उर्फ भाऊसाहेब दीक्षित, पाटणकर जहागिरदार, कायगांवटोके यांची स्वारी हैद्राबादेस होती. त्यांचे बंधु आप्पासाहेब हेहि बरोबर होते. हे पेशव्यांचे गुरू घराणें. यांनी दुष्काळांत अन्नछत्र चालविलें होते. त्यांना सर्व हकीकत निवेदन करून त्यांच्या सल्ल्यानें सालारजंग यांच्या दिवाणाची गाठ घेतली व त्यांची खात्री पटवली. परिणाम हा झाला कीं सालारजंग यांनी तालुकदाराकडे हुकूम पाठवून खजिन्यांतून वीस हजारांची रक्कम आदा केली. आणि उद्ध्वस्त केलेली बाळाबोवाची समाधि आणि मंदिरें परत पूर्वी-प्रमाणें बांधून देण्याचा हुकूम झाला. अधिकारी लोकांना फार संतोष वाटला. पाटण-करांकडे गोपाळराव दीड महिना राहिले. नंतर रायचूर वनपरती वगैरेकडे दौरा करून व्याख्यानें दिलीं. १८०३ च्या चैत्री पाडव्याला ते घरीं आले.

## बडोदे महाराजांकडून प्रशंसा

लगेच दौऱ्यावर निघून पुणें, सोलापूर, मुंबई वगैरे ठिकाणीं व्याख्यानें केलीं. आणि तेथून गोपाळराव बडोद्यास गेले. सयाजीराव महाराज यांना कुलमुखत्यारी देण्याचा दरबार नजर बागवाड्यांत झाला (२८ डिसेंबर १८८१), त्यास गोपाळराव हजर होते. तेथें मोठमोठे सरदार रयत मिळून महाराजांसमोर गोपाळरावांनी व्याख्यान दिलें. तें व्याख्यान ऐकून दिवाण, राजा सर टी. माधवराव फार खूष झाले. ते उठून गोपाळरावांचा हात पकडून त्यांना भेटले. आणि आपल्या पांढऱ्या मिशांना हात लावून त्यांना म्हणाले, 'त्रावणकोर, इंदूर आणि बडोदें मिळून अनेक वर्षे कारभार केला. परंतु तुमच्यासारखे सुंदर भाषण करणारा कोणी पाहिला नाही.' आणखी पुष्कळ

स्तुती केली. महाराजहि खूष झाले असें दिसलें. ता. ५–२–१८८२ रोजीं दरबारांत महाराजांसमोर पुन्हां गोपाळरावांचें भाषण झालें. 'मुलखाची दौलत बाहेर जातां कामा नये म्हणून कापडाच्या तीन गिरण्या बडोदें राज्यांत स्थापन झाल्या पाहिजेत, तसेंच लोखंडाचा कारखाना काढला पाहिजे. फार जिकडे तिकडे बिनपेरी जमीन पडली आहे. जमिनीची मशागत करण्यासाठीं लागणारीं हत्यारें इकडे तयार करावींत म्हणजे बाहेर जाणारा पैसा वांचेल. त्याप्रमाणें ताबडतोब शराबबंदी करावी आणि दारूच्या ऐवजी रयतेला दूध पिण्याची संवय लावावी. खंडेराव माधवराव यांच्या वेळीं लोक दारू पीत नव्हते. दारू पिणाऱ्यास महाराज फटके मारीत. हल्लीं मोठमोठे अंमलदार, जहागिरदार सगळे दारू पिऊं लागले आहेत. दारू पिणाऱ्या लोकांना हाकलून द्यावे व दारूबाजाला सक्त मजुरीची शिक्षा द्यावी' आशा आशयाचें भाषण गोपाळरावांनीं अडीच तासांपर्यंत तीन हजार लोकांसमक्ष केलें. तेव्हां सरकार सयाजी महाराज फार खूष झाले. नंतर गोपाळरावांनीं गांवांत सहा ठिकाणीं अशाच आशयाचीं भाषणें केलीं. तेथून पुढें अहमदाबादेस आठ व नौसारींत चार व्याख्यानें देऊन मुंबई-पुण्यावरून रयतेचे कुलमुखत्यार गोपाळराव हे वैशाख शु.१४ शके १८०४ रोजीं इंदापुरांत दाखल झाले. श्रावणांत पुन्हा दौऱ्यावर निघाले. नगर, मनमाड, जळगांव, भुसावळ, खांडवा, धार, देवास, रतलाम, रामपूरा, भामपुरा, उज्जैन अशा ५।२५ ठिकाणीं अनेक दरबारांतून राजनीतीसंबंधानें आणि देशाच्या फायद्यासंबंधानें मागें दिलेल्या मुद्द्यावर भाषणें दिलीं. रयतेसाठीं जाहीर भाषणें केलीं. दुर्दैवानें जावयाचे नबाब आणि देवासचे महाराज यांनीं रयतेला हा लाभ होऊं दिला नाही. उज्जैनीहून गोपाळराव इंदुरला आले. ते माघांत पुन्हां दौऱ्यावर निघाले. त्या वेळीं कोल्हापूरच्या आसपासच जास्त दौरा केला आणि नंतर बेळगांव, शहापूर, चिकोडी, कुरुंदवाड अशा कांहीं गांवीं जाऊन जहागिरदार इनामदारांच्या गांठी घेतल्या. तेथें दाखलापत्रें मिळालीं तीं घेऊन भाद्रपद वद्य १३ शके १८०६ रोजीं इंदापुरांत दाखल झाले.

## शंभर ताव माहिती

१८६७-६८ च्या महसूल फेरतपासणीच्या वेळीं जीं पत्रकें गोपाळरावांनी तयार केलीं होतीं त्यांत इंदापूर तालुक्यांतील प्रत्येक खेड्याची पहाणी करून तपशीलवार हकीगत, कोष्टकें पाडून नमूद केली होती आणि आंकडेवारीनें दाखवून दिलें होतें कीं, रयतेला कर सोसत नाहीं. १८७२ सालीं मरहूम दादाभाई-नौरोजी यांनीं एक पत्रक पाठवून माहिती मागविली होती. गोपाळरावांनीं दोन महिन्यांच्या आंत दादाभाईसाठीं शंभर ताव भरतील एवढी माहिती सार्वजनिक सभेच्याद्वारें पाठविली.

इंदापुरांत पूर्वीं जें पाणी पिण्याचें तळें होतें, त्यांतलें पाणी दुर्लक्षामुळें सर्व आटत चाललें होतें आणि गांवाला पाणी पिण्याची फारच गैरसोय होत होती.

गोपाळरावांनी नेहमींप्रमाणें मुंबई, कलकत्ता इकडे अर्ज पाठविले. अखेर म्युनिसिपालिटीला ३२५० रुपये खर्चविण्यास लावून गाळ काढून पाणी पिण्याचें तळें दुरुस्त करून घेतलें. तळ्याची जमीन बनवून एकानें आक्रमण केलें होतें तेंहि अर्थातच गोपाळरावांनी सोडविलें. धाशी बंगला नांवाचा एक बंगला रयतेनें बांधला होता. १८७१–७२ सालीं सरकारनें तो पाडून टाकण्याचा हुकूम केला. सरकारशीं झगडा करून गोपाळरावांनी तो बंगला सार्वजनिक चावडी म्हणून कायम करून घेतला.

गोपाळरावांना जागजागीं मानपत्रें मिळालीं आहेत. इंदापूरकरांनीं ता. २९–५–१८७५ रोजीं मानपत्र दिलें. त्यावर चार हजार वीस नागरिकांच्या सह्या आहेत. त्यांत सर्व वर्गांचे लोक आहेत. लोक त्यांना प्रेमानें रावसाहेब म्हणूं लागले. गोपाळरावांनीं आपल्या सभेसाठीं स्वतंत्र मुद्रा करून घेतली होती. आणि त्याच धर्तीवर त्यांनीं स्थापलेल्या इतर संस्थांनी मुद्रा केल्या होत्या. लोकांना सदुपदेश करण्याविषयीं द्वारका मठाचे शंकराचार्य यांचें एक आज्ञापत्रकहि गोपाळरावांना मिळालें होतें. ( ता. ८–११–७७ ) श्रीनीं त्यांना धर्माधिकारी अशी पदवी दिली. लोकांनीहि त्यांना खरोखरच शेला-पागोटें अर्पण केलें. काठेवाडांतून माणिकवाडा येथून मिळालेलें मानपत्र कवितेंत आहे. खेडचें मानपत्र तरुण विद्यार्थ्यांनी दिलें आहे. त्यांतील मुख्य सही करणारा विद्यार्थी गणेश गोविंद सहस्रबुद्धे या नांवाचा असून त्याचें वय अकरा वर्षांचें आहे. मध्यें मध्यें श्लोक आणि आर्या घालून या मुलानें हें मानपत्र दोन-तीन तासांत तयार केलें. या मुलाची बुद्धिमत्ता पाहून गोपाळराव थक्क झाले. या सभेचें नांव बालानंदसभा होतें. त्यावर १३२ विद्यार्थ्यांच्या सह्या आहेत. मानपत्रावर १४–३–७६ अशी तारीख आहे. या मानपत्रांत नवीन इंग्लिश शिकणाऱ्यांवर खूप टीका आहे. त्यांचीं पोकळ व्याख्यानें आणि वर्तमानपत्री प्रचार आणि दुबळी शरीरें यांवर झोड केली आहे. गोपाळराव एका दमांत तीन तीन तासपर्यंत भाषणें करतात तर या नवीन इंग्रजी शिकलेल्याला १०-१५ मिनिटेंहि बोलवत नाही. आणि त्यांचीं मतें काय ? म्युनिसिपालिटी स्थापन करा, घरपट्टी बसवा, गांवांचे जुने तट व दरवाजे पाडून टाका, वगैरे. मानपत्र लिहिणारे विचारतात, लोक फक्त खुर्च्यांवर बसणाऱ्या १०-२० लोकांसमोर बोलणार. खुर्च्या-टेबलें सोडून आमच्यासारख्या विद्यार्थ्यांपुढें एक हजार शब्दांचें भाषण हे करूं शकतील काय ? उलट गोपाळराव व्याख्यानापूर्वी जमिनीला हात जोडून नमस्कार करतात. अर्थात् गोपाळराव हे स्त्री-पुरुषांनी नाटकांत काम करण्याच्या विरुद्ध होते. नाटक आणि तमाशा करूं नका, अशी गोपाळरावांची मनीषा असे. नाटकानें विद्यार्थी, बायका बिघडतात, असें ते म्हणत. नाटकें पाहाण्याऐवजीं ते तरुण विद्यार्थ्यांना आखाड्यांत जाण्यास सांगत, सूर्यनमस्कार, लाठी, बोथाटी करण्यास सांगत. इतकेंच काय पण बंदुकीचा नेम मारण्यास शिकण्याविषयीं आग्रह करीत. तरुण मुलांना गोपाळरावांचा असा उपदेश असे कीं, त्यांनीं निदान २० वर्षांपर्यंत लग्न करू नये. मुलींच्या संबंधांत मात्र ते १० वर्षांपर्यंत मर्यादा नेण्यास अनुकूल नव्हते. ऐक्य-

वर्धिनी न्यायसभा अशा प्रकारचीं नांवें त्यांच्या सभेला दिलेलीं आहेत. लोक वैदिक धर्मापासून दूर जात आहेत, प्रार्थना-समाज व ब्राह्म समाजासारखे समाज काढीत आहेत याबद्दल गोपाळरावांनी खेद प्रगट केला. यामुळें लक्ष्मी व सरस्वती पश्चिमेकडे जाऊन बसली आहे असें ते म्हणत. आज-कालचे ब्राह्मण संध्या करीत नाहीत. त्यांना वेद म्हणतां येत नाहीत, उलट पक्षीं खोटे कागदपत्र करणें, खोट्या साक्षी देणें, पेवांना आगी लावणें अशा प्रकारचे दुष्ट उद्योग पुष्कळ ब्राह्मण करीत आहेत, याबद्दल गोपाळरावांनी दुःख केलें आहे. कित्येक ब्राह्मण तर गाईच्या कसाइखान्याचे एजंट म्हणून काम करीत आहेत ही गोष्ट गोपाळरावांनीं स्पष्ट मांडली आहे. स्वामी दयानंद यांच्याविरुद्ध त्यांचा कल दिसून येतो. आधीं कळस मग पाया रे, असा उलटा क्रम त्यांचा झाला आहे. लोकशिक्षणासाठीं दौरे करणें व चांगलीं चांगलीं पुस्तकें लिहिण्याऐवजीं सुशिक्षित लोक शालोपयोगी पुस्तकें लिहिण्यांत गुंग आहेत. परदेशी गेलेले तरुण विद्यार्थी तिकडील तरुण स्त्रियांचीं चित्रें आणीत आहेत आणि आपल्या बायकांशीं एकनिष्ठ राहात नाहीत. तोंडानें स्वदेशी बोलतात पण परदेशी माल वापरतात. तथापि गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका आणि पुणें सोलापूरचे गणेश नानाजी माटे अशांसारखी मंडळी प्रशंसनीय कामें करीत आहेत, यांत संशय नाहीं. राज्यकर्ते व रयत यांमध्ये सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न गोपाळराव करीत असत, असें या मानपत्रांतून म्हटलें आहे. आपला समाज म्हणजे खिस्त्यांचें एक अनुकरणच आहे. आजचे बी. ए. व एम्. ए. स्वतःला फार शहाणे समजतात पण समर्थ रामदास स्वामी, तुकाराम, शिवछत्रपति, नाना फडणीस हे कोणत्या कॉलेजांत गेले होते, असे सवाल या मानपत्रांतून केले गेले आहेत. गोवधबंदीचा कायदा कोणी मागितला आहे काय, असाहि सवाल त्यांत आढळतो.

## सुप्याच्या मानपत्राचा निषेध

सुप्याचें मानपत्र ता. २०–१२–७५ चें आहे. सुपा ऐक्य वर्धनीय सभा असें नांव या सभेचें आहे. या मानपत्राची कथा लक्षांत ठेवण्यासारखी आहे. गांवांत सावकार आणि कुळें यांचे दोन तट पडून त्यांत मोठें भांडण चालू होतें. कोणत्याहि प्रकारची तडजोड अनेक प्रकारें प्रयत्न करून मंजूर झाली नाही. पोलीसांनी व कलेक्टरानी हात टेकले. पण मानपत्र म्हणतें, ‘गोपाळराव यानीं गांवांत १० दिवस मुक्काम ठोकला. रोज सभा भरविल्या आणि लोकांना अनेक तऱ्हेनें त्यांनी आवाहन केलें. आपापसांतील भांडणामुळें, फुटीमुळें आणि त्यांतून उद्‌भवलेल्या मारामारीमुळें सुपे गांवांवर शिक्षार्थ पोलीस बसविण्यांत आले आणि सतत तीन महिने गांवदंड भरावा लागला. गोपाळरावांचा उपदेश ऐकून गावकऱ्यांनीं ३५ लोकांची ऐक्य वर्धिनी सभा स्थापन केली. ‘गोपाळराव खरें लोकसेवक व देशभक्त आहेत’ असें मानपत्र म्हणतें.

## उपदेशपर एक्कावन्न सूत्रें

उपदेशपर अशीं एक्कावन्न सूत्रें गोपाळरावानीं गोवलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं महत्वाचीं येणेंप्रमाणें : ( १ ) परमात्मा एकच आहे असें तूं जाण. ( ६ ) तूं सार्वजनिक कामांत अधिक लक्ष घाल. त्याच्या पोटांत स्वहिताचा समावेश होतो असें जाण, मान व त्याप्रमाणें आचरण ठेव. ( ७ ) तूं सार्वजनिक हिताकरतां स्वहिताची हानि झाली असतांना सोस व वेळ पडल्यास हानि करून घे. ( ८ ) शास्त्र पुराणांनी साधनामध्यें जें कांहीं सार्वजनिक कल्याणांविरुद्ध, सुनीतिविरुद्ध आणि खोटें असें मतलबी लोकांनी शिकवलें असेल तें टाकून दे. ( १२ ) एखादी गोष्ट दुसऱ्यास करूं नये असें तुला वाटत असून ती विचारली असतां मी सांगत नाहीं असें म्हण परंतु खोटें बोलू नको. ( १५ ) तुझा जीव जात असला तरी तूं विश्वासघात करूं नको. ( १८ ) तुझ्या कोणत्याहि कृतीपासून किंवा स्वार्थ आचरणापासून दुसऱ्याचें तन, मन, धन आणि कीर्ति यांस अयोग्य आणि विनाकारण इजा होऊं देऊं नकों. ( २२ ) तूं खून करूं नको व खोटे कागद करूं नको. ( २४ ) तूं सर्वांशीं, म्हणजे लहान-मोठ्यांशीं किंवा सबळ-दुर्बलांशीं किंवा गरीब-श्रीमंतांशीं लीनतेनें एकसारखा वाग व त्याचा अपमान व तिरस्कार करूं नकोस. ( २६ ) तूं अज्ञानास ज्ञान दे, भुकेल्यास अन्न दे, निरुद्योग्यास उद्योग देण्याचा यत्न कर, गरजूंची योग्य गरज भागविण्याचा प्रयत्न कर. ( ४४ ) तूं मांसभक्षण करूं नकोस व दारू पिऊं नकोस. ( ४७ ) तूं कसरत, दांडपट्टा, कुस्ती, घोड्यावर बसणें, गोळी मारणें या विद्या शीक. ( ४८ ) तूं आपल्या मुलीचें लग्न १० वर्षांच्या आंत आणि मुलांचें २१ वर्षांच्या आंत करूं नकोस किंवा या आज्ञेविरुद्ध असलेल्या लग्नास मदत करू नको. ( ५० ) तूं श्रम करून आपलें अन्न मिळीव. ( ५१ ) श्रमाने द्रव्य मिळीव व त्यावर व्यापार करून तें वाढव. परंतु आपलें द्रव्य आपल्या स्वदेश बंधूखेरीज दुसऱ्याचे हातीं देऊं नकोस.

## दत्त संस्थानाची अभिनव कल्पना

गोपाळरावांनी इंदापुरांत दत्त संस्थान करण्याचा प्रयत्न केला. या संस्थानांत पुढील खातीं राहावयाचीं होतीं. ( १ ) पाकशाळा ( पंढरपूरच्या वाटेवरचें गांव म्हणून ) ( २ ) धर्मशाळा ( ३ ) शिल्पशाळा ( ४ ) वेदशाळा ( ५ ) शास्त्रशाळा ( ६ ) बलसंवर्धन शाळा. याला जोडून एक मोठी पाण्याची विहीर. यासाठीं गोपाळरावांनीं सर्वत्र संचार करून वर्गणी जमविण्याचा प्रयत्न केला. राजा सर टी. माधवराव शंभर रुपये, शहापूरजी जीवनजी, दोराबजी दस्तूर, सय्यदपीर कमालुद्दीन अशा प्रकारचें निरनिराळ्या जातीचे वर्गणीदार आहेत. कलेक्टर साहेब, पुणें जिल्हा यांजकडून हें सार्वजनिक काम आहे असा दाखला मिळविला होता.

## ग्रंथसंपत्ति

श्री. गोपाळरावांनी आपल्याजवळचे कागदपत्र अत्यंत व्यवस्थित ठेवले होते. आवक जावक नंबर घालून ठेवलेले होते. त्यांतील पत्रव्यवहार. व्याख्यानें स्वतः छापून काढून वाटलीं आहेत. त्या प्रती दुर्मिळ आहेत. पैकी माझ्या संग्रहीं असलेलें ' सुबोध प्रार्थना ' संवत् १९३० मध्यें प्रसिद्ध केलें. दुसरें शिलाप्रेसवरील सुमारे १८७९ पर्यंत छापलेलें. यांत गोपाळराव देशपांडे यांच्या मोडी हस्ताक्षराचा मजकूर आहे. ( शके १८०४ मजकूर ) ' श्री दत्त संस्थान– राजकीय धर्मप्रकाश ' हें पुस्तक आपल्याला आलें तशा हिंदी भाषेंत लिहिलें आहे. आपल्या हिंदुस्थानी भाषेंत लिहिलें आहे म्हणजे अधिक शोभेल. मराठी न जाणणाऱ्या लोकांसाठी हें केलेलें आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेच्या शेवटीं गोपाळराव लिहितात, " आपने भरत खंडके अंदर जितनी बात चलती है उसके अंदर सबसे बढकर हिंदी जबान सच्ची है उस लिये उसका पसार आमल्मुकके अंदर जादा होनेसे बडा फायदा होगा ये मेरि पुरी खातर बहुत दिनतक मुल्क मुल्कके अंदर सेलकियेसे बस भई उसलिये मैने ये हिन्दी पुस्तक आमलोगोंके भलाईके लिये बनाके पसार किये है ' हें पुस्तक पुणें वैभव छापखान्यांत पुणें शहरांत १८८५ मध्यें छापलेलें आहे.

येणेंप्रमाणें संक्षेपानें गोपाळरावांबद्दल हकिगत दिली आहे. ती मनःपूर्वक वाचली असतां या खटपटी लोकसेवकाच्या थोरवीची चांगली ओळख घडून येईल आणि माहितींत पुष्कळ भर पडेल. तसेंच लोकसेवेच्या अनेक कल्पना आणि मतें किती पूर्वीपासून स्वीकृत झालेली पाहाण्यांत येतात तेंहि कळून येईल. अशा प्रकारचे अनेक लाभ या लेखाने जिज्ञासू वाचकांस घडतील अशी आशा आहे.

७

# वा. मो. पोतदार

## एक सत्पुरुष

♣ ♣

माझे प. पू. वडील बाबा पोतदार यांनी गेल्या दत्तजयंतीस सोमवारीं शुभयोग साधून शांतपणे रात्रौ आठ वाजण्याच्या सुमारास देह ठेविला! आणि या घटनेस चार दिवस लोटतात न लोटतात तोंच 'सह्याद्रि'कर्ते यांनी मला बाबांच्याविषयीं लेख लिहिण्याची सूचना केली! क्षणभर मनांत आलें की, हा योग अनपेक्षित तर खराच, परंतु अजून मी अशौचांतच आहें आणि लेखणी हातांत घेऊन ही सेवा करण्याची सूचना मलाच होते! बहुशः देहत्यागोत्तर इतक्या अल्पावधींतच कोण्या पुत्राने आपल्या पित्याबद्दल लिहिण्याचा योग साधला नसेल! संपादकांची कल्पना व अडचण अशी असावी की, कै. बाबांचें चरित्र तसें प्रसिद्ध नाही. ते झाकल्या माणकाच्याच वर्गांतले होते, तेव्हा आज साठ वर्षे पुत्र म्हणून त्यांच्या छत्राखालीं मी राहिलों तर मीच हें काम उत्तम पार पाडूं शकेन! या विचारांत कांही तथ्य असलें तरी तिऱ्हाइतपणाचा तोल मला कितपत सांभाळतां येईल? अद्यापि, मला बाहेर कडक थंडी पडते तेव्हा 'बाबांना नीट पांघरूण आहे का' असा विचार एकदम धसका देऊन जातो! असें माझें मन त्यांच्यापाशीं घोटाळत आहे! पुनः वाटलें की ही श्रद्धांजलि अर्पण करण्याची संधी आयती चालून आली आहे तर कां वाया दवडावी? आणि म्हणून प्रस्तुतच्या उद्योगास प्रवर्तलों आहें. माझें मन सांप्रत वेळीं बाबांच्या

हजारो स्मृतींनी व्याप्त झालेलें आहे. आवतीभोंवतीच्या वस्तु या कामीं मनोभावे साहाय्य करीत आहेत आणि प्रत्यहीं डाकेने बाबांचे अभिमानी माझें सांत्वन करण्याने त्यांची आठवण आणखीच प्रदीप्त करीत आहेत! त्यांचें हें करणें उचितच आहे. पण बाबांनी जसा शांतपणा रक्षून जीवनज्योति सारली तोंच शांतपणा आपण धारण करून हें कर्तव्यहि पार पाडलें पाहिजे.

## सोवळ्याचा क्लब

बाबांच्या हातचें एक कुंडलीचें टिपण आहे. त्याप्रमाणे त्यांचा जन्म शा. शके १७८५ वैशाख कृ. ८ रविवार (ता. १० मे अि. स. १८६३) दिवशीं झाला. या वेळीं आमचे आजोबा करंजुवे (नजीक माखजन) गांव सोडून बिरवाडी (जि. कुलाबा) येथेच संसार करून राहिले होते. कुंडली पाहतांच मला लहान पणचें स्मरण झालें. सुप्रसिद्ध गणित-ज्योतिषी कै. विनायकशास्त्री खानापुरकर हे आमच्या घरीं आपला नवा ग्रंथ झाला की घेऊन येत. त्यांनी कदाचित् ही कुंडली पाहिली असेल. बाबा आणि त्यांचें एक निकट मित्र कै. प्रो. अण्णा विजापूरकर यांचा जन्म एकाच वर्षातला आणि डेक्कन कॉलेजांत दोघेहि एकाच सोवळ्या क्लबांत! हा स्नेह पुढेहि टिकला आणि जेव्हां कै. विजापूरकर यांनी समर्थ विद्यालयाचें पुनरुज्जीवन 'नवीन समर्थ विद्यालय' या नावाने केलें, तेव्हा त्यांस या त्यांच्या जुन्या मित्राने मनोभावे साहाय्य केलें. त्यासाठी बाबा तळेगांवीं अधून मधून जाऊन राहतहि असत! त्यावेळची आपली आठवण बाबांनी स्वतःच लिहून दिलेली कानडेकृत विजापूरकर चरित्रांत वाचावयास मिळते!

## लुटीची हूल

हा मीं सहज ओघाने पुढे आलों. पुनः बाबांच्या पूर्ववृत्ताकडे वळतो. बाबांचें बालपण फार कष्टांत गेलें. आमच्या आजीने धैर्याने पतिनिधनानंतर संसार चालविला. या अल्पकाळांत एक आमचें आप्तविषयी आंबेकर इनामदार आणि दुसरे महाडचे परांजपे यांचा आधार फार कामीं आला. आमच्या आजोबांनी तर शेवटचें पुत्रमुख पाहून सहा महिन्यातच इहलोक सोडला!

बिरवाडीस बाबांचें मराठी शिक्षण झालें. या काळात त्यांचें वय १३-१४ चें असताना प्रख्यात वासुदेव बळवंतांची उठावणी झाली. आणि एक दिवस बिरवाडी लुटणार म्हणून हूल आली. त्या वेळच्या पळापळींत हातांतली आंगठी तोंडांत घालून आपण कशी धूम ठोकली त्याची आठवण बाबांच्या तोंडून ऐकलेली स्मरणांत आहे.

मराठी शिक्षण आटोपून इंग्रजी शिकण्यासाठी परांजप्यांचा शिवराम ( भावी काळकर्ते ) आणि पोतदाराचा वामन रत्नागिरीस दाखल झाले. त्यावेळीं मासिक परीक्षा होत. त्यांत विषयवारीने पहिला येणारास एक रुपया, दोन रुपये अशीं रोख बक्षिसें मिळत.

बाबांच्या वांट्याला दोन-तीन रुपये हटकून येत आणि त्यांत ते आणि त्यांची आई यांचा गरिबीने निर्वाह होत असे. याच काळांत खालच्या ईयत्तेंत गोविंद सखाराम सरदेसाई (रियासतकर्ते) हेहि शिकत असत.

## ब्रह्मर्षींचें अध्यापन

रत्नागिरीस शिकत असतां इंग्रजी तिसऱ्या इयत्तेवर विष्णुशास्त्री चिपळूणकर शिक्षक होते. एके दिवशीं ‘ पार्थ म्हणे तो कोण ब्रह्मर्षि असे तदीय महिम्याते ’ इत्यादि मोरोपंती आर्या शास्त्रीबोवा बाबांच्या वर्गाला शिकवीत असतां ‘ ब्रह्मर्षि ’ पदावरील प्रवचनांत एक तास कसा सहज निघून गेला ती आठवण बाबांच्या तोंडून ऐकलेली आहे. याचवेळीं सुटींत शास्त्रीबोवा पुण्यास रजेवर आले आणि त्यांनी तेथून राजीनामा पाठवून ‘ न्यू इंग्लिश स्कूल’ची स्थापना केली ! ही बातमी रत्नागिरीस आली आणि ही पोतदार-परांजप्यांची जोडी पळून पुण्यास आली ! बाबा ‘ स्कॉलर, ’ पळून पुण्यास जाऊं नये म्हणून हेडमास्तरांनी पाळत ठेवली होती; पण ही मंडळी निसटली आणि न्यू इंग्लिश स्कुलांत दाखल झाली ! टिळक-आगरकरांची जोडी तर होतीच आणि बाबांना तांब्यांच्या वाड्यांत टिळकांकडे वारंवार जाण्याचे प्रसंग आले, तथापि बाबांना मुख्य आधार वामन शिवराम आपटे यांचा ! त्यांच्या हाताखालीं बाबांचा संस्कृत विषय तयार झाला. बुद्धिमत्ता व अभ्यास या जोडगुणांच्या बळावर बाबांचा समावेश ‘जगन्नाथ शंकरशेट’च्या न्यू इंग्लिश स्कूलच्या वतनी झालेल्या शिष्यवृत्तीच्या शिकाऊ पाठ्यांत झाला ! वामन पोतदार, शिवराम परांजपे आणि महादेव मोडक ( महादेव हरी मोडक ‘ खडे तात्त्विक बोल ’ कर्ते ) हे ते तीन पठ्ठे आपट्यांनी तयार केलेले. यांच्या बळावर दोन्ही ज. शं. छात्रवृत्ति न्यू. इं. स्कू. कडे जिंकून आणण्याचा भरवसा ! याच वेळीं भाव्यांच्या शाळेंत विष्णु गोखले हा असाच एक पठ्ठ्या तयार होत होता. पुढे परीक्षा झाली. बाबांना ऐन परीक्षेच्या वेळीं जोराचा हिवताप लागला ! तरी त्यांनी तशीच परीक्षा रेटली ! कारण बाबांच्या गरिबीमुळें त्यांची परीक्षेची ‘ फी ’ सुद्धां आपट्यांनी स्वतः भरवशाने भरली होती आणि त्यांचें पुढील शिक्षण या छात्रवृत्तीवर अवलंबून होतें ! बाबांनी वामनरावांच्या झडतींत आपण प्रश्न बरोबर सोडविले असा अहवाल दिला होता. पण वामनराव भावे यांनाहि त्या वेळीं आशेला भरीव जागा होती. कै. प्रो. श्रीधरपंत भांडारकर परीक्षक होते. अखेर शिवराम परांजपे पहिली आणि विष्णु गोखले यास दुसरी असा निकाल वामनरावांस कळला ! तेव्हा प्रकरण डॉ. भांडारकरांपर्यंत गेलें. त्यांनी श्रीधरपंतांना खुलासा विचारला. तेव्हा उलगडा झाला तो बाबा सांगत तो असा :– पोतदार ८४; परांजपे ८२; गोखले ८१ आणि मोडक ७९ असे मूळ गुण होते. पण पोतदारांच्या पेपरांत डाग पडले होते. अक्षर कांपरें कांपरें होतें, म्हणून पंतांनी सुवाच्यता व टापटीपिच्या अभावी चार गुण त्यांचे कापले व ८४ चे ८० केले ! ! आतां या गरीब मुलाचा भार मला उचलावा

लागेल असें आश्वासन डॉ. भांडारकरांनी आपट्यांस दिलें. याप्रमाणें बाबांची ज. शं. हुकली. ते उदास झाले आणि सांगत की, दोन वर्षें संस्कृत पुस्तक हातांत त्यांनी धरलें नाही.' कॉलेजांत नेमलेलीं शांकुतलादि पुस्तकें आपट्यांनी मॅट्रिकच्या वर्गांतच या पठ्या विद्यार्थ्यांची करून घेतलीं होतीं. असा आपटे यांचा दीर्घ प्रयत्न अणि असे पठ्ठे ते तयार करीत! ही ज. शं. ची कथा मला वारंवार ऐकविण्यात आलेली आहे. कधी स्वतःहि सांगत. पण बाबांचे स्नेही कै. गोपाळराव जोशी मास्तर (प्रख्यात फर्ग्युसोनियन क्रिकेटर अकोल्याचे तरुण वकील व माझे बालमित्र कै. वाय. जी. यांचे वडील) हे वारंवार ही कथा मला सांगून मी वडिलांप्रमाणे छात्रवृत्तिवंत झालें पहिजे, म्हणून मला प्रोत्साहित करीत. पण आमच्या बुद्धींत आम्ही त्या कल्पनेस एवढादेखील थारा मिळू दिला नाही. पण ती आठवण मात्र पक्की आहे आणि ती सांगण्याचा हा प्रसंग असा आला आहे.

१८८४ त मॅट्रिक पास होतांच नुकतेच त्यावर्षी स्थापलेलें फर्ग्युसन कॉलेज त्यांत बाबानी नांव दाखल केलें आणि फर्ग्युसन कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या पटावर पहिले स्कॉलर म्हणून द. म. रु.१०ची कॉलेज छात्रवृत्ति त्यांस चालू झाली. मोडक यांसहि रु. १० ची शिष्यवृत्ति मिळाली. तीं नावें डे. ए. सोसायटीच्या त्या सालच्या छापील वृत्तांतांत नमूद आहेत.

## अध्ययन व अध्यापन

पी. ई. च्या पुढील शिक्षणाची सोय फर्ग्युसन्मध्ये नसल्यामुळे बाबा डेक्कन कॉलेजांत गेले. तेथें त्याना कॉलेजांतलें इंग्रजी निबंधाचें एक बक्षिस मिळाल्याचें त्यांच्या सांगण्यात होतें. अहमदनगरास स्मिथ नावाच्या खटपटी मिशनरीच्या प्रयत्नाने एक पी. इ. क्लास निघाला त्यांत भांडारकरांच्या शिफारशीवरून बाबा बी. ए. नसतानाहि शिकवूं लागले. कै. रा. ब. (न्या. मू.) रानडे यांच्या प्रोत्साहनाने अहमदनगरच्या मंडळींनी अ. ए. सोसायटीची स्थापना १८८४ त करून एक हायस्कूल चालू केलें त्यावर भागवत म्हणून आमचे एक आप्त हेडमास्तर होते. त्यांच्या मदतीस आणि भारदे प्रभृतींच्या जोडीने या नव्या सोसायटींतहि त्यांनी कांही दिवस काम केलें. त्यावेळचे बाबांचे शिष्य अजून त्यांची आठवण काढतात. (श्री. धनेश्वर व बापुराव डावरे वगैरे.) पुढे १८८९ त बाबा बी. ए. झाल्यावर मुंबईस गेले आणि गोकुळदास तेजपाळ हायस्कुलांत प्रथम शिक्षक आणि नंतर प्रमुख म्हणून त्यांनी काम केलें. १८९० त माझा जन्म झाला आणि त्या बालपणीं पाहिलेली कांही मुंबईची दृश्यें माझ्या डोळ्यासमोर आजहि उभीं राहतात. येथे असतां कै. रानडे यांच्या आग्रहामुळे कै. रा. ब. दा. ग. पाध्ये हे एम्. ए. म्हणून त्यांची नेमणुक गो. ते. हायस्कूलचे प्रमुखपदीं झाल्यावरून बाबांनी राजीनामा दिला. ती हकीगत त्यांनी स्वतःच 'सह्याद्रि' जानेवारी १९४२ च्या रानडे विशेषांकांत वर्णिली आहे.

पुढे खाजगी शिकवण्या वगैरे करून बाबांनी कायद्याचा अभ्यास केला व ते १८९७ त एल्‌एल्‌. बी. ची परीक्षा दुसऱ्या वर्गात पास झाले. मला त्यांनी सांगितलेलें आठवतें की, धुळ्याचे गरूड ( भय्यासाहेब ) व नानू नारायण कोठारे ( रघुनंदन ? ) वगैरेकडील शिकवण्या त्यांस होत्या. मुंबईचा हिंदु-मुसलमान दंगाहि त्यांनी पाहिला होता. त्याच्या हकीकती त्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत. त्याच वेळीं आमच्या बिऱ्हाडाशेजारीच कै. रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी हे राहात असत. ते शाळाखात्यांत होते. हा महापंडित पुढे पुण्यास सुखवास करून राहिला. त्या वेळीं पुनः पूर्वसंबंध दृढावले. यांची एक गोष्ट बाबा सांगत. यांना जेव्हा एकदा पगार मिळाला ( ८० रु. ? ) तेव्हा यांनी सरकारांत कळविलें की, ' एवढा पगार मला जास्त होतो ! ' असे हे तेव्हापासून विक्षिप्त दिसले तरी सत्त्वस्थ !

## चहास बंदी

त्याचप्रमाणे कै. डॉ. भालचंद्र आणि कै. डॉ. नानासाहेब देशमुख यांचा आणि बाबांचाहि मुंबईस पुष्कळ घरोबा वाढला. बाबा चहा पिण्याच्या विरुद्ध तर आमची आई माहेरीं बालपणापासूनच चहाने वाढलेली आणि इकडे बाबांकडे बंद; तेव्हा आमच्या आईचे आजोबा – यांस मी चांगलें पाहिलेलें आठवतें – आईसाठी स्वतः चहा घेऊन येत. अखेर हें चहा-भांडण भालचंद्र व नानासाहेब यांच्यापर्यंत गेलें. या दोघांहि पंचांनी चहाविरुद्ध अभिप्राय दिला, इत्यादि गोष्ट मी घरांत अनेकवार ऐकलेली आहे.

प्लेगामुळे बाबांनी मुंबई सोडली आणि ते पुण्यास वकिली करूं लागले. १८९७ ते १९१७ पर्यंत म्हणजे सुमारें वीस वर्षें त्यांनी वकिली केली. पुढे ते निवृत्तच झाले आणि परमार्थांत बहुतेक काळ सारीत ! त्यांची प्रकृति ते विद्यार्थी होते तेव्हापासूनच मूळव्याधी वगैरे अनेक वातरोगांनी त्रस्त होती. कै. बापूसाहेब मेहेंदळे, नानासाहेब देशमुख, आणि पुढे कै. महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांच्या उपदेशाप्रमाणे त्यांचे औषधोपचार सतत चालू असत. आमच्या घरीं कायमचा दवाखानाच होता म्हणाना ! पण मूळचें हाड काटक आणि बाबांनी पथ्य असें कडक सांभाळलें की, पाणी देखील ते गाळून तोलून प्यावयाचे ! आमच्या आजीचा औषधी बटवा होता, तो माझ्यापर्यंत पोंचला होता ! बाबा आपलीं दुखणीं स्वतःच काढीत. इतरांना त्रास कमी. शेवटचें दुखणेंहि त्यांनी अगदीं अखेरच्या क्षणापर्यंत सावधपणे काढिलें ! अशाहि अवस्थेंत त्यांनी योगसाधन केलें. बाबा तर होतेच, परंतु मी देखील या अनुभवामुळे अर्धा वैद्य झालों आहें, असें मला कधी कधी वाटतें !

पुण्यास आल्यावर प्रारंभी कै. अण्णासाहेब पटवर्धनांच्या आग्रहावरून बाबांनी गोंधळेकरांच्या ' जगद्धितेच्छू 'चे संपादक म्हणून काही महिने काम केलें. ' जगद्धितेच्छु ' साधारणपणे सनातनी पक्षाचा आणि सुधारकांचा प्रतिस्पर्धी !

अनुक्रम ३२०५९ दि:
क्रमांक ... २०२८ ...... नों: दि:



टिळकांच्या लॉक्लासमध्येंहि ते कांही शिकवीत असावे. टिळकांशी संबंध तर न्यू इं. स्कूलपासूनचाच. शिवरामपंत त्यांचे बालमित्र. आमच्या घरीं ते कार्यप्रसंगाने येत-जात, पण त्यांचा ‘काळ’ मात्र आल्याचें आठवत नाही. तो आम्ही बाहेरच वाचीत असूं.

## कॉंग्रेसमध्यें हजेरी

१८९५ च्या पुण्याच्या कॉंग्रेसला बाबा असले पाहिजेत कारण मला ते मंडप दाखविण्यास घेऊन गेल्याचें अजून दृष्टिसमोर आहे. पुनः गोखले अध्यक्ष झाले तेव्हा म्हणजे १९०५ त मध्यें काशीस आणि १९०७ मध्यें सुरतेस कॉंग्रेसला बाबा गेल्याचें मला आठवतें. टिळकपक्षाच्या सर्व खटपटींत बाबा जातीने हजर असत. जबाबदारीचें काम कांही त्यांनीं अंगावर घेतल्याचें दिसत नाही. कै. वासुकाका जोशी यांचा बाबांच्यावर अधिक लोभ असल्याचें माझ्या प्रत्ययास येई. कै. तात्यासाहेब केळकरांचे मधले बंधु कै. नारायणराव केळकर – ‘काव्यसंग्रह’ कर्ते – यांचा बाबांचा संबंध अधिक राहिला. टिळक पक्षांतले कवडेशास्त्री, तात्यासाहेब करंदीकर, दत्तोपंत वेहरे प्रभुति सनातनी वळणाच्या पथकांत बाबांची बैठक अधिक. त्याच आळींत आमचें राहणें असल्यामुळे आणि मोरोबादादांच्या वाड्याचे मालक माझे परममित्र असल्यामुळे त्या वाड्यांतील कवडेशास्त्र्यांच्या अड्ड्यांत मीहि अधूनमधून जात असे. परांजपे–टिळकांकडे लग्नकार्य प्रसंगांत बाबांचा भोजनप्रतिनिधि म्हणून पथ्यपाण्यामुळे स्वतः न जातां ते पुष्कळदा मलाच पाठवीत ! त्या पक्षांतील मंडळींशीं माझा ऋणानुबंध असा पिढीजाद ठरला.

बाबांची धार्मिक प्रवृत्ति मात्र बळकट. कै. अण्णासाहेबांकडे त्यांची रोजची बैठक. बाबांनी कोणाचा उपदेश घेतला नव्हता. पण ते अण्णासाहेबांना आणि त्यांचे गुरु श्रीनृसिंहसरस्वती स्वामी यांनाच गुरु मानीत. नृसिंहसरस्वतींच्या पुण्यतिथीला नियमाने हजर रहात आणि मलाहि बरोबर घेऊन जात. या संबंधामुळे अण्णा-साहेबांच्या घरांत मला सुखप्रवेश असे. आमच्या घरी औषध त्यांचेच मुख्यतः चाले ! वेदशास्त्रोत्तेजक सभेशीं बाबांचा निकट संबंध या धार्मिक प्रवृत्तीमुळेच आला आणि श्रीरमामाधवस्मृतिमंडळाच्या स्थापनेच्या कामींहि त्यांनी वृद्धापकाळीं उचल केली त्यांतलें मुख्य बीजहि तेंच. उतारवयांतहि त्यांनी त्रिस्थळी केली. त्यांतच गोकर्णाजवळ घसरून त्यांचा पाय दुखावला. श्री. मसूरकर महाराज महाराज म्हणून प्रकट होण्यापूर्वीं कांही दिवस आमच्या घरींच होते. ते आणि कै. समर्थदास, बाळाजीबुवाप्रभृति रामदासीमंडळ यांच्या समवेत बाबांनी काशीयात्रा केली होती. बाबा स्नानसंध्या करीत, पण त्यांना कर्मठ म्हणतां येणार नाही. सारासार विचार त्यांच्या वर्तनांत व बोलण्यांत दिसून येई. योगायोगाने श्री. दासगणू महाराज यांचा मुक्काम आमच्या घरीं (१९०८) घडूं लागला. पुढे बाबा अनेकवार पंढरीस जात. पण ते माळकरी नव्हते. त्यांचा भक्तियोग, योगसाधन

किंवा धर्मसाधन स्वतंत्र चालत असे. श्रीशंकराचार्यांच्या भाष्यावर त्यांचा फार भर असे. पुढे त्यांनी ज्ञानेश्वरी आणि नंतर अमृतानुभव या ग्रंथांचा मननपूर्वक अभ्यास दीर्घकाल केला. कांही प्रवचनेंहि घरींच जिज्ञासूंसाठी अमृतानुभवावर ते देत असत. 'ज्ञानेश्वर-दर्शन' ग्रंथांत त्यांनी लिहिलेला लेख त्यांच्या दृढ व्यासंगाची उत्तम साक्ष देतो. तुकोबांचा गाथा हाहि त्यांचा मित्रग्रंथ होता. कवडे अड्ड्यावर कै. गोविंदसुत (चिंचळकर) येत. बाबांची त्यांची वेदांत व परमार्थविषयावर खूप चर्चा चाले. पांडुरंग शर्मा (कुळकर्णी) यांच्याशीहि त्यांचा ज्ञानेश्वर-तत्वज्ञानाबांबत वाद होत राही.

## संस्थांची स्थापना

ब्राह्मणसभा पुण्यांत स्थापन झाली या कामींहि त्यांनी मन घातलें होतें. निगडी-अकुरडी जवळची जागा दाऊदी मुसलमान ट्रस्टींनी घेण्याचें ठरविलें, त्या कामीं कै. नारायणराव गुंजाळ प्रभृतींबरोबर बाबांनी पुष्कळ लक्ष घालून ती योजना निष्फळ केली. श्री. विश्वासराव डावरे यांनाहि त्यांच्या धार्मिक झगड्यांत बाबांचें साहाय्य असे. श्री. शंकराचार्यमठाच्या कामींहि बाबांनी लक्ष दिलें होतें आणि टिळकांशींहि वाटाघाटी केल्या होत्या. कै. ब्रह्मनाळकर यांस श्रीशंकराचार्य-मठीं स्थापिलें त्यावेळीं वर्गणी मागण्याकरिता टिळक स्वतः आमच्या घरीं आले होते, ती आठवण मला आहे. संकेश्वर मठाचे सर्वाधिकारी बाबांनी व्हावें अशी एक योजना अर्धवट शिजली होती.

पुण्यात आल्यापासून 'पुना नेटिव्ह जनरल लायब्ररी' हें बाबांचें एक प्रिय ठिकाण झालें होतें. ते रोज सकाळीं व संध्याकाळीं लायब्ररींत हटकून बसलेले सापडावयाचे. तेथे त्यावेळीं कै. रा. भा. पाळंदे, कै. गो. का. नातु वकील व कै. कृष्णाजी रघुनाथ केळकर प्रभृति मंडळी जमत. येथेंच पुण्याची वक्तृत्वोत्तेजक सभा व डे. व्ह. ट्रा. सो. यांचा कारभार हीच मंडळी प्रमुखपणाने पाहात. त्यामुळे बाबांचा वरील संस्थांच्या कार-भाराशींहि फार निकटचा संबंध असे. त्यांच्याबरोबर लायब्ररी व वक्तृत्वसभा यांच्या कामांत मी जात असे तें मला आठवतें. दोन्ही सभांत ते परीक्षकाचेंहि काम करीत.

लेखन मात्र त्यानी नावालाच केलें. 'ग्रंथमाले'त लिहिण्याविषयी कै. अण्णा-विजापूरकरांनी बाबांना 'जागृतीकरिता पडघम' वाजवूनहि फलप्राप्ति झाली नाही. आर्यभूषणचे कै. वामनराव पटवर्धन यांनी त्यांच्याकडून ज्ञानेश्वरी वगैरेच्या कामीं मदत घेतली होती. श्री. मनु सुभेदार, मुंबईचे मोघे यांनी त्यांना ज्ञानेश्वरीचें इंग्रजी भाषांतर पूर्ण करण्याचा आग्रह केला होता. कै. भानूंचे गीताभाष्य व त्यावर बाबांचे एक मित्र 'वातशास्त्री' पुरंदरे त्यांच्याकडे येऊन भाराभर बाड लिहून आणून चर्चा करीत तें मला आठवतें (१९०३). सार्वजनिक सभेचे ते सभासद असून पुढे उपाध्यक्ष वगैरे जागींहि त्यांची योजना झालेली होती. नगरवाचनमंदिराची सेवा ४० वर्षें त्यांनी निष्ठेने केली. उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणूनहि सदर सभेंत त्यांनी काम केलें. श्री. संतोजीबुवा कुकुरमुंडेकर यांनी धर्मशास्त्रविषयक जे सनातनी मतप्रणालीचे समर्थनपर दोन खंड प्रसिद्ध

करविले त्याबाबतहि ते व इतर मंडळी बाबांच्याकडे चर्चेसाठी येत. अस्पृश्यताप्रकरणी पंढरपूरचे धारूरकर व डावरेप्रभृतींबरोबर महात्मा गांधींकडे चर्चेसाठी बाबाहि येरवड्यास जात होते. आळंदी श्रीनृसिंहसरस्वती मंडळ, कै. अण्णासाहेब पटवर्धन स्मारक मंडळ यांच्या कामीं त्यांनीं जिव्हाळ्याने लक्ष पुरविलें. प्रकृति संभाळून ते अशा अनेक उद्योगांत लक्ष घालीत.

बाबा स्वदेशीचे कट्टे पुरस्कर्ते होते. आमच्या घरीं कधीं विलायती कापड आलेलें मला लहानपणापासून आठवत नाही. बहुधा १८९४।९५ त स्वदेशी शपथांची चळवळ झाली त्या वेळेपासून बाबांनी स्वदेशी व्रत अंगीकारिलें असावें. ते खादीहि आवडीने वापरीत.

## नोकरीचा मोह सोडला

बाबांचे वडील बंधु माळव्यांत झाबुआ संस्थानाखालील रायपुरा ठकराइतींत अमीन होते. त्यांनी आपल्या बुद्धिवान् व विद्वान् बंधूसाठी खटपट वेद्रकर दिवाणाकरवी करवून रतलामची दिवाणगिरी बाबांना मिळवून देण्याचा योग आणला होता. परंतु एकंदरीत तें वातावरण आपणास मानवणार नाही म्हणून बाबांनी तो मोह सोडला व पुण्यासच ते स्थाईक झाले. प्रथम १८९० त वकिलीस प्रारंभ केला, त्या वेळीं सध्याच्या किर्लोस्कर थिएटरच्या जागीं रस्त्याच्या माडीवरच बाबांची कचेरी होती आणि त्यांच्याकडे वरील माळ्यावर त्यांचे डेक्कन कॉलेजांतील स्नेही कै. विसुभाऊ राजवाडे आमच्यावरील माळ्यावर राहत आणि विसुभाऊ साळवेकरांच्या सरदारगृहांत जेवीत. राजवाड्यांचा पहिला खंड तेव्हा नुकताच प्रसिद्ध झाला होता आणि त्याच्या प्रतींचे गठ्ठे आमच्या घरीं पडलेले असत. तेव्हांच मला त्यांचें दर्शन घडलें. पुढे मी विसुभाऊंस आमच्या घरीं १९०७ मध्ये बोलावून आणिलें तो कथाभाग निराळा.

अशी ही बाबांची चरित्रकथा आहे. ती आठवली तशी सांगितली आहे. त्यांची खरी योग्यता जाणिक मंडळींस कशी ज्ञात होती तें नुकतेच बाबांच्या बालपणापासूनचे ऋणानुबंधी रियासतकार सरदेसाई यांनी मला लिहिलेल्या दुःखवटापत्रांत उत्कृष्ट प्रकारे प्रतिबिंबित झालेलें आहे. बाबांचा उपयोग समाजास झाला यापेक्षाहि अधिक व्हावयास पाहिजे होता. पण सर्व गोष्टी आपल्या इच्छेप्रमाणे व अपेक्षेप्रमाणे थोड्याच घडतात !

नानासाहेब सरदेसाई यांनी म्हटलें आहे तसेंच समजून चालावें हेंच योग्य, म्हणून त्यांच्या शब्दानेच ही श्रद्धांजलि पुरी करितों.

" माझे एक जुने ऋणानुबंधी गेले. जीवनामध्ये आम्हा उभयतांचा निकट संबंध जुळण्याचा योग आला नाही, तरी परस्परें सदैव मनांत पूर्ण आदर उभयतांत वसत होता. त्यांची बुद्धिमत्ता व चतुरस्रपणा हे गुण असामान्य होते. त्याचें मोल बाहेर जाहिराण्यांत दिसलें नाही तरी परिचितांस चांगलें अवगत होतें. मृत्यु ही जीवनाची

अखेरची अवस्था आनंदमय होय, ही कसोटी निरपवाद मानल्यास वामनरावांचा अंत आनंदमय झाला असें मी समजतों. गेल्या महिन्यांतच पुण्यास गेलों असतां मी त्यांस भेटून आलों, याचें आज समाधान वाटतें. कष्ट सहन करीत राहण्यापेक्षा ते यातनांतून सुटले. पुण्यपुरुष कीर्ति करून गेले, हेंच दुःखांत सुख तुम्ही आम्ही मानूं या"
( १० डिसेंबर १९४९ कामशेत )

—सह्याद्रि, जानेवारी १९५९

८

# श्रीमंत बाबासाहेब घोरपडे

## आदर्श अधिपति

♣ ♣

श्रीमंत बाबासाहेब हे एक भाग्यशाली पुरुष म्हणून गणले जातात, तें निःसंशय योग्य आहे. त्या भाग्यशालीपणाचे अनेक पैलू आपणांस आढळून येतात. नुसतें दीर्घायुरारोग्य घेतले तरी आपल्याकडे श्रीमंत बाबासाहेबांची बरोबरी करणारे किती भाग्यशाली पुरुष सापडतील? त्यांतून संस्थानिक मंडळांत? श्रीमंत बाबासाहेबांना राज्यलाभ आला तोहि एक भाग्याचाच योग म्हटला पाहिजे. रा. लक्ष्मणराव जोशी यांच्या या मुलाचें सहाव्या वर्षी दत्तविधान होऊन इचलकरंजी संस्थानाचें अधिपत्य त्यांच्याकडे आलें. वयाच्या बाविसाव्या वर्षी म्हणजे इ. स. १८९२ त श्रीमंतांच्या हातीं राज्यकारभाराची सूत्रें आली. त्या गोष्टीला आज १९४२ त पन्नास वर्षे पुरीं झालीं. एवढा दीर्घकालपर्यंत राज्योपभोग घेण्याचें भाग्य तर फार विरळा. महाराणी व्हिक्टोरिया, श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड वगैरे थोडीच नांवे अशा भाग्यशाली वर्गात मोडतात. या दुर्लभ कोटीत श्रीमंत बाबासाहेबांचे नांव जाऊन पडावें यावरून त्यांच्या भाग्यशालित्वाचें अधिक बलवत्तर व स्पष्टतर प्रमाण तें कोणतें?

भाग्यशालित्वाची हीं सहज वरवर दिसणारीं कांही प्रमाणें वर दर्शित केलीं. पण राजवटीची केवळ दीर्घकालीनता ही कांही विशेष भूषणास्पद गणतां येणार नाही. श्रीमंत

बाबासाहेबांनी या दीर्घकालीनतेला यशस्वी कर्तृत्वाची अपूर्व जोड स्वतःच्या परिश्रमानें मिळवून दिली आहे आणि यामुळेच त्यांचा जयजयकार त्यांची प्रजाच नव्हे तर प्रजेतर सहस्रावधी जन आज एवढ्या मनोत्साहानें करीत आहेत.

या पन्नास वर्षांत श्रीमंत बाबासाहेबांनी आपल्या छोट्या संस्थानाचा कारभार मोठ्या योग्यतेनें करून दाखविला यांत संशय नाहीं. कर्तव्यबुद्धि, दृढनिश्चय, परिश्रम व कौशल्य या गुणांचे आश्रयाने त्यांनी खरोखरीच मोठें यश व कीर्ति मिळविली व आपला एक महनीय आदर्श निर्माण करून लोकांपुढें ठेवला. त्यांच्या अंगचे अनेक गुण कसोटीला लागावे असे खडतर प्रसंगहि त्यांचेवर बहुत येऊन पडले, आणि या प्रसंगांत तर त्यांची ‘ सुवर्ण परीक्षा ’च झाली !

## *कै. श्रीमंत सयाजीराव व श्रीमंत बाबासाहेब*

भारतवर्षीय देशी राजमंडळांत गेल्या शतकांत बडोद्याचे श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचें नांव अत्युच्च कोटींत यथार्थपणें गणलें जातें. कै. श्री. सयाजीराव महाराज व श्रीमंत बाबासाहेब यांच्या चरित्र–चित्रांत एक प्रकारचें विलक्षण साम्य आपणांस आढळून येतें. श्रीमंत सयाजीराव जसे वयानें व अधिकारानें वडील तसेच त्यांचें यशहि त्या मानानें मोठें असलें तरी सूक्ष्म व मार्मिक दृष्टीनें उभयतांची तुलना करणारांस श्री. बाबासाहेब हे एक श्री. सयाजीराव महाराजांची छोटी प्रतिमाच वाटतील. साधारणपणें या दोघां भूपतींची राजवट समकालीन गणण्यास चिंता नाही. श्रीमंत सयाजीमहाराजांसहि खानदेशांतील कवळाण्यास गुरें राखीत असतां बडोद्याच्या राज्यपदावर आरूढ होण्याचा योग आला. आमच्या श्री. बाबासाहेबांसहि सोलापूर जिल्ह्यांतील करकंबेहून इचलकरंजीचें अधिपतित्त्व मिळण्याचा सुयोग प्राप्त झाला. दोघांसहि हे सुयोग त्यांच्या बालपणींच वांट्यास आले. कै. श्री. सयाजीमहाराज यांना मे. एलिएट साहेबांसारखा नामांकित गुरु लाभला तर आमच्या श्रीमंतांस प्रो. वर्डस्वर्थसारखे खंदे गुरु मिळाले. कै. श्री. सयाजीराव महाराज व श्रीमंत बाबासाहेब या उभयतांनीहि आपल्या गुरूपासून शक्य तेवढें ज्ञान परिश्रमानें मिळविलें. दोघांच्याहि मनावर त्यांच्या गुरुजनांनी ठसविलेल्या भावी जबाबदारीच्या उदात्त कल्पनेचा विसर दोघांनीहि क्षणभरहि पडूं दिला नाही. ती कठीण कामगिरी सुव्यवस्थितपणें पार पाडण्यासाठीं झटण्यांत दोघांनीहि किंचितहि आळस केला नाहीं. दोघेहि आयुष्यभर जागरूक व यत्नशील राहिले आणि म्हणून महनीय यशाचे वाटेकरी झाले.

## *सूक्ष्म अवलोकन*

परदेशचा प्रवास दोघांनीहि अनेकवार केला होता. परदेशांतील नानाविध प्रगतीचें उघड्या डोळ्यांनीं उभयतांनी निरीक्षण केलें होतें आणि

आपापल्या संस्थानांची प्रगति करण्यास या परदेशनिरीक्षणाचा उभयतांनी भरपूर उपयोग केलेला दिसून येतो. उभयतांची प्रज्ञा स्वतंत्र होती आणि तीस अनुसरून व ग्राह्य गोष्टींची टिपणें करून तें ज्ञान प्रजेस पोंचविण्याची खबरदारी उभयतांनी घेतल्याचें दिसून येतें. कै. श्री. सयाजीरावमहाराजांचें कार्यक्षेत्र, सत्ता व सामर्थ्य पुष्कळच मोठें म्हणून त्यांनी परदेशांत पाहिलेल्या नानाविध गोष्टींचा उपयोग त्यांना करून घेता आला. तथापि जशीं वाचनालयें व ग्रंथालयें यांची प्रीति कै. श्री. सयाजीरावांस विशेष होती, तशी सहकारी पतपेढ्यांवर विशेष भक्ति श्रीमंत बाबासाहेबांनी पुरविली होती. कौटुंबिक आपत्ति दोघांसहि सहन कराव्या लागल्या व ब्रिटिश सरकारांत मान्यता पावूनहि कोणाच्या ताटाखालच्यीं मांजरें बनण्याची क्षुद्र वृत्ति दोघांनीहि कधीं दर्शविली नाही. वरिष्ठ सत्तेशीं न्यायाचे कामांत लढण्याचे प्रसंग दोघांसहि आले आणि हे लढे करतांना विरोधी पक्षांस कोठें छिद्र सांपडूं नये म्हणून उभयतांनी फार चातुरी व चिकाटी दाखविली. स्वोद्योगावर आणि सर्वांगीण सुधारणुकेवर उभयतांचाहि फार कटाक्ष होता. कै. श्रीमंत सयाजीरावमहाराज यांची एतद्विषयक वक्तव्यें प्रसिद्ध आहेत तितकीं श्री. बाबासाहेबांची लोकविश्रुत नाहीत, म्हणून १९१३ मध्यें युरोपची सफर करून आल्यावर श्रीमंत बाबासाहेबांनी जो 'इंप्रेशन्स् ऑफ् ब्रिटिश् लाइफ अँड् कॅरेक्टर' म्हणून इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध केला आणि ज्याचें मराठी भाषांतरहि पुढे करविलें, त्यांत त्यांनीं आपल्या मनावर उमटलेल्या ठशाचें केलेलें निवेदन त्यांच्याच शब्दांत येथें देणें उचित वाटतें; —

"It has shown me more than ever that the salvation of our country really lies in *our own efforts*, guided by the parental care of our rulers. In order to attain this, our progress must not be in a few directions *but in all*. The provision of a liberal education means only the first step towards the goal. Along with social and political problems we must also try to grapple with great economic, commercial, industrial, educational, and hygienic questions. Above all, we must learn the habits of industry and perseverance and cultivate courage and commercial and political morality in our undertakings. We must develop character and patriotism before we can hope to rise again in the estimation of the world. The task is very arduous, and will require sustained and prolonged effort. It will be many centuries before we can hope to attain our ideals, but I am a *great believer in the future of our race* – a race which we believe to be under the special care of the Divinity.

इंग्रजीमध्ये हे उभयतां नृपति आपले विचार सफाईने व कुशलतेने मांडणारे म्हणून उभयतांनाहि प्रसिद्धि लाभलेली आहे. बडोदा-नरेशांची या विषयीची ख्याति जगभर झालेली आहे, आणि श्रीमंत बाबासाहेबांसंबंधांत राइट ऑ. लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टनसारख्यांनी "एक्सलंट अँड प्रेग्नंट इंग्लिश" लिहिणारे म्हणून त्यांस गौरविलें आहे. मराठी भाषेंत वाङ्मयनिर्मिति व्हावी म्हणून उभयतांनी केलेले प्रयत्न सुप्रसिद्ध आहेत. परदेशांत शिक्षण घेण्यासाठी गरीब पण हुशार विद्यार्थ्यांस मदत करण्यासाठी उभयतांनीहि पुष्कळ धनदान केलें हें विश्रुत आहे. प्रजाजनांच्या उन्नतीसाठी उभयतांनी श्रमपूर्वक नानाविध योजना केल्या परंतु लोकसत्ताक राज्यपद्धतीची आवश्यक पूर्वसिद्धता झाल्याचा भरंवसा या उभयतां नृपतींस पुरला होता असें दिसत नाही. असो. दोघेहि भूपति थोर कोटींतच गणले जातात व जातील यांत संशय नाही. आणि म्हणूनच दोघांनाहि दीर्घकालपर्यंत प्रजाशासन करण्याचा अपूर्व योग लाभला आणि दोघांसहि आपल्या यशस्कर राजवटीचा पन्नाशीचा उत्सव सोहोळा पाहण्याचा शुभयोग उपभोगतां आला.

प्रस्तुत अंकांत श्रीमंत बाबासाहेबांच्या कारकीर्दीचें समालोचन प्रसिद्ध झालेलें आहे. आणि त्यांत श्रीमंतांनी केलेल्या अनेकविध सुधारणुकेच्या व प्रगतिपर योजना यांविषयी सविस्तर माहिती देण्यांत आलेली आहे. ही माहिती वाचणारांस श्रीमंतांच्या कर्तृत्वाची, प्रजाहिततत्परतेची, उचितानुचित विवेककौशल्याची आणि उद्यमशीलतेची उत्तम साक्ष पटेल.

## खानगीचा अल्प बोजा

तसें म्हटलें तर इचलकरंजी संस्थानाचा कारभार सालिना अवघा तीन–साडेतीन लाखांचाच आहे. या उत्पन्नांतच श्रीमंतांचें खाजगीचें सुमारे अर्ध्या लाखावरचें उत्पन्न समाविष्ट आहे. संस्थानाच्या जमाखर्चाचा जो ताळेबंद अन्यत्र दिला आहे तो नीट तपासून पाहिला असतां असें दिसून येईल कीं, श्रीमंतांच्या खाजगी खर्चाचा बोजा संस्थानाच्या तिजोरीवर वीस हजारांच्या आंतबाहेरच पडतो. म्हणजे शेकडा, ६ ते ७ टक्के इतकाच भार संस्थानावर श्रीमंत टाकतात. या धोरणा-मुळेच श्रीमंतांस अनेक सुधारणा करतां आल्या आणि अनेक संस्थांना उदारपणानें साहाय्य देतां आलें. संस्थानाबाहेरील संस्थांना द्रव्यसाहाय्यहि मिळावें, संस्थानांतील प्रजाजनांसहि या बाहेरील संस्थांचा लाभ मिळावा अशा दुहेरी धोरणाचा श्रीमंतांनीं अवलंब कसा केला, आहे तें या अंकांतील माहितीवरून स्पष्टपणें ध्यानांत येईल आणि या चतुराईबद्दल व योजकतेबद्दल कोणीहि श्रीमंतांचा गौरवच करील.

## व्यापक दृष्टि व कार्य

याच्या उलट उत्पादक खात्यांवर आणि प्रजासुखवर्धक खात्यांवर श्रीमंतांनीं यथास्थित खर्च करून संस्थानची प्रशंसनीय प्रगति साधून दाखविली

आहे, हें पाहून त्यांच्या प्रजाजनांनी त्यांचे निरंतर ऋणी असलें पाहिजे आणि सर्व जनहितेच्छु मंडळींनी श्रीमंतांचा गौरव केला पाहिजे. श्रीमंताचें लक्ष केवळ संस्थानापुरतेंच मर्यादित नाही. आपलें संस्थान ज्या महान् राष्ट्राचा किंवा संघराष्ट्राचा एक विभाग आहे त्याच्या समुन्नतीविषयींहि काळजी वाहणें हें एक आपलें कर्तव्य आहे असें ते मानतात व त्याप्रमाणे प्रत्यक्ष कृतिहि त्यांनी केली आहे. संस्थानाबाहेर संस्थानचा एक पैसाहि जाता कामा नये किंवा संस्थानाबाहेर आपली दृष्टि केव्हाहि फिरवतां कामा नये असा संकुचितपणा आपल्या मनास श्रीमंतानी केव्हाहि चिकटूं दिला नाही. सतत ज्ञान मिळविण्याचा आणि अनुभव संग्रहित करण्याचा निरलस प्रयत्न श्रीमंत करीत असतात हें त्यांचें चरित्र सम्यग्दृष्टीनें अवलोकन करणारांच्या सहज ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाही.

## सत्ता व संपत्ति असून संयम

पैसा व सत्ता हातीं असणाराचे ठायी संयम क्वचितच आढळतो. मनमानी वर्तणूक करण्यास अशा लोकांस सहज फावतें व त्या मोहापासून थोड्यांचीच सुटका झालेली आपण पाहतों. परंतु श्री. बाबासाहेब यानी आपलें चारित्र्य शुद्ध ठेविलें आहे आणि या गोष्टीचें श्रेय ते आपल्या मनानें तरी आपली धर्मश्रद्धा आणि आपल्या गुरूंची शिकवण यांसच देत असावे. मनाला आवरणें हाच खरा योगाभ्यास होय. 'चित्तवृत्ति निरोध म्हणजे योग' अशी भगवान् पतञ्जलींनी योगाची व्याख्या केली आहे. तिचें मर्म लक्षात घेऊन श्रीमंतांनी आपली वागणूक ठेवली आहे. श्रीमंतांशीं घटकाभर संभाषण करण्याचा सुयोग ज्यास लाभला आहे त्याच्या ध्यानांत त्यांचा विनय, बहुश्रुतता, ज्ञानलालसा, व मार्मिकपणा हीं आल्याशिवाय सहसा रहात नाहीत. त्यांच्या भाषणापासून एखादी नवी कल्पना, एखादा नवा अनुभव मिळाला नाही असें क्वचितच घडत असेल. आपला बुद्धिकोश आणि द्रव्यकोष सदा परिपुष्ट ठेवणे हें यशोभिलाषी राजांस अत्यावश्य आहे. आपले दोन्ही कोष समर्थ ठेवण्याविषयीं श्री. बाबासाहेबांनी योग्य तत्परता अनुभवास आणून दिली आहे.

## मराठीची आस्था

मराठींत चांगलें साहित्य निर्माण व्हावें म्हणून श्रीमंतांचे यथाशक्ति प्रयत्न चालू असतात. कै. हरिभाऊ आपटे, कै. वासुदेवशास्त्री खरे प्रभृति मंडळींचा श्रीमंतांशीं दृढ संबंध असे. श्रीमंतांची मराठी वाङ्मयाविषयींची आस्था व कार्य लक्षांत घेऊन श्रीमंतांस अखिल महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या येथील बाराव्या अधिवेशनाचें उद्‌घाटन करण्याचा मान इ. स. १९२७ मध्यें देण्यांत आला होता. आणि तें कार्य त्यांनीं यथानुरूप तडीसहि नेलें. या संमेलनाच्या वृत्तांतांत जें श्रीमंतांचें भाषण समग्र छापलेलें आहे, तें वाचणारास आजहि तें मननीय व माननीय आहे,

असें निश्चयानें वाटेल. ' देशी भाषा जाणणारे गव्हर्नर आपणांस यापुढें लाभोत ' अशी जी सदिच्छा श्रीमंतांनी त्या भाषणांत प्रारंभींच व्यक्त केली त्यांतील मार्मिक दीर्घसूचना लक्ष्यांत घेऊन कौतुक करणार नाही असा वाचक विरळाच आढळेल ! याच भाषणांत महाराष्ट्र-विद्यापीठ स्थापलें जावें म्हणून श्रीमंतांनी प्रतिपादिलें आहे. तसेंच न्या. रानडे यांची एक आठवण सांगून संस्थानिक, धनिक वगैरे वर्गास रक्षून ठेवणें कसें उपकारक होतें तें प्रसंगानें सांगून पुढील मननीय निष्कर्ष काढलेला आहे :—

' कित्येकांना हा वर्ग निरुपयोगी वाटतो, परंतु माझे मतें हिंदुस्थानांतील देशी संस्थानांचें अद्याप कार्य संपलेलें नाहीं व त्याचें अस्तित्व आणखी बरेच दिवस आपल्या देशाच्या उर्जितावस्थेला अवश्य आहे. '

अशीं विचारपरिप्लुत व मार्मिक भाषणें श्रीमंतांनी अनेक केलेलीं आहेत. तीं व त्यांचीं कायदेमंडळांतील भाषणें, तसेच श्रीमंतांचे लेख व ग्रंथ यांतून निवडक व महत्त्वाचा भाग हे संकलित करून एखादा ग्रंथच प्रसिद्ध झाल्यास तो फार उपयुक्त ठरेल आणि त्यामुळें श्रीमंतांचे नाना विषयांवरील अनुभविक व मार्मिक विचार पुष्कळ काळपर्यंत लोकांसमोर राहतील. आम्ही ही सूचना आग्रहानें करीत आहोंत, आणि श्रीमंतांकडून तीस मान्यता मिळेल अशी आशा आम्हांस आहे.

## ' माधवगिरीचें मर्म '

श्रीमंतांनीं आजरें तालुक्यांत ' माधवगिरी ' म्हणून जो एक गिरिविलास तयार करविला आहे आणि जेथें प्रतिवर्षी उष्णकाळांत श्रीमंत जाऊन राहतात ती योजना खरोखरच कौतुकावह व इतर राजेरजवाड्यांस अनुकरणीय आहे. एकतर या कामासाठीं जो पैसा खर्च झाला व होतो तो सर्व संस्थानांतच मूलतः राहतो. रस्ते व इतर सुखसोई प्रथम अशा रीतीनें उपलब्ध झाल्यावर प्रजाजनांपैकीं धनिक व समर्थ मंडळीस या सोईचा फायदा घेणें शक्य होऊं लागतें. आणि आपापल्या शक्तीप्रमाणें इतर प्रजाजनांसहि प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें सुखानुभव घेतां येतो. इंग्रज लोकांनी व सरकारांनी असे गिरिनिवास पुष्कळच बांधले आहेत. तेथेंच पुष्कळ खर्च करून व प्रसंगीं मानहानि सोसून आमचे स्वदेशीय लोक जातात त्यापेक्षां श्रीमंत बाबासाहेबांची योजना किती अनुकरणीय व लाभदायक आहे बरें ? कित्येकांना युरोपियन अधिकारी मंडळाच्या सहवासाच्या निमित्तानें त्यांच्या सान्निध्यांत तटलेलीं राजकारणें उलगडून घेण्याचे वगैरे सोईसाठीं तशाच ठिकाणीं जाणें अधिक उपयुक्त वाटतें. परंतु राजकारणी प्रकरणें उलगडून घेण्याचें कौशल्य कोणांत अधिक दिसून येतें आणि कोणाच्या बलाबलाचा कसा खेळ व परिणाम अनुभवास येतो याचा आढावा घेतल्यास श्रीमंत बाबासाहेबांचीच योजना अधिक श्रेयस्कर ठरेल असें आम्हांस वाटतें. महाबळेश्वराच्या गिरिवासाचा इतिहास सूक्ष्म दृष्टीनें पाहणारास कळून येईल कीं, त्या सातारा छत्रपतींच्या स्वराज्यांतील प्रदेशांत छत्रपतींचा असा एक निवासदेखील आजमितीला

अनुक्रम
क्रमांक .. २०२८ ...... नों: दि: ..११.२१२५

नाहीं ! या दुर्घटनेचा जितका विचार करावा तितकी श्रीमंत बाबासाहेबांची योजकता व दीर्घदर्शित्व मनांत अधिकाधिकच भरतें. श्रीमंत बाबासाहेबांचें अनुकरण जर अद्यापिहि आमचे राजेरजवाडे व संस्थानिक करतील तर आज पडीत स्थितींत दीनवाणीं दिसणारीं आणि अद्यापि आमच्या देशी राजांच्या सत्तेखालीं असणारीं कितीतरी सुंदर सुंदर आणि उत्तुंग गिरिशिखरें नंदनवनासारखीं प्रफुल्लित करतां येतील आणि आम्हांस स्फूर्तिप्रदहि होतील. त्यांचा जीर्णोद्धारचा जीर्णोद्धार होऊन नवीन युगानुरूप त्यांचें पुनरुज्जीवनहि होईल. पण आमचीं मनेंच कोठें देशी राहिलीं आहेत ?

## मानानें मिळालेलें मोठेपणाचें माप

श्रीमंत बाबासाहेबांच्या कर्तृत्वशीलतेची संपूर्ण कल्पना येण्यास्तव इचलकरंजी संस्थानचा थोडा इतिहास लक्षांत घेणें आवश्यक आहे. हें संस्थान आकारानें लहान असलें तरी मानानें मोठें आहे. पहा कीं, पहिले पेशवे बाळाजीपंत नाना अथवा बाळाजी विश्वनाथ यांची कन्या अनुबाई ही इचलकरंजीकर व्यंकटराव यांस दिल्यामुळें इचलकरंजीकर हे पेशव्यांचे जांवई झाले; आणि सुदैवानें अनुबाईसाहेब दीर्घायुषी निघाल्यामुळें या घराण्याचा मान राहण्यास मोठेंच साहाय्य झालें. दुसरें असें कीं, पेशवाईत पराक्रमानें पुढें आलेल्या पटवर्धन सरदाराचे मूळ पुरुष हरभटजी बाबा यांस व्यंकटराव नारायण यांनी आपलें उपाध्येपण दिलें. म्हणजे पेशव्यांचें जांवईपण व यजमानपण असे दोन मानाचे पदर इचलकरंजी घराण्यास लागले. तिसरा पदर मूळचाच होता. करवीरकर छत्रपतींचे सेनापति कापशीकर घोरपडे यांचे कारभारी नारो महादेव इचलकरंजीकर. परंतु हा मानच या संस्थानास भोंवला व अद्यापिहि भोंवत आहे म्हटलें तरी चालेल. करवीरकर आणि सातारकर या छत्रपति वृक्षाच्या दोन्ही खांद्यावर बसून दुलग राजकारण चालविण्याची अवघड व नाजुक कामगिरी या घराण्यांतील पुरुषांवर पडली. यांतून फळ असें निघालें कीं, इचलकरंजी संस्थान हें खालसा करता येणाऱ्या वर्गांत न पडतां कुल इनाम किंवा जहागीरवर्गांत पडलें. जोंवर मराठी सत्ता होती तोंवर घरांतलेच झगडे चालले. त्यांत आपलेपणाच्या ओलाव्याला धर राहिली. पण पुढें मराठी सत्ता इंग्रजांकडे आली तेव्हा जुनी पण खरी माया मावळली आणि नवीन इंग्रजी माया बळकावली ! ! या विचित्र परिस्थितीमुळें अनेक गुंतागुंती उद्भवल्या आणि इ. स. १७९५ नंतर श्रीमंत बाबासाहेबांकडे इ. स. १८९२ त अधिकार येईपावेतों इचलकरंजी संस्थानास फारच स्थित्यंतरें अनुभवावीं लागलीं. अपमृत्यूंचाहि फेरा संस्थानास कमी भोंवला असें नाही. यांतच 'दत्तक' प्रकरणाची भर पडली. ही सर्व गुंतागुंत सोडविण्यासाठीं श्रीमंत बाबासाहेब यांस किती खस्ता खाव्या लागल्या आहेत हें त्यांच्या जीवासच ठाऊक ! ! अशा खस्ता खाण्यांत श्रीमंत बाबासाहेबांची किती शक्ति क्षीण झाली असेल आणि केवढा मनस्ताप त्यांस सोसावा लागला असेल तो सांगून कळणार नाही. 'जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे' ही

उक्ति येथें सार्थपणें लागू होते. अशाहि स्थितींत श्रीमंत बाबासाहेबांनी आपली योग्यता व कीर्ति वाढवून संस्थानाची व राष्ट्राची प्रगति साधावी म्हणून किती प्रयत्न केले, आणि त्यांत केवढें यश मिळविलें याचा विचार केला म्हणजेच त्यांच्या मोठेपणाचें वास्तविक माप लागतें !

## गुणग्रहणाची मर्यादा

श्रीमंत बाबासाहेबांचा आणि आमचा परिचय यद्यपि वीस-पंचवीस वर्षांचा असला तथापि त्यांच्या बहुविध कामगिरीचें सर्वांगीण समालोचन करण्याइतका तो निकट नाही. तसेंच त्यांच्या सुराज्याची व्यवस्था डोळयांनी अवलोकन करण्याचाहि सुयोग आम्हांस लाभलेला नाही. तथापि अनेक निमित्तांनीं श्रीमंतांशीं आमचा जो संबंध आला त्यावरून त्यांच्या अंगाच्या अनेक गुणांचें निदर्शन घडून आलें त्याचा फार अनुकूल संस्कार आमच्या मनावर झाला. बहुधा प्रतिवर्षीं पुण्याचे मुक्कामांत जेव्हां जेव्हां श्रीमंतांच्या भेटीचा व भाषणांचा सुयोग येतो त्या त्या वेळीं त्यांच्याविषयींचा आदर वृद्धिंगतच होत गेलेला आहे. श्रीमंतांच्या सुराज्यव्यवस्थेविषयीं सर्व सारज्ञ व सुपात्र मंडळींकडून आम्हांस जें ज्ञान झालें त्यावरून श्रीमंतांची एतत्संबंधीं होणारी प्रशंसा सार्थ वाटण्यांतच त्याचें पर्यवसान झालेलें आहे. श्रीमंत बाबासाहेबांच्या थोरपणाचें मर्म सांगण्यास त्यांच्याशीं व त्यांच्या कार्यांशीं जितका अंतरंगांतला व निकटचा परिचय पाहिजे तितका नसतांनाहि प्रस्तुत गुणग्रहण करण्याचें धाडस आम्हीं केलें आहे. त्यामुळें यांत कांही कमीअधिक झालें असल्यास सहृदय वाचकांची क्षमा मागून हें समालोचन पुरें करतों.

— महाराष्ट्र, ऑक्टोबर १९४२

१

# कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री चिपळोणकर

## अलौकिक पितापुत्र

♣ ♣

सर्व आईबापांना मनापासून वाटतें की आपलीं मुलें 'बापसे बेटा सवाई' व्हावीं. आणि तशी धडपड आपली चालू असते. आशा कोणाला सुटली आहे ? असें आहे तरी-देखील बापापेक्षा बेटा सवाई निघाल्याचीहि उदाहरणें आपल्याला मिळतात. आपण अशा बापबेट्यांना भाग्यवान् म्हणतो. आपल्या मुलाबाळाना तिकडे बोट दाखवून तसं मोठं व्हा, खटपट करा, असा उपदेशहि करतों.

हेंच पहाना. पितापुत्र चिपळूणकरांचें उदाहरण घ्याना. कांही फार लांबची कथा नाही कीं पुराणांतलीं वांगीं नाहीत. आमच्या पिढींत आम्ही विशिपंचविशीला पोंचलों होतों. त्याच वेळीं वरील चिपळोणकर पितापुत्राची जोडी पाहिलेलीं वृद्ध वडील मंडळीं जिवंत होतीं आणि त्यांच्या तोंडून आम्ही या जोडीची तारीफ पुष्कळ ऐकिलेली आहे.

अलीकडील मंडळींना विष्णुशास्त्री यांचें नांव जितकें माहीत आहे तितकं कांहीं कृष्णशास्त्री यांचें नांव माहीत नाही. अन् तें साहजिकच आहे. कारण कृष्णशास्त्री यांचा जन्म झाला इ. स. १८२४ त. सव्वाशे वर्षे होऊन गेलीं की या गोष्टीला ! तर

पेशवाई बुडून नुकताच इंग्रजी झेंडा शनवारवाड्यावर फडकूं लागला होता. परशराम शाहीर पेशवाईची अखेर पाहिलेला; पण पुढला काळ पालटलेला पाहून त्यानं इंग्रजीला 'शककर्ता' म्हणून मुजरा केला ! मुंबईत तर इंग्रज केव्हांचे गाडून बसले होते. आतां त्यांनी पुणेंहि गिळून टाकलें. मुंबईत इंग्रजी व्यापार, इंग्रजी विद्या, इंग्रजी कला यांची छाप अगोदरच बसून गेली होती. इंग्रजी शाळाहि निघाल्या होत्या. आणि बुजत बुजत आरडत–ओरडत मुलांना या शाळांतून पालक पाठवूहि लागले लोते. इंग्रजी शिकले-ल्यांची चलती होण्यास कांही मुंबईत वेळ लागत नसे. आतां पुण्यावर इंग्रजी संक्रांत आली, तेव्हां हळूहळू पुण्यालाहि तेंच रूप येऊं लागलें. इंग्रजी विद्या पुढं सरकूं लागली. त्यावेळची एक गंमत सांगण्यासारखी आहे. शितावरून भाताची परीक्षा. इंग्रजी विद्येत असं निघालं कीं, आपली पृथ्वी गोल आहे. खरं म्हणजे आमच्या इकडे पृथ्वी गोल आहे अशी ऋग्वेदादिकांतील वचनें कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित वगैरे विद्वानांनी दाखवून दिलेलीं आहेत. पण पुढें तें ज्ञान त्या मंत्रांतच राहिलं आणि भलतीच विपरीत पौराणिक वर्णनं लोकांत पसरलीं. असो.

## इंग्रजी शीक !

जेव्हा इंग्रजी विद्येकडून ही गोष्ट पुढं आली, तेव्हां आमच्या पुण्यांतच वळे वगैरे प्राचीनाभिमानी मंडळी तें मत खोडून काढण्यासाठी पुढें सरसावली. त्यांनी एक पुस्तिका छापली देखील ! असा तो काळ. अर्थात् कृष्णशास्त्री यांचें शिक्षण जुन्या पद्धतीचेंच आधी झालें. वेदपठन, मग शास्त्राध्यायन. हें जुन्या शास्त्रांचं शिक्षण त्यावेळचे प्रख्यात पंडित आणि चतुर विद्वान् मोरशास्त्री साठे यांचेपाशी झालें. विद्यार्थी कृष्णा याची अप्रतिम बुद्धि पाहून अशी बुद्धि केवळ जुन्या शास्त्रांतच गुरफटून राहूं नये यासाठीं मोरशास्त्रीबोवांनी कृष्णास काळ–मान पाहून उपदेश केला, 'बाबा, खांद्यावर शालजोडी टाकून फिरण्याचे दिवस उरले नाहीत. करितां तूं यापुढं इंग्रजी शीक.' कृष्णास मोरशास्त्री 'बृहस्पति' म्हणत, अशी त्याची चपळ बुद्धि. कृष्णा वयाच्या पंचविसाव्या वर्षी इंग्रजी शिकूं लागला. बुद्धीचें हत्यारच मूळचें पाणीदार. इंग्रजींतहि कृष्णा भर्कन पुढं सरसावला. झालं, त्यावेळीं काय जरा इंग्रजी शिकला कीं नोकरी वाढून ठेवलेली. हा १८५२ सालचा सुमार. याच सालीं कृष्णशास्त्री यांनी लिहिलेलें 'साक्रेटिसाचें चरित्र' मराठींत प्रसिद्ध झालें. चरित्र लहानसंच आहे; पण मोठं सुरस आणि सुंदर साधलं आहे. एवढे विद्वान् असले तरी कृष्णशास्त्री यांनी लिहिलेलीं सारीं पुस्तकं शालेपयोगीच होतीं. तोच त्यावेळी प्रवाह होता.

या प्रवाहास अनुसरून पुण्यांत विश्रामबागेंत संस्कृत पाठशाळा होती, तिचें रूपांतर पूना कॉलेजांत झालें. कृष्णशास्त्री या कॉलेजांत मराठीचे असिस्टंट प्रोफेसर झाले. आमचे इकडील विद्वान् किती जाडे विद्वान् असेनात; मुख्याची जागा त्यांच्या वाट्याला क्वचितच यावयाची. कृष्णशास्त्री यांना अर्थशास्त्राची आवड विशेष. आतां

पूर्वी चाणक्यासारख्यांचीं अर्थशास्त्रें आमच्याइकडे होतीं. पण ती अध्ययनपरंपरा लोपल्याप्रमाणेंच होती. जिकडे तिकडे इंग्रजी ज्ञानाचा नवा सूर्य चमकूं लागला होता. इंग्रजींत 'अर्थशास्त्र' नवेंच उदयाला आलें होतें. पण इकडे तें विद्यार्थ्यांना नीट समजावयाचें, तर मराठींतच तें उत्तमरीतीने करणें शक्य होतें, म्हणून कृष्णशास्त्री यांनीं आपला अर्थशास्त्रपरिभाषा, नांवाचा ग्रंथ इ. स. १८५५ त प्रसिद्ध केला. प्रसिद्ध इंग्रज अर्थशास्त्री मिल यांच्या ग्रंथाधारें हा ग्रंथ तयार झाला आहे. याच्या आधी एकच वर्ष मुंबईचे प्रख्यात हरिकेशवजी यांनी कांहीसा मिल्चाच आधार घेऊन लिहिलेलें 'देशव्यवहारव्यवस्था' हें पुस्तक वाचण्यास व कळण्यास अधिक सुबोध व मनोरंजक वाटतें. कारण त्यांत संवादपद्धतीचा अंगीकार केलेला आहे.

## ग्रंथसंभार

कृष्णशास्त्र्यांचा यानंतरचा ग्रंथ 'अनेक विद्यामूलतत्त्वसंग्रह' हा होय. यांतल्या अनेक विद्या म्हणजे अनेक नवीन विद्या. या विद्यांची ओळख व्हावी यासाठीं हा ग्रंथ प्रसिद्ध केला. हा इ. स. १८६१ त प्रसिद्ध झाला. या पूर्वी संस्कृत भाषेचें व्याकरणाचें पुस्तक इ. स. १८५९ त त्यांचें प्रसिद्ध झालें होतें. वेळ पडली तर कृष्णशास्त्री सुबोध पद्यरचनाहि करीत. याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे त्यांची 'पद्य-रत्नावलि.' हिच्यांत कालिदासाच्या 'मेघदूता'चें सुंदर भाषांतर आलें आहे आणि शिवाय अनेक अन्योक्तिहि आहेत. छोटेसेंच परंतु पुस्तक वाचनीय आहे. थोरल्या शास्त्रीबोवांची ही 'पद्यरत्नावलि' इ. स. १८६५ त प्रसिद्ध झाली.

## सरकारी नोकरी

सरकारी नोकरींत शास्त्रीबोवांनीं अनेक जागांवर कामें केलीं. रिपोर्टर ऑफ् दि नेटिव्ह प्रेस – देशी वृत्तपत्रांचे निवेदक – हा शास्त्रीबोवांचा शेवटचा हुद्दा. शाळाखात्यासंबंधीं माहिती देणारें एक सरकारी मासिक 'मराठी शालापत्रक'हि त्यांना चालवावें लागलें. या शालापत्रकांत शास्त्रीबोवांनी मराठी व्याकरणावर दहा-पांच लेख लिहिले. ते आजहि विद्वानांना विचार करण्यासारखे वाटतात, अशी त्या लेखांची योग्यता आहे. शास्त्रीबोवांच्या गाढ्या विद्वत्तेची चमक या लेखांत उतरलेली आहे. हे लेख एकत्र करून छापले ते शास्त्रीबोवा वारल्यावर अनेक वर्षांनीं. याशिवाय अनेक मराठी लेखकांचे ग्रंथ त्यांस शुद्ध करून द्यावे लागत. शास्त्रीबोवांची भाषा सुबोध, सहज, सरळ आणि सोपी अशी आहे. तिचें वळण अगदीं बाळबोध आहे. इतकें सुरेख लिहिणें विद्यार्थ्यांसाठीं त्याकाळीं विरळाच होतें.

कृष्णशास्त्री खरेखुरे जाडे शास्त्री होते. पण त्यांचे प्रख्यात चिरंजीव विष्णुशास्त्री हे नांवाचेच शास्त्री. वडील शास्त्री म्हणून विष्णुपंत चिपळोणकरांनाहि ही शास्त्री उपाधि चिकटली. या विष्णुशास्त्र्यांचें शिक्षण नवीन इंग्रजी पद्धतीनेंच झालें. ते १८७२

बी. ए. झाले. वडिलांनी कांही स्वतःची विद्या चिरंजीवांना दिली नाही. विष्णुशास्त्री यांना हायस्कुलांत संस्कृत शिकवलें कृष्णशास्त्री वैजापुरकरांनीं. अबोलपणें आपला अभ्यास व्यवस्थितपणें विष्णुशास्त्री करीत. चाणाक्ष गुरूंच्या लक्षांत त्यांची हुशारी आणि मेहनत चटकन् येत असे. श्रवण आणि वाचन विष्णुशास्त्री यांनीं विपुल केलें आणि ज्ञानाचें भांडार सांठवलें. जेव्हा त्यांचे वडील शाळापत्रक चालवीत तेव्हा आळशी कृष्णशास्त्र्यांनीं बरेंचसें काम आपल्या तरतरीत मुलावर सोंपवलें. आणि त्यांनीं जेव्हां पाहिलें कीं, मुलगा सफाईने कलम चालवितो तेव्हां तर शाळापत्रकाचा कारभार सर्व आमच्या या धाकट्या शास्त्रीबोवांकडेच आला. प्रथम या शाळापत्रकांत ‘ संस्कृत कवी ’ या विषयावर त्यांनी लेख लिहिले. कालिदास, भवभूति, बाण, सुबंधु आणि दण्डी या पांच प्रसिद्ध कवींच्या कृतींचें रसग्रहण या उत्कृष्ट निबंधांतून विष्णुशास्त्री यांनी केलें. हे निबंध लोकांस फार आवडले. पुढें हे निबंध पुस्तकरूपानेंहि छापले गेले. संस्कृत कवींवरील लेखमाला पुरी होतांच लोकांकडून मराठी कवींवर अशाच प्रकारचे लेख यावे म्हणून मागणी आली. नाहीतरी शाळापत्रकाचा एक उद्देश शिक्षकास नवें ज्ञान देऊन त्याची उंची वाढवावी असा होता. तो विष्णुशास्त्री यानीं आपल्या रसाळ लेखांनी चांगल्यारीतीने सिद्धीस नेण्याचा प्रारंभ केला होता. मागणीप्रमाणे विष्णुशास्त्री यानी ‘ मराठी कविते-’ विषयीं लिहिण्याची योजना केली आणि प्रथम थोडा सलामीचा मजकूर लिहिला. त्यांत कांही अरसिक सल्लागार आणि अप्रबुद्ध मिशनेरी मंडळीं यांचे सांगण्यावरून सरकाराने पूर्वी एक मोठी चूक केली म्हणून टीका केली. पूर्वी नवनीतकर्ते आणि पहिल्या मराठी-मराठी कोशाचे एक संपादक परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्या सहाय्यानें डुकले नांवाचे गृहस्थ ‘ सर्वसंग्रह ’ नांवाचें एक मासिक काढीत असत. या सर्वसंग्रहांतून वामन, मुक्तेश्वर, मोरोपंत वगैरे प्रसिद्ध मराठी कवींची कविता प्रसिद्ध होत असे. किंबहुना याच कामाला हें मासिक पुस्तक वाहिलें होतें.

## शालापत्रक

या मासिकाला सरकारनें दिलेला आश्रय काढून घेतला आणि त्यामुळे मराठी वाङ्मयाच्या प्रकाशनाच्या कार्यास मोठा धक्का बसला अणि ‘ सर्वसंग्रह ’ बंद पडला. ही झालेली चूक विष्णुशास्त्री यांनी दाखविली. पण मराठी शाळापत्रक ‘ सरकारी ’, ‘ सर्वसंग्रहाचा ’ आश्रय काढून घेतला तेंहि सरकारच, आणि लेखक पडला सरकारी नोकर ! मग हें कसें खपावें ? पण मुख्याधिकारी चॅटफील्डसाहेब मोठा चाणाक्ष माणूस; कृष्णशास्त्र्यांचा पोशिंदा, विष्णुशास्त्री यांना कृष्णशास्त्री यांच्या घरी जाऊन ‘ विष्णूला पाठवा, चांगली नोकरी देतो ’ म्हणून माया दाखविलेला. त्याने आपलें ‘ शाळापत्रक ’ च कांहीं सबब सांगून बंद केलें आणि विष्णुशास्त्री यांचे मराठी कवितेवरील लेख पुढे कधीच लिहिले गेले नाहीत ! विष्णुशास्त्री त्यांच्या निःस्पृह लेखणीचा असा हा गुण थोडासा प्रत्ययास आला.

इकडे हें 'शाळापत्रक' प्रकरण शिजत होतें आणि तिकडे विष्णुशास्त्री यांचें प्रतापी मन पुढील उद्योगाचीं पावलें टाकून चालूं लागलें होतें. या उद्योगाचा प्रारंभ मात्र सहजासहजीं झाला. एकदा विष्णुशास्त्री व मित्रमंडळीं सहलीसाठी आळंदीला गेली. तिथें शास्त्रीबोवांचे मित्र जांभेकर म्हणाले कीं, 'शास्त्रीबुवा, तुम्ही एक स्वतंत्र मासिकच काढा.' पटलं शास्त्रीबुवांना आणि इ. स. १८७४ सालीं 'निबंधमाला' हें सर्वमुखीं नांव झालेलें मासिक शास्त्रीबुवांनी काढलें. मोठया कामाचा आरंभ प्रत्यक्ष जरी असा सहजासहजी झालेला दिसला, तरी त्या पूर्वी मनांत तसल्या कल्पना पुष्कळ आधींपासून धुमसत असतात. प्रत्यक्ष ज्वालेला अशी सहज घातलेली एखादी फुंकर पुरते. असो. या निबंधमालेचे एकूण ८४ अंक निघाले. पण एवढ्यानें मराठी सृष्टी इकडची तिकडे पालटून गेली. निबंधमालेची थोडी तरी चव घेतली नाही तो मराठी भाषेच्या एका तीर्थाला मुकला असेंच म्हणावें लागेल. शास्त्रीबोवांची लेखणी निबंधमालेंतून एखाद्या तरवारीप्रमाणें चमकली. विजेसारखा गडगडाटहि तिने केला. घटकाभर भोंवतालचें जग स्तिमित झालें. एवढें सामर्थ्य आपल्या मराठी भाषेंत आहे तर ? असें वाटून तरुण मंडळींची ईर्ष्या जागृत झाली. विषय पाहिले तर कोठें भाषांतर किंवा वक्तृत्व किंवा वाचन यांसारखे मिळमिळीत वाटावे; पण त्यांतहि शास्त्रीबोवांच्या लेखणीचा कडकडीतपणा अनुभवाला येतोच. एक तर ज्ञानाचा प्रसार, विद्येची आवड हा यांचा उद्देश होताच. असल्या विषयांपेक्षा उद्योगधंद्याचे, कलाकौशल्याचे विषय आम्हांस आज पाहिजेत म्हणून त्यावेळेस निघणाऱ्या 'दंभहारक' मासिकांत टीका आली. आणि जेव्हां का विष्णुशास्त्री यांनी आपलें धनुष्य सरसावून भडिमार केला, तेव्हा मंडळी चूपचाप झाली !

## लोकहितवादींचा समाचार

शास्त्रीबोवांच्या पुढीलपुढील लेखांतून तर सुधारकमंडळ आणि मिशनेरी मंडळ यांच्यावर कारण असो, नसो, सतत तोफा डागलेल्या आढळतात. शास्त्रीबोवांच्या मागील पिढींतील प्रख्यात पत्रलेखक लोक-हितवादी—गोपाळराव हरी देशमूख यांच्या शतपत्रांचा समाचार शास्त्रीबोवांनी निबंध—मालेतील लेखमालेंत घेतला. शास्त्रीबोवांचा युक्तिवाद प्रथम दर्शनी तरी मनाला भुरळ पाडल्याशिवाय राहात नाही. मग जेव्हा दुसरी बाजू निर्मळ मनाने अभ्यासावी तेव्हा युक्तिवादांत जेथें पोकळपणा किंवा एकांगीपणा किंवा विपर्यास असेल तेथें आपल्याला आपले स्वतंत्र मत बनवितां येतें. लोकहितवादींचें खरें चित्र शास्त्रीबोवांच्या लिखाणावरून जितकें ओंगळ वाटतें, त्यापेक्षां तो थोर पुरुष मोठा उदार, स्पष्टवक्ता, देशप्रेमी आणि खरा लोकहितवादी होता, हें सत्य ग्राह्य करावें लागतें. पण म्हणून लोकहितवादींच्या शतपत्रांतून भूस काय थोडें आहे ? शास्त्रीबोवांच्या टीकेचा प्रभंजन सुटला की हें सारें भूस उडून जातें. आजचें

आपलें काम लोकहितवादी किंवा शास्त्रीबोवा यांच्यासारख्या थोर पुरुषांच्या देण्यांतून ग्राह्य आणि सत्य तेवढें घेण्याचें आहे.

शास्त्रीबोवांची लेखणी तळपूं लागल्यावर मालेच्या तिसाव्या अंकांत युरोपिअन् इतिहासकारांच्या अज्ञानावर कडाक्याचा हल्ला त्यांनी केला. त्याने मस्तक भडकून ‘ एलिफास ’ या नांवाखाली मिस्तर जेकब यांनी मोठा गवगवा केला. त्याला झणझणीत उत्तरेंहि मिळालीं. पुढं शास्त्रीबोवांनी सरकारी नोकरीची रुपेरी वेडीच तोडली आणि पुण्यांत ‘न्यू इंग्लिश स्कूल’ची स्थापना टिळक–नामजोशी यांच्या साह्याने केली. लवकरच आपटे–आगरकरहि त्यांना मिळाले. त्यापूर्वीच त्यांनी चित्रशाळा आणि किताबखाना काढला होता. ‘ काव्येतिहाससंग्रह ’ म्हणून निराळेंच मासिक चालविलें होतें. पुढे ‘ आर्यभूषण ’ छापखाना त्यांनी काढला आणि ‘ केसरी ’ व मराठा हीं मराठी व इंग्रजी पत्रें चालू केलीं. शास्त्रीबोवांच्या पराक्रमाची हीं सात भव्य दालनें आहेत. असा हा थोर पुरुष अवघ्या बत्तिसाव्या वर्षी १८८२ त वारला ! केवढा हाहाःकार तेव्हा झाला.

कृष्णशास्त्री मोठे; पण बापांपेक्षा सवाई काय शतसवाई बेटा निघाला यात काय संशय ? कृष्णशास्त्री यांनीहि मिशनऱ्यांविरुद्ध ‘ विचारलहरी ’ चालविली; पण पुत्राचें तेज आगळेंच ! कृष्णशास्त्रीहि एकदा ‘ सस्पिंड ’ झाले होते. पण मुलाने सरकारी रुपेरी वेडीच तोडली आणि स्वतंत्र संसार उभा केला. केवढा नवा आणि भव्य आदर्श लोकांपुढें ठेविला ! कृष्णशास्त्री यांनी रासलेस अर्धे सोडलें; पण विष्णुशास्त्री यांनीं एकट्याच्या हिंमतीवर निबंधमाला चालविली ! अशा किती गोष्टी ! तरी एवढें कोणीहि म्हणेल की, असे पितापुत्र विरळा आढळतात. दोघांना आपण वंदन करूं या !

# १०

# डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर

## आमरण पंडित

♣ ♣

माझ्या पिढींतल्या शिकलेल्या मंडळींत क्वचितच कोणी असेल कीं ज्यानें रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचें नाव ऐकलेंच नाही! आताच्या पिढीविषयीं तितक्या खात्रीने बोलवत नाही. माझ्यावेळीं शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्कृत भाषा शिकावीच लागे. चाळीस पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट बोलत आहे ही मी! त्यावेळीं जिकडे तिकडे संस्कृत विषय शिकावयाचा तर डॉ. भांडारकरांच्या दोन पुस्तकांवरूनच! मुंबईकडेच नव्हे, बहुतेक साऱ्या हिंदुस्थानभर म्हटलें तरी चालेल. भांडारकरांनी संस्कृत शिकणारांसाठी पहिलें व दुसरें किंवा 'प्रवेशिका' आणि 'मार्गोपदेशिका' अशीं दोन छोटीं पुस्तकें लिहिलीं. दोन्ही इंग्रजींतच लिहिलीं. तो काळच इंग्रजीचा होता! काय विचित्र प्रकार पहा! भारत देश म्हणजे संस्कृत विद्येची जन्मभूमिच म्हटलें तरी चालेल. या भूमींत सारे महान् संस्कृत ग्रंथ जन्माला आले आणि मोटमोठे संस्कृत पंडितहि येथेंच होऊन गेले. पुढे देशी भाषा आल्या. त्यांचेहि मूळ संस्कृतांतच! आणि या देशांत नवीन इंग्रजी युगांतील शाळांत संस्कृत भाषा देखील शिकावी लागे इंग्रजीच्या द्वारां! मनाला धक्का बसावा असा हा विचित्र आणि उफराटा प्रकार नव्हे? आणि

शाळांत नसला तरी आज आमच्या विद्यापीठांतून अद्यापि तो चालू आहे!! असो.

भांडारकरांनीं आपलें पहिलें संस्कृत पुस्तक लिहिलें प्रथम इ. स. १८६४ सालीं! म्हणजे ८८ वर्षांपूर्वी! आणि दुसरें प्रसिद्ध केलें १८६८ सालीं! पहिलें पुस्तक लिहिलें त्यावेळीं भांडारकरांचें वय होतें सुमारें सत्तावीस वर्षांचें. त्यांचा जन्मच मुळीं १८३७ सालचा. पण या दोन पुस्तकांमुळें अनेक पिढ्या, अर्थात् इंग्रजी शिकणारांच्या, संस्कृतांत प्रवीण झाल्या! जुने लोक कांही होते ते आपले समासचक्र, रूपावली, अमरकोश, अष्टाध्यायी वगैरे ग्रंथ पाठ करून पुढें शास्त्र पढत असत. त्यांचें संस्कृत म्हणजे अगदी पक्कें पण तसें संस्कृत शिकण्याला बारा बारा वर्षें घोकंपट्टी करावी लागे! पण भांडारकरांनी आपलीं पुस्तकें अशा खुबीनें रचिलीं होतीं कीं, थोडक्या काळांत संस्कृत विद्येच्या भांडाराची किल्ली तरुण विद्यार्थ्यांच्या हातांत पडावी. त्यामुळें बारा वर्षांची घोकंपट्टी टळली, संस्कृत ग्रंथ लवकर समजूं लागून त्यांची गोडी विद्यार्थ्यांस लागू लागली, त्यामुळें आमच्या संस्कृतीचें प्रेम आमच्या विद्यार्थ्यांत जिवंत ठेवण्यास मोठी मदत झाली. नाहीतर इंग्रजीचें नवीन वारें सुटलें होतें त्यांत त्यांचीं डोकीं कितपत ठिकाणावर राहतीं कोण जाणे? शिवाय संस्कृत विद्येचेहि गुरुत्व मार्टिन हौ, कीलहॉर्न, बूल्हर प्रभृति युरोपियनांकडेच या काळीं गेल्यासारखें होतें. या युरोपियन विद्वानांनी नवीन चिकित्सक दृष्टीनें संस्कृत वाङ्मयाचें अध्ययन, एक जुनी मृत भारतीय भाषा आणि साहित्य या दृष्टीनेंच चालविलें होतें. शोधक आणि चिकित्सक असले तरी हे युरोपियन विद्वान् फार कसून अभ्यास करीत. या वेळीं जर्मन पंडितांचाच पाय या कामीं सर्वांत पुढें होता!

अशा स्थितींत भांडारकरांसारख्या देशी तरुण विद्वानानें हॉवर्ड-ग्रांटसारख्या अधिकाऱ्यांच्या प्रोत्साहनानें वरील दोन सुंदर पुस्तकें अशी निर्दोष तयार केलीं त्यामुळे तेवढेंतरी गुरुत्व आमच्या देशी विद्वानांकडेच राहिलें आणि तें दीर्घ काळ टिकलें. अशी टिकाऊ सेवा केल्याद्दल भांडारकरांचें ऋण आजवर प्रेमानें गाईलें जातें तें योग्यच म्हणावयास हवें. भांडारकरांनी मुंबईत उदयास येऊन यशाची पहिली पताका फडकाविली. या योगें मुंबईचा मान त्यांनी वाढविला यांत काय संशय? यशाच्या या पायावर भांडारकरांनी पुढें मजल्यावर मजले कसे चढविले तें पुढें दिसून येईल.

## बालपण

भांडारकरांचा बालपणींचा काळ म्हणजे अव्वल इंग्रजीच्या प्रारंभाचा काळ होय हें ध्यानांत बाळगिलें पाहिजे. त्यांचा जन्म आणि पहिलें मराठी शिक्षण मालवणास झालें. त्यांचे वडील गोपाळराव पत्की भांडारकर हे मामलेदारकचेरींत कारकून असल्यानें त्यांची बदली रत्नागिरीस झाली आणि येथें त्या काळच्या मानानें पाहतां अगदी अपूर्व योग आला तो हा कीं भांडारकर इंग्रजी शिकूं लागले! वयाच्या दहाव्या वर्षी ते रत्नागिरीस आले, अकराव्या वर्षी त्यांचे त्या काळच्या रीतीप्रमाणें

बाळपणींच लग्न झालें, पांच वर्षें त्यांनी रत्नागिरीस इंग्रजी शिक्षणांत काढली आणि पुढें शिकण्याची विलक्षण हौस पुरविण्यासाठी ते १८५३ त मुंबईस आले. त्या काळीं कोठल्या आगगाड्या नि मोटारगाड्या ! बैलगाड्यांतून, बोटींतून किंवा पायी प्रवास ! रत्नागिरी ते मुंबई हा त्या वेळीं कांही लहान आणि सोपा पल्ला नव्हे. पण रामकृष्णांचा निश्चय अगदीं दृढ. त्यांच्या आधींच्या पिढींतले रावसाहेब मंडलीक ! ते रत्नागिरीकडचेच. त्यांचा हुशार विद्यार्थी म्हणून लौकिक ऐकून आणि परीक्षेंतील त्यांचीं उत्तरें वाचून भांडारकरांनी मंडलिकांचें उदाहरणच डोळ्यापुढें ठेवून मुंबई गाठली !

भांडारकर जातिवंत विद्यार्थी होते. शेंडी खुंटीला बांधून त्यांनी अभ्यास केला. १८५४ त पहिला नंबर परीक्षेंत मिळविला. अनेक छात्रवृत्त्या पटकावल्या. विद्याखात्याचे प्रमुख मिस्टर हॉवर्ड यांनी या मुलाची हुशारी पाहताच हेरून ठेविली आणि १८५९ त जेव्हां पेशव्यांच्या दक्षिणा-जमेंतून नवीन शिष्यवृत्ति, फेलोशिप्स स्थापन केल्या तेव्हां रामकृष्णपंत पहिले दक्षिणाफेलो नेमिले गेले. फेलोमंडळींस शिकावें लागे आणि शिकवावेंहि लागे. पांच साडेपांच वर्षें पंत फेलो होते आणि त्या अवधींत कांही मुंबईत तर कांही पुण्यांत त्यांनी अध्यापन केलें. लवकरच हॉवर्डनें त्यांस रत्नागिरी हायस्कूलचे हेडमास्तर नेमिले. रामकृष्णपंत हेच पहिले हिंदी हेडमास्तर. नाहीतर तोंवर ही जागा सुद्धा युरोपियनांचे राखीव कुरणांपैकीच होती.

## दादाभाई नौरोजींचें अध्यापन

मुंबईस शिकत असतां कांही दिवस मरहूम देशभक्त दादाभाई नौरोजी हे भांडारकरांचें वर्गावर गणित शिकवीत, आणि आश्चर्य हें की भांडारकरांचा आवडता विषय गणितच होता ! संस्कृत ते पुढें शिकले. एकदा रावसाहेब मंडलिकांनी मोरोपंती आर्या परीक्षेंत विचारल्या. तेव्हा पंत आणि मंडळीस संस्कृत शिकण्याची बुद्धी झाली. प्रथम बाळोबा पाध्ये मग गोविंदशास्त्री देव आणि विशेषतः अप्पाशास्त्री खाडिलकर यांजजवळ आणि पुढे पुण्यास अनंतशास्त्री पेंढारकर आणि बाळशास्त्री देव अशांसारख्या पंडितांजवळ भांडारकर संस्कृत पढले. संस्कृत शिकण्याशिकविण्यासाठी तर भांडारकरांनी पुस्तकें रचिलीं. तरी त्यांस जी संशोधनाची गोडी लागली तिला सहज कारण घडून आलें. एका पारशी गृहस्थानें जमिनींत पुरलेला एक जुना ताम्रपट यांचेकडे दिला. मग तो वाचण्यासाठी यांनी प्रिन्सेप् वगैरे युरोपियन पंडितांचे ग्रंथ वगैरेंचा अभ्यास करून तो वाचला आणि त्यावर निबंधहि सादर केला. असा त्यांचा प्रवेश संशोधनांत झाला. प्रवेश केल्यावर मग त्यांनी या संशोधन कार्यांत इतकी प्रगति केली की त्यांची कीर्ति या देशांतच काय पण परदेशांतहि दुमदुमून गेली. सुमारें पन्नास वर्षें त्यांच्या विद्वत्तेचा डिंडिम वाजत राहिला. त्यांचे विद्याव्रत अखंड चालू राहिलें.

या विद्याव्रताची मुख्य अंगें दोन, एक अध्ययन आणि दुसरें अध्यापन. या

प्रत्येकाचीं पुनः दोन दोन अंगें समजावीं. अध्ययनाचें एक अंग ज्ञाताचा अभ्यास आणि दुसरा अज्ञाताचा शोध. अध्यापनाचींहि अंगें दोन. आपल्या विद्यार्थ्यांस ज्ञानदान आणि दुसरें ज्ञानी केलेल्या विद्यार्थ्यांस पुनः ज्ञानदानाच्या परंपरेंत गोवणें. हीं सर्व कार्यें भांडारकरांनी उत्कृष्टपणें, एकनिष्ठेनें केलीं आणि त्यांत अपूर्व साफल्य प्राप्त करून घेतलें. भांडारकरांच्या या महनीय सेवेमुळें त्यांची व्यक्तिशः कीर्ति झालीच परंतु ज्या मुंबईपुण्याचे ते रहिवासी झाले त्या गांवांचीहि नांवें त्यांच्या सेवेमुळे सर्वतोमुखीं झालीं. मग त्यांस जर कोणी त्या गावच्या कीर्तीचे कर्ते किंवा कारागीर म्हटलें तर तें उचितच म्हणावयास नको काय ?

पहा कीं, भांडारकर मुंबईस विद्या शिकले त्यावेळीं मुंबई विद्यापीठ स्थापनच झालें नव्हतें. लवकरच तें स्थापन झालें तेव्हां त्यांना ते शिक्षक होते तरी मॅट्रिकला बसावें लागलें. शाळेंत पहिले, पहिले दक्षिणा फेलो, पहिल्या मॅट्रिकमध्यें उत्तीर्ण, १८६२ पहिल्या बी. ए. त पहिल्या वर्गांत आलेले, पहिलें हिंदी हेडमास्तर, संस्कृतविषयाचे पहिले हिंदी प्रोफेसर, मुंबई विद्यापीठांत वुइल्सन् यांच्या नांवानें जी नैरुक्तिक व्याख्यान-वृत्ति स्थापन झाली तिचे पहिले संपादक, १९०४ मध्यें मुंबई विद्यापीठातर्फे एल्. एल्. डी. ही सर्वोच्च सन्मान्य पदवी मिळवणारे पहिले देशी पंडित, त्या विद्यापीठाचे दीक्षान्त भाषण देण्याचें भाग्य उपभोगिलेले पहिले देशी कुलगुरु असा अनेक ठिकाणीं विद्या-क्षेत्रांत पहिलेपणाचा श्रेष्ठ मान सार्थपणें पावलेले भांडारकर केव्हांहि पहिल्या नमस्काराला पात्र कां न गणावे ? भांडरकरांच्या आधींच्या पिढींत पहिलेपणाचा असाच सन्मान भोगून गेलेले बाळशास्त्री जांभेकर यांची आठवण या निमित्तानें यावेळीं कोणास झाली तर त्यांत आश्चर्य नाहीं.

अशा विद्वानांवर सर्वत्र सन्मानाचा वर्षाव झाला तर तें गुणज्ञपणाचेंच लक्षण समजलें जाईल. भांडारकर यांस इंग्लडांतील रॉयल् एशिआटिक सोसायटी, जर्मन आणि अमेरिकन् ओरिएंटल सोसायटी, रशियांतील अकॅडेमी, बोहेमियन् सोसायटी वगैरे विद्वन्मंडळींचें सन्माननीय सदस्यत्व अर्पण करण्यांत आलें. यामुळें भारतीय पांडित्याचा ध्वज जगभर फडकला. तो तसा फडकविणारा 'थोर कारागीर' नव्हे तर काय म्हणावा ?

भांडारकरांचे मुख्य तीन ग्रंथ. एक 'दक्षिण'चा प्राचीन इतिहास. यांत नाशिक लेण्यांतील लेखांवरून व अनेक ताम्रपटांच्या व इतर लेखांच्या आधारें सातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य आणि यादव या घराण्यांच्या वंशावळी जुळवून मोठें प्रामाणिक व साधार वृत्त रचून दिलें आहे. हा ग्रंथ नव्हता तेव्हां सारा अंधार होता. अद्यापहि हा ग्रंथ आधारभूत मानतात. असें पक्कें काम भांडारकरांनी केलें. दुसरा ग्रंथ भाषा-शास्त्रावरील सात व्याख्यानांचा. यांत संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश व देशी भाषा यांचा एकांतून एक असा विकास कसा झाला तें शब्दरूपांची वगैरे चिकित्सा करून शास्त्रशुद्ध रीतीनें दाखवून दिलें आहे. हेंहि काम भक्कम, पायाशुद्ध झालें आहे. तिसरा ग्रंथ अगदीं वृद्धपणीं पुण्यास तयार केला व तो जर्मन मालेंत प्रसिद्ध झाला त्यांत शैव

क्रमांक ....9022.... नों. दि. 21.4.92


आणि वैष्णवपंथांच्या गुंतागुंतीची सप्रमाण उकल केली आहे. न ढळणाऱ्या स्तंभांसारखी या तीनहि ग्रंथांची बांधणी साधली आहे. हे ग्रंथ वाचल्याशिवाय त्या त्या विषयांत पाऊल पुढें टाकतांच यावयाचें नाही.

## ईश्वरभक्त भांडारकर

भांडारकर केवळ पंडित नव्हते. ते मोठे ईश्वरभक्त होते. तुकोबाच्या अनुभवी अभंगांवर त्यांची अपार भक्ति होती. पण दगडाच्या मूर्तींत देवाला कोंडणें व तसें भजणें त्यांस बिलकुल मान्य नसे. तुकोबांचे पुढील शब्द ते वारंवार आठवून सांगत. ' देवधर्म सांदी पडिला सकळ । विषयीं गोंधळ गाजतसे ', ' रात्रिंदिस न पुरे कुटुंबाचें समाधान । दुर्लभ दर्शन ईश्वराचें '— तो ईश्वर अचिंत्य, सर्वगुणसंपन्न, दयाब्धि, सर्वांनीं सतत आठवावा आणि सत्य स्मरून प्रपंच करीत राहावा ही त्यांची शिकवण असे. ' सत्कार्यें हीं पुष्पें होत. तीं वाहून संसारमंदिरीं देव पुजावा. ' असें भांडारकर कळवळून उपदेशीत. ते अशींच कीर्तनेंहि रचीत. स्वतः भगवीं वस्त्रें पांघरून त्यांनी केलेलें सुंदर कीर्तन आम्ही ऐकिलेलें आहे. रागदारीवर ते अभंग म्हणत. स्वतः पदें रचीत. आमचीं उपनिषदें त्यांस फार आवडत. आपल्या पूज्य ग्रंथांतून चांगला भाग आधारास घेऊन खरी धर्मबुद्धि व उपासना वाढवावी, खोटे आचार टाकावयास लावावे असा त्यांचा संदेश असे. ' प्रपन्न प्रलपित ' शरणागताची बडबड हें नांव त्यांनी या व्याख्यानांस दिलें होतें. तो ग्रंथ प्रसिद्ध आहे आणि सर्व ईश्वरभक्तांनी मनन करण्यासारखा आहे. समोर मूर्ति नाही, सर्वत्र भरलेला परमेश्वर उभा आहे असें समजून ते प्रार्थना करीत. या उद्देशानें मुंबईस स्थापन झालेल्या प्रार्थनासमाजाचे ते मार्गदर्शक गुरु होते. ते थोर सत्यभक्त, देवभक्त, समाजसुधारक, शीलवान्, विद्वान् सद्गृहस्थ असल्यानें त्यांच्या पांडित्याला निराळेंच तेज चढलें होतें. इंग्रजी विद्येनें नास्तिक बनणाऱ्यांची त्यांस कींव वाटे.

असें होतें तरी फारच थोडे लोक भांडारकरांच्या बाजूला वळले. मूर्तिपूजा पाप नाही परंतु तशी श्रद्धा नसतां ती भासविणें पाप असें ते म्हणत ! लोकांनी मूर्ति सोडल्या नाहीत पण जुने आचार, जुन्या समजुती याहि पुष्कळांनी सोडल्या नाहीत. भांडारकर जातिभेद मानीत नसत. मूळ जुन्या धर्मांत फार उच्च तत्त्वें आहेत पण असले भेदाभेद हे अमंगळ भ्रम असल्याने ते टाकून समाज शुद्ध केला पाहिजे, सुधारला पाहिजे असें भांडारकर म्हणत. आज तर काळ फार बदलला आहे. पण भांडारकरांच्या वेळी फार निराळी स्थिति होती. त्यावेळीं सुधारक व सनातनी असे तट पडले, वाद झाले, उखाळ्यापाखाळ्या, विरोध आणि कधी कधी तर मारामाऱ्या येथपर्यंत मजल जात असे. सरकारने धर्मांत हात घालू नये असें एक पक्ष म्हणे, उलट चांगली सुधारणा कायद्याने केली पाहिजे असें दुसरा पक्ष म्हणे. तसे कायदे करण्याचे प्रसंग आले असतां मोठी हमरीतुमरीहि होत असे.

स्त्रियांना शिक्षण दिलेंच पाहिजे. पण अण्णा कर्व्यांना स्त्रीशिक्षणाचे कामी केवढा त्रास व उपहास सहन करावा लागला हें आज त्याना 'महर्षि' मानणाऱ्यांच्या एकाएकी ध्यानांत यावयाचे नाही. पण भांडारकर स्त्रीशिक्षणाचे बाजूनें भांडत राहिले. म्हणून कर्व्यांनी विद्यापीठ काढलें तेव्हा त्याचे पहिले कुलपति भाडारकरांस निवडले! मद्यपानबंदीच्या बाजूनें भांडारकर असत. टिळकहि त्याच बाजूचे म्हणून पुण्यांत एका सभेस टिळक वक्ते, भांडारकर अध्यक्ष असा धन्य योग जुळून आलेला आम्हीं पाहिला. कोणचाहि सुधारणेचा प्रश्न निघाला की भांडारकरांची दृष्टि प्राचीन ग्रंथांकडे वळे आणि त्यातील उदार व अनुकूल वचनें ते पुढे मांडीत. या दृष्टीनें अभ्यासी मंडळीस त्यांचें लेख आणि व्याख्यानें नेहमी मार्गदर्शक होत. अजूनहि त्यांचें महत्त्व टिकून राहिलें आहे.

अस्पृश्यता घालविलीच पाहिजे असें त्यांचे निक्षून सागणें असे. एका महारबोवांचें कीर्तनहि त्यानी घरीं करविलें होते. पुनर्विवाहाला ते अनुकूल होते आणि त्यांनी आपल्या घरीं परतलेल्या मुलीचा पुनर्विवाह लावून दिला. निमंत्रणावरून ते 'वीनिपुरी' म्हणजे व्हिएन्ना येथील प्राच्यविद्या परिषदेस हजर राहून तेथें आपली सखोल विद्वत्ता प्रकट करून आले. त्यावेळी संस्कृतांत श्लोक रचून आभार मानतांना ते म्हणाले — 'राष्ट्रानां स्नेहभावाय विग्रहस्य शमाय च। कल्पतामीदृशी संसन्मनुजानां च भूतये'. तें आजहि पुनः म्हणण्यासारखे आहे.

# ११

## चिं. ग. कर्वे

## मराठीचे कोशकार

☘ ☘

केंद्रीय हिंदी शिक्षण मंडळ संस्थेच्या प्रशासक मंडळाच्या बैठकीसाठीं मी आग्रा येथे जाऊन तावडतोब परत आलों, तोंच माझे एक जिव्हाळ्याचे सहकारी श्री. चिंतोपंत कर्वे यांच्या निधनाची अति दुःखद बातमी वाचावयास मिळाली. जाण्यापूर्वी श्री. कर्वे यांना भेटण्याचा विचार गर्दींतच केला होता. परंतु डॉक्टरांनीं थोडें सचिंत होऊन सांगितलें, "ते फार थकले आहेत पण आल्यानंतर भेटलें तरी चालेल!" काळाची योजना कोणालाच कळत नाहीं, हेंच खरें! आतां कसली भेट? चिंतोपंत गेला सुमारे दीड महिना आजारीच होते. ते सहसा आजारी पडत नसत आणि त्यांचें वय जरी ६५ च्या पलीकडे होतें, तरी वृद्धत्वाची छाया त्यांच्यावर पडलेली दिसत नव्हती. काळ त्यांचें हरण करील, अशी शंका त्यामुळें कधीच वाटत नव्हती.

### *वृद्धापकाळीं आघात!*

त्यांचा आवडता मुलगा चि. चंद्रशेखर हा कलिंग विमान कंपनींत काम करीत असे. तो इराणांतील बहरीन सामुद्रधुनीवरून सुखरूप उड्डाण करून निघाला नाहीं, तोंच विमानतळावर येऊन पोचलेलें त्याचें विमान, कसें कोणास ठाऊक, पण कोणी लुच्यानें दुसऱ्या दिशेला वळविलें; तेव्हांपासून विमानाचा आणि

चंद्रशेखरचा पत्ता नाहीं! कळलेल्या हकीगतीवरून असा संशय येतो कीं, कोणीतरी चोरटा व्यापार करणाऱ्यांनी हा दगा दिला असावा. कसून शोध करूनहि, भर दिवसा घडलेल्या ह्या भुलावणींत विमानाला अपघात झाल्याचें दिसत नाहीं. पण जों जों दिवस जाऊं लागले, तों तों चिन्तोपंतांचा धीर खचूं लागला. हळूंहळूं ते मंडळींत वावरू लागले; तरीहि अंतर्यामीं हाय खाल्ल्याची स्पष्ट चिन्हें त्यांच्या चेहऱ्यावर दिसत. या स्थितींत त्यांनी अंथरूण धरलें आणि ते थकत चालले. तेव्हां अधिक तपासणींत त्यांना मधुमेह असल्याचें आणि तो बराच प्रबळ झाल्याचें दिसून आलें! हातपाय सुजले, थकवा वाढला, तरी त्यांचा अंत समीप आला असें वाटलें नाहीं, पण शुक्रवार ता. १६ रोजीं दुपारी १२ च्या सुमारास त्याचें प्राणोत्क्रमण झालें.

## घराणें

चिंतोपंतांचा जन्म बडोद्यास ४ फेब्रुवारी १८९३ रोजी झाला. कर्वे-घराणें हें पेशव्यांचें उपाध्याय-घराणें! चिंतोपंतांची शाखा पुणें जिल्ह्यांतील आतां मुळशी धरणांत गेलेल्या आपळसभोरकर गांवाची होती. आणि चिंतोपंतांच्या हातीं पेशव्यांच्या कुलाचाराचे आणि तर्पणादिकांचे सर्व तपशील असलेली एक वही आली होती. ती अद्याप प्रसिद्ध झालेली नाही. पण प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे. चिंतोपंतांच्या निकट आप्तांची एक शाखा बंगळूरकडे नांदत आहे आणि शिल्पशास्त्री म्हणून त्या शाखेंतील मंडळींनी चांगला लौकिक कमविला आहे. बंगळूरच्या ह्या संपर्कामुळें चिंतोपंतांना कानडी भाषा अवगत झाली होती, तथापि त्यांचे शिक्षण पुण्यांतच न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्यूसन कॉलेजांतच झालें. ते गणित घेऊन पदवीधर झाले. तो काळ राष्ट्रीय उत्थानाच्या चळवळींचा होता.

## केतकरांचे सहकारी

इकडे वऱ्हाडांतून अमेरिकेंत जाऊन तेथें संशोधनानें उच्च पदवी मिळवून आणि अनेक अभिनव कल्पना बरोबर घेऊन हिंदुस्थानांत परत आलेले श्रीधर व्यंकटेश केतकर ह्यांनी नागपुरास आपल्या मराठी ज्ञानकोशाची प्रचंड योजना हातीं घेतली होती. तथापि ह्या योजनेच्या सिद्धीसाठी ते वऱ्हाड सोडून पुण्यास आले. वऱ्हाडांत असतांनाच श्री. य. रा. दाते हे त्यांना मिळाले होते. आणि पुण्यास आल्यावर श्री. चिंतोपंत कर्वेहि केतकरांच्या कोशमंडळांत सामील झाले. केतकर हे अचाट सामर्थ्याचे गृहस्थ होते. त्यांनी आखलेली मराठी ज्ञानकोशाची योजना आणि तिच्या सिद्धीसाठीं केलेली 'कंपनी' पद्धतीची घटना हें सर्वच कांही अलौकिक होतें! परंतु दाते आणि कर्वे हे दोन तरुण आणि खंबीर सहकारी अखेरपर्यंत त्यांना चिकटून राहिले. केतकरानीं आपलें संपादक मंडळ शिकवून तयार केलें.

आणि याच शिक्षणानें कर्वे हे एक मोठे कोशकार झाले! केतकरांचा मराठी

ज्ञानकोश तेवीस खंडांचा आहे आणि प्रथम काढलेली वाङ्मय-सूचि धरली तर मोठाले २४ खंड होतात. एवढा आणि अशा प्रकारचा हा प्रचंड व्याप अखिल भारतांत पहिलाच म्हटला पाहिजे ! सर्व विषयांवरील ज्ञानाचें संकलन मराठीभाषेंत अकारविल्हे कोशाच्या रूपानें ज्ञानकोशांत संग्रहित करावयाचें होतें. केतकरांच्या ज्ञानकोशाचे पहिले पांच खंड हे केवळ संग्रहात्मक नसून मुख्यतः विवेचनात्मक आहेत. जग आणि हिंदुस्थान, वेदकाल, बुद्धकाल असे गहन विषय एकेका विस्तृत खंडात श्री. केतकरांनी समाविष्ट केले आहेत. आणि त्यांत त्यांच्या त्या प्रज्ञेची प्रभा सर्वत्र पसरलेली दिसते. या खंडाच्या निमित्तानें ज्ञानाचें संकलन करण्याची कला शिकण्यास केतकरांच्या हाताखालीं कर्वे यांना अमूप संधि मिळाली. भरपूर वाचन आणि अभ्यास घडला. बुद्धीचा आणि ज्ञानाचा विस्तार झाला, कोशविद्येचें मर्म हातीं आलें आणि मांडी मोडून नियमितपणाने परिश्रम करण्याची संवय लागली. कर्वे हे या उद्योगांत अगदीं रंगून गेले. केतकरांची इच्छा कांहीहि असली, तरी एवढ्या प्रचंड उद्योगासाठी करावी लागणारी सर्व जुळवाजुळव त्यांनीं म्हणूनच केली – दुसऱ्या कोणाच्यानें हें पर्वतप्राय कार्य उठतें ना ! सरकारी वा बिनसरकारी कसलीहि देणगी न घेतां भाग विकून, ' कंपनी ' या पद्धतीनें हा ज्ञानाचा प्रचंड जगन्नाथाचा रथ त्यांना ओढून न्यावयाचा होता. ह्या ओढण्याच्या कामीं कर्वे दाते यांची जोडी त्यांच्या कामाला आली. कर्वे प्रापंचिक होते आणि या केतकरी खाक्यांत शाश्वतीची आशा धरण्यास मोठें धैर्यच अंगीं असावयास पाहिजे होतें. तशी चिकाटी आणि धैर्य दाते-कर्वे या जोडीने दाखविलें आणि केतकरांचा ज्ञानयज्ञ सांगतेला गेला ! कर्वे यांचा प्रपंच कसाबसा चालला. परंतु त्यांनी कधी तोंड वेंगाडलें नाहीं किंवा आपल्या ज्ञानानंदांत उणेपणा येऊं दिला नाहीं. एक ज्ञानकोश सांगतेला गेला पण पुढें उभा केलेला मांड मोडावा लागला आणि केतकरांचें त्रिकूट फुटलें.

## महाराष्ट्र शब्दकोशाची योजना

तेव्हां दाते-कर्वे यांनीं हिंमत न सोडत महाराष्ट्र शब्दकोशाची योजना स्वतःच्या बळावर केतकरी पद्धतीचा नवा प्रयोग करून हातीं घेतली आणि आपल्या चिकाटीमुळे जो विश्वास त्यांनी समाजांत संपादन केला होता, त्या बळावर सुमारें सात खंडांत महाराष्ट्र शब्दकोशाचें कार्य पुरें केलें. ज्ञानकोश आणि शब्दकोश हीं दोन कार्यें सिद्धीला नेण्यांत श्री. कर्वे यांचे पुष्कळ परिश्रम आहेत. शब्दकोशानंतर दाते-कर्वे या जोडीने वाक्-संप्रदाय हा कोश पुरा केला. ह्या तीन कोशांच्या यशस्वी सिद्धींत या जोडीचीं २५ वर्षें गेलीं ! इतकें रेटल्यावर दाते-कर्वे हे दोघेहि वेगळे झाले.

## य. गो. जोशी प्रकाशनांत

तथापि कर्वे यांना हातीं धरणारा एक तिसराच धाडसी लेखक अन् प्रकाशक आतां भेटला. हे गृहस्थ म्हटले म्हणजे आपल्या विशिष्ट शैलीच्या

लेखनाच्या बळावर स्वयंप्रज्ञेने पुढें आलेले श्री. य. गो. जोशी हे होत. ज्ञानकोश मिळेनासा होत चालला होता. तेव्हा एक सुटसुटीत असा 'सुलभ विश्वकोश' प्रसिद्ध करण्याची योजना कर्वे जोशी ह्यांनीं आंखून सिद्धीला नेली. चिकाटीनें अन् निरलसपणानें मोठालीं कामें सिद्धीस नेण्याचें आपलें सामर्थ्य श्री. कर्वे ह्यांनीं महाराष्ट्रीय जनतेच्या प्रत्ययास आणून देऊन जनतेचा विश्वास संपादन केला होता. श्री. यशवंतराव जोशी हेहि असेच आपल्या गुणांच्या सामर्थ्यावर वाढले होते. ऋण काढावें, ग्रंथ काढावे, ऋण फेडावें; पुढें जावें, पुन्हां तसेंच करावें. लोकांच्या बुद्धीला खाद्य पुरवावें आणि जनतेच्या हातीं ज्ञानसमृद्ध ग्रंथ द्यावेत, हा यशवंतरावांचा हव्यास होता. कर्वे यांच्यासारखा हातखंडा आणि खंबीर 'कोशकार' जोडीला आल्यावर ह्या दोघांनी नवमहाराष्ट्राच्या सज्ञानतेसाठीं महाराष्ट्र-परिचय ह्या ग्रंथाची योजना केली. तज्ज्ञ लेखक मिळविले. तोहि सुंदर ग्रंथ प्रकाशित केला. कर्वे यांची जोड झाली नसती, तर जोशी यांनी कोशकार्याकडे आपली शक्ति वळवली असती कीं नाहीं, तें सागणें कठीण आहे!

## आपटे कोशाचें परिवर्तन

सुलभ विश्वकोश व महाराष्ट्र परिचय हीं दोन कामें संपल्यावर, दुर्मिळ परंतु अभ्यासकांना सतत उपयुक्त वाटणारा असा कै. वामन शिवराम आपटे यांचा संस्कृत-इंग्रजी कोश पुनर्मुद्रित करण्याचें काम ह्या जोडीनें हातीं घेतलें. ह्या कामी आपल्या एकाग्र आणि निरलस ज्ञानोपासनेनें प्रतिष्ठा पावलेले भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेचे डॉ. परशुरामपंत गोडे, ह्या संस्कृत पंडिताची जोड मिळवली. अशा कामाला अनेक सहाय्य लागतें, तेंहि मिळविलें. पुनर्मुद्रणाचा मूळ संकल्प बदलून नवीन भर घालून कोश वाढविण्याचा संकल्प कर्वे आणि गोडे हे दोन अनुभवी सिद्धहस्त पंडित होते, म्हणूनच सिद्धीस जाऊं शकला. ते राबूं लागल्यावर आपटे कोशाची त्रिखंडात्मक परिष्कृत आवृत्ति सिद्धीला गेली आणि राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद यांनी जातीनें येऊन ह्या कार्याचा गौरव केला, ह्यांत नवल काय? ह्या पुढें आपटे यांचा इंग्रजी-संस्कृत कोश पुनर्मुद्रित करण्याचा त्यांचा हेतु होता, परंतु कर्वे यांस काळानें आपल्यांतून नेलें आहे आणि ही निर्माण झालेली पोकळी कशी भरून निघेल ही, मोठी चिंता आहे. जोशी यांचा तर एक हातच निखळल्यांसारखा झाला आहे.

## शिक्षण क्षेत्रांतील कार्य

कोशरचनेची अशी किचकट कार्ये पार पाडीत असतांनाच कर्वे ह्यांनीं दुसऱ्या अनेक उद्योगांत लक्ष घातलें. दाते आणि कर्वे ज्ञानकोशांत काम करीत असतांना रात्रीच्या शाळेची योजना त्यांनी हातीं घेतली. ह्या शाळेचें आतां भव्य असें सरस्वती मंदिर पुण्यांत चिरस्थायी झालें आहे. जिल्ह्यांत कांही ठिकाणीं ह्या मंडळींनी शाळा चालविल्या होत्या, त्याहि पुढें चालू आहेत. सरस्वती

मंदिराच्या ह्या रात्रशाळेंतून अनेक गरीब व हुशार विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाची संधि मिळाली आहे. नवे उत्साही चालक हीं कामें आतां पुढें चालवीत आहेत.

## महाराष्ट्र साहित्य परिषदेंत

कर्वे ह्यांनीं महाराष्ट्र साहित्य परिषदेची धुराहि पुष्कळ वर्षे वाहिली होती. मुंबईत एक प्रकारच्या निष्क्रियपणाच्या गर्तेत रुतून राहिलेली परिषद पुण्यास आणण्याचा आणि तिला सजीव बनविण्याचा जो उद्योग झाला, त्या कामीं श्री. नानासाहेब चाफेकर, प्रभृति मंडळींना कर्वे ह्यांचें फार साध्य झालें. त्या कठीण काळांत महाराष्ट्र साहित्य ' परिषदेचे एक चिटणीस म्हणून कर्वे ह्यांनीं काम संभाळलें. चाफेकरांच्या कारकीर्दीत साहित्य परिषदेचें पहिलें मंदिर उभारलें गेलें. त्या कामीं पडलेले कष्ट सोसण्यांत कर्वे प्रमुख होते. १९२७ सालीं पुण्यांत भरलेल्या साहित्य सम्मेलनाचे कर्वे हे एक चिटणीस होते. त्या संमेलनाचा अहवाल सुबकपणें छापून प्रसिद्ध करून कार्य पूर्णतेला नेण्यास श्री. कर्वे ह्यांची चिकाटी उपयोगी पडली. नंतर १९४९ मध्ये पुण्यास दुसरी बैठक भरली त्या संमेलनाच्या कार्यकारी मंडळाचे श्री. कर्वे अध्यक्ष होते. अशी थोर सेवा त्यांनी केली.

## इतिहास संशोधन आणि साहित्य सेवा

कर्वे ह्यानी म. सा. प. प्रमाणेंच आपल्या ज्ञानलालसेमुळें भारत इतिहास संशोधक मंडळ या संस्थेच्याहि चिटणीशीची धुरा दहा वर्षे वाहिली. आपली चिटणीशी संभाळून ह्या काळांत इतिहास आणि वाङ्मय यांच्या संशोधनांतहि मन घातलें आणि तुळशीबागवाले दप्तर वगैरे सर्व धुंडाळून मंडळाच्या नगर संशोधन शाखेंत माहितीची टांचणें सादर केली. नवीं कागदपत्रें व पोथ्याहि मिळविल्या. ते शेवटपर्यंत कारभारी मंडळाचे सभासद होते. अशा गुणी आणि ज्ञानी मनुष्याचा उपयोग करून घेण्याची सुबुद्धि मुंबई सरकारासहि झाली आणि लोकसाहित्य जमा करून प्रसिद्ध करण्याच्या समितीचे अध्यक्ष म्हणून कर्वे यांची नियुक्ति झाली. समितीने जमा केलेलें लोकसाहित्य आपल्या समोर आहेच.

## सांस्कृतिक कार्यांतील वांटा

हिन्द सरकारच्या शास्त्रीय परिभाषा सल्लागार समितीचे ते सदस्य होते. शास्त्रीय परिभाषा कोशाचा अनुभव त्यांस नवीन नव्हता. महाराष्ट्राचें सांस्कृतिक जीवन उंचावणाऱ्या अनेक कार्यांत कर्वे यथाशक्ति लक्ष घालीत. पुण्याचें महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन झाले. तेव्हां त्या विद्यापीठाच्या सदस्य मंडळाचे ते सदस्य होते. विद्यापीठाच्या ग्रंथप्रकाशन आणि प्रकाशन अनुदान समितींत ते आस्थेनें काम करीत. विद्यापीठाच्या बहिःशाल मंडळाचे ते सदस्य होते. तेथेंहि ते मन लावून कार्य

करीत. त्यांचा अनुभविक सल्ला ह्या समित्यांना मार्गदर्शक होत असे. तसेंच सरकारच्या पेशवे दप्तर समितीचेहि ते सदस्य होते. काम पत्करलें म्हणजे नियमितपणानें सभांना हजर राहून त्यांत यथाशक्ति भाग घेण्यावर त्यांचा कटाक्ष असे. 'आनंदीबाईचें चरित्र', 'मानवी संस्कृतीचा इतिहास' असें त्यांचे कांही लहान लहान ग्रंथ प्रकाशित आहेत. अनेक लेखकाना मार्गदर्शन करून त्यांनी उत्तेजन दिलेलें आहे. कित्येक ग्रंथांना प्रस्तावना लिहिलेल्या आहेत. अनेक मासिकांतून आणि विशेषतः य. गो. जोशींच्या 'प्रसाद' मधून विविध माहितीचे लेख लिहिले आहेत. आकाशवाणीवरून त्यांचीं भाषणेंहि होत. ह्याप्रमाणे कर्वे हे आमरण ज्ञानोपासक होते.

## *तीन तपांचा सहकारी*

कर्वे ह्यांच्या मृत्यूमुळें माझी मोठी वैयक्तिक हानि झाली. वर सांगितलेल्या अनेक कार्यांत आज चाळीस वर्षे आम्ही सहकारी आहों. श्री. नानासाहेब चाफेकर यांच्या बदलापूर येथील 'ज्ञानसत्रा' चे कर्वे हे एक चिटणीस असत. बहुधा प्रतिवर्षी सहजासहजी उत्पन्न झालेल्या आमच्या 'वेहोष मंडळा'च्या बैठकी आणि चर्चा बदलापुरी अहोरात्र चालत. नुकतीच आमची बैठक अश्विनांत खंडाळ्यास झाली. कर्वे तेथें उपस्थित होते. आणि दोन महिने उलटले नाहीत; तोंच ते आमच्यांतून गेले! कर्वे फारसें बोलत नसत, पण बोलत, तेव्हां थोडेंच परंतु मुद्याचें बोलत. ते स्वभावाने शांत होते, मनमिळाऊ आणि निगर्वी होते. कळकळीचे कार्यकर्ते होते. त्यांना कामाचा उरक फार असे. ज्याच्यावर विसंबून विश्वासाने रहावे असा त्यांच्यासारखा सहकारी आतां कोठें शोधावा ? त्यांची जागा रिकामीच राहणार ! आमच्या आयुष्यांत ती कांही भरून निघणार नाहीं. त्यांचा मित्रपरिवार मोठा आहे. अन् तोहि महाराष्ट्रभर पसरलेला आहे. आपल्या कोशाच्या रूपाने कर्वे महाराष्ट्रांत सर्वत्र दिसत राहतील आणि त्यांच्या मृत्यूमुळे लागलेला चटका मनाला सतत दुःखी करीत राहील. तथापि अपरिहार्य अर्थासंबधानें 'न त्वं शोचितुमर्हसि !' हे भगवद् वचन प्रमाण धरूनच पुढें चाललें पाहिजे !

— साधना पुण.

# १२

# वि. का. राजवाडे

## इतिहासाचे भीष्माचार्य

♣ ♣

इतिहास-संशोधनाच्या क्षेत्रांतील माझे गुरुवर्य कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांना मीं प्रथम पाहिलें तें १८९६ सालीं. त्यावेळीं मी फार तर सहा वर्षांचा असेन. या सालीं मुंबई येथील आपलें बिऱ्हाड मोडून माझे वडील कै. वामन मोरेश्वर पोतदार हे पुणे येथें वकिलीसाठीं आले आणि आम्हीं सध्यां जेथें किर्लोस्कर थिएटर आहे त्या जागीं दुसऱ्या मजल्यावर राहूं लागलों. पुण्यास बिऱ्हाड केल्याच्या पहिल्याच दिवसापासून आमच्याकडे नियमितपणें येणाऱ्या ज्या दोन व्यक्ती मला आठवतात त्या म्हणजे कै. विष्णु गोविंद विजापूरकर आणि कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे हे होत. कै. विजापूरकर, कै. राजवाडे व माझे वडील हे प्रथमपासूनच डेक्कन कॉलेजमधील सहाध्यायी. त्यामुळें त्यांचें आमच्याकडे असें येणें साहजिकच होतें.

कै. राजवाडे आमच्याकडे येत ते बहुतेक वेळ आमच्या घराच्या तिसऱ्या मजल्यावरील माळ्यावर वाचन करण्यासाठींच. त्यावेळीं बुधवार चौकांतील ढमढेऱ्यांच्या वाड्यांत असणाऱ्या ‘सरदारगृहांत’ ते जेवत आणि आमच्या घरीं

येऊन वाचीत असत. अंगांत निळसर काळा कोट, डोक्याला पांढरा फेटा, आंखूड धोतर, पायांत जोडा आणि एका हातांत काठी-असा पोषाख केलेली कै. राजवाडे यांची ती तेजःपुंज गोरीपान आणि जुन्या रोमन लोकांप्रमाणें रेखीव नाका-डोळ्यांची मूर्ति पाहून त्यां काळींहि मला त्यांच्याविषयीं आदरमिश्रित कुतूहल वाटे. आणि मग माझे वडील आणि कै. विजापूरकर यांजबरोबर तासन् तास चालणाऱ्या त्यांच्या गप्पा – त्यांमधील विषय त्या काळीं माझ्या पूर्ण आटोक्याबाहेर असतांहि – मी ऐकत बसे.

## माझ्या मनावर पडलेली पहिली छाप

पुढच्याच वर्षी म्हणजे १८९७ सालीं 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' या कै. राजवाडे यांच्या सुप्रसिद्ध ग्रंथाचा प्रथम खंड प्रसिद्ध झाला आणि त्याच्या दोन- तीनशें प्रती आमच्या माळ्यावर येऊन पडल्या ! कै. राजवाडे यांनीं या ग्रंथाला लिहिलेली अप्रतिम प्रस्तावना वाचण्याची गोडी मला प्रथम कशी लागली हें आज नक्की आठवत नाही, परंतु मीं ती संपूर्ण वाचून काढली तेव्हां त्यामध्यें प्रकट झालेल्या इतिहास–संशोधन विषयक विचारांनी मी अक्षरशः प्रभावित झालों. भारताचा– त्यांतहि विशेषतः महाराष्ट्राचा – इतिहास इतका उज्ज्वल असतांनाहि त्याच्या संशोधनाच्या कामीं तत्कालीन महाराष्ट्रीय जनांकडून जी अक्षम्य उपेक्षा केली जात होती तिचें मोठें विदारक चित्र कै. राजवाडे यांनीं या प्रस्तावनेंत रंगवलें होतें; एवढेंच नव्हे, तर महाराष्ट्राच्या या प्राचीन इतिहासाचें संशोधन करण्यासाठी हिंदुस्थानांतील ज्या ज्या गांवीं जाऊन शोध करणें आवश्यक आहे अशा सुमारें ऐंशी गांवांची यादीहि त्यामध्यें दिली होती. या सर्व माहितीचा आणि विशेषतः तिच्यामधील कळकळीच्या लेखनपद्धतीचा माझ्या बालमनावर एवढा जबरदस्त परिणाम झाला कीं, आपण मोठे झाल्यावर अशा तऱ्हेच्या कार्यास वाहून घेण्याचा माझा निश्चय त्या वेळींच जवळजवळ कायम झाला. या नंतरची माझी कै. राजवाडे यांच्याविषयींची ठळक आठवण १९०६ सालची आहे. त्या सालीं महाराष्ट्रीय ग्रंथकारांचें संमेलन म्हणजेच आधुनिक महाराष्ट्र साहित्य-संमेलन पुणे येथें मळेकरांच्या वाड्यांत कानिटकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. मी नुकताच कॉलेजमध्यें प्रविष्ट झालेला. महाराष्ट्रांतील नामवंत साहित्यिकांना प्रत्यक्ष पहाण्याच्या हेतूनें या सम्मेलनास मी मुद्दाम हजर राहिलों. त्यावेळीं सीतारामपंत दामले, चिंतामणराव वैद्य, पांगारकर, रेव्ह. टिळक, कृ. प्र. खाडीलकर आदि साहित्यिकांच्या मेळाव्यांत बसलेल्या कै. राजवाडे यांची व माझी गाठ पडली. आपल्या स्नेह्याचा मुलगा म्हणून मला ते ओळखत होतेच. तेव्हा संमेलन संपतांच मीं त्यांना जोगेश्वरी-समोरील ढवळयांच्या वाड्यांत (आम्हीं त्या वेळीं त्या वाड्यांत रहात होतों) आग्रहपूर्वक घेऊन गेलों. तेथून पुढें कै. राजवाडे यांचा व माझा ऋणानुबंध वाढतच गेला आणि

१९१० सालीं भारत इतिहास-मंडळाच्या स्थापनेनें तो दृढतर झाला; तो इतका कीं, ते मला वेळोवेळीं इतिहास-साधनांच्या सफरीवर बरोबर नेऊं लागले आणि मग कालांतरानें मी त्यांचा शिष्य म्हणून सर्वत्र ओळखला जाऊं लागलों.

## प्रतिभा व भावना यांचें अजब मिश्रण

कै. राजवाडे यांच्या मृत्यूला आज पुरीं तीस वर्षें झालीं असलीं, तरी त्यांचें नांव आणि इतिहास–संशोधन–क्षेत्रांत त्यांनी केलेली महनीय कामगिरि यांचा ठसा महाराष्ट्रीय मनावर आजहि स्पष्टपणें उमटलेला दिसून येतो. कै. राजवाडे म्हटलें कीं, इतिहास–संशोधनासाठीं आमरण कष्ट सोसणारा, लोकोत्तर प्रतिभेचा, तपस्वी महापुरुष आजहि डोळ्यांपुढें उभा रहातो हें एका अर्थानें कै. राजवाडे यांच्या मोठेपणाचेंच गमक मानावें लागेल. लोकोत्तर प्रतिभा आणि लोकविलक्षण विक्षिप्तपणा यांचें जें अजब मिश्रण कै. राजवाडे यांच्या व्यक्तिमत्त्वांत झालें होतें त्यामुळें त्यांचें सारें चरित्र हा अभ्यासकांचा, तसेंच सर्वसामान्य जनांच्याहि कुतूहलाचा विषय होऊन बसला आहे. कै. राजवाडे यांच्या व्यक्तिमत्त्वांत सकृद्दर्शनीं जाणवणारा हा विरोधाभास प्रतिभा आणि भावना यांचें जें आत्यंतिक मिश्रण झालें होतें त्यामधूनच निर्माण झाला होता. आपल्या लोकोत्तर प्रतिभेच्या जोरावर संशोधन–कार्यामध्यें मन थक्क करणारे सिद्धान्त प्रस्थापित करणारे राजवाडे आणि आपल्या आत्यंतिक भावनाशीलतेमुळे प्रसंगी अतिशय विक्षिप्त, तामसी वा संशयी वृत्तीनें वागणारे राजवाडे हे वस्तुतः एकाच अगाध व्यक्तिमत्त्वाचीं दोन रूपें होतीं. संशोधन-क्षेत्रांत ‘इतिहासाचार्य’ म्हणून मान्यता पावलेले राजवाडे खाजगी जीवनांत प्रतिदुर्वास मुनि वाटत याचें रहस्य हें असें आहे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आतां जे दोन गुण सांगितले ते त्यांच्या बाह्य व्यक्तिमत्त्वांत पूर्णपणें प्रतिबिंबित झालेले दिसत.त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा निःस्पृह तुसडेपणा, त्यांच्या विकाराची तीव्रता व्यक्त करीत असे. त्यांचें भव्य कपाळ, दीर्घ नासिका आणि निश्चयी हनुवटी त्यांच्या बुद्धीच्या पसाऱ्याची साक्ष देत असे, तर अनंत अवकाशांत पहाणारे त्यांचे स्वप्नाळू डोळे त्यांच्या प्रतिभेचा अजस्र पसारा दर्शवीत असत. कै. राजवाडे यांचा चेहरा जितका नीटस तितकाच उग्र दिसे. त्यांच्या चेहऱ्याचा आणि शरीराचा एकंदर घाट जुन्या काळच्या एखाद्या रोमन योध्याप्रमाणें तेजस्वी आणि पिळदार असे. लहानपणीं भरपूर तालीम केल्यामुळें लोखंडाच्या कांबीप्रमाणें घोटीव व प्रमाणबद्ध बनलेल्या त्यांच्या शरीरयष्टील कठोर तत्त्वनिष्ठा आणि घोर तपश्चर्या यांच्या योगें एक आगळाच कठीणपणा आलेला दिसे.

ज्याला आपण प्राचीन आर्यांचें ब्रह्मतेज म्हणतों व ज्याच्या जोरावर मनुष्य सर्व जग जिंकू शकतो तशा प्रकारची शक्ति कै. राजवाडे यांनीं प्रयत्नपूर्वक

कमावली होती. द्रव्यसंचयाला लाथ मारून ज्ञानसंचय करावयाचा, द्रव्यासाठीं कोणापुढेंहि तोंड वेंगाडायचें नाहीं हें खडतर व्रत त्यांनी आमरण मोठ्या निष्ठेनें पाळलें. ज्ञानसंचयासाठीं आणि संशोधनासाठीं सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून आणि रेल्वे किंवा सडका नसलेल्या भागांतून अन्नवस्त्रांची क्षिति न बाळगतां ते अनवाणी हिंडले. त्यांच्या या खडतर तपस्येला महाराष्ट्राच्या बौद्धिक इतिहासांत क्वचितच तोड सापडेल.

कै. राजवाडे आज प्रामुख्यानें इतिहाससंशोधक म्हणून ओळखले जात असले, तरी त्यांच्या एकंदर कार्यांत महाराष्ट्राला स्वत्वाची, स्वधर्माची आणि स्वसंस्कृतीची ओळख पटवून देणाऱ्या विचारवंताचें कार्य अधिक होतें असें मला वाटतें. 'मी वृत्तीनें बुद्धिवादी असून माझी कार्यपद्धति इतिहाससंशोधकाची आहे' असें ते म्हणत, त्याचें गमक नेमकें हेंच होय.

## स्वभाषा, स्वधर्म, स्वत्व

सन १८९० ते १९२६ या काळांत कै. राजवाडे यांनीं महाराष्ट्राच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत जी महनीय कामगिरी बजावली तिचें यथार्थ स्वरूप आज नीट लक्षांत येण्यासाठीं ज्या काळांत त्यांनी ही कामगिरी केली त्याची पार्श्वभूमि प्रथम समजावून घेणें आवश्यक आहे. इंग्रजी सत्तेपुढें संपूर्ण पराभव झाल्यामुळें भारताच्या राजकीय जीवनाची जी हानि झाली तिच्या दुष्परिणामांची अंधुक जाणीव त्या काळच्या शिक्षित समाजाला हळू हळू होऊं लागली होती. भारतीय संस्कृतीच्या काल्पनिक आणि खऱ्या दोषांनी आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या विजयी झगझगाटाने येथील मंडळींचीं मनें त्यावेळीं मोठ्या क्षोभांत सांपडलीं होतीं. स्वतःच्या पराभवाची कारणमीमांसा करीत असतां आपल्या जीवनपद्धतीमधील कोणत्या अंगाला दोष लावायाचा यावर त्यांच्यांत बखेडे माजले होते.

या परिस्थितीचें वर्णन करीत असतां कै. राजवाडे म्हणतात, 'कालचक्र सर्व बाजूंनीं उलट फिरूं लागलें. राष्ट्रांतील एकूण एक लोक देशोधडीला लागले. उलट्या काळजाच्या शत्रूनें सर्वतोपरीं नागविलें. मतलबी लोकांच्या बोलण्याला उच्च मंडळी भुलून गेली. आणि परकीय मंडळींनी सुचविलेल्या अभूतपूर्व विषयांची वाटाघाट करण्यांत सर्व लोक गुंग होऊन गेले....खरी विद्वत्ता अस्तास गेली व स्वभाषेचा, स्वधर्माचा व स्वत्वाचा विसर पडला!'

'गुरूचा धाक नाही, पुढाऱ्याचा किता नाही, धर्माचा प्रतिबंध नाही!' अशा परिस्थितीमध्ये स्वभाषा, स्वधर्म आणि स्वत्व यांचें संरक्षण करण्यावाचून राष्ट्राचा तरणोपाय नाही अशी कै. राजवाडे यांची अगदीं तरुण वयांत खात्री झाली. डेक्कन कॉलेजसारख्या इंग्रजी वळणाच्या शिक्षणसंस्थेमध्यें शिक्षण घेऊनहि कै. राजवाडे यांना अशा

११५९१

तऱ्हेचें कार्य करण्याची स्फूर्ति झाली, याचें श्रेय त्या काळांतील तीन श्रेष्ठ ग्रंथकारांस दिलें पाहिजे. त्याचें वर्णन करीत असतां कै. राजवाडे म्हणतात, ‘ विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या टीकात्मक निबंधांनी इंग्रजी भाषेच्या खग्रासापासून माझा बचाव झाला; काव्येतिहासकारांच्या ऐतिहासिक पत्रांनी, स्वदेश म्हणून कांही आहे हें मला समजलें आणि परशुराम तात्या गोडबोले ह्यांनी छापलेल्या काव्यांनी महाराष्ट्र सारस्वताचा मला अभिमान वाटूं लागला. हे तीन ग्रंथ जर माझ्या दृष्टीस न पडते तर मी त्या काळच्या इतर मंडळींप्रमाणें इंग्रजींत व्याख्यानें देण्यास, बूट-पाटलोण घालून देशाभिमानाचीं पत्रें काढण्याच्या ईर्षेस आणि सुधारकांप्रमाणें बायकांस झगे नेसवण्याच्या ईर्षेस खचित पडलों असतों. ’

राजकीय आणि वैचारिक अशा दोन्ही दृष्टींनी परदास्यांत सापडलेल्या आपल्या राष्ट्राला स्वसंस्कृतीची आणि स्वत्वाची जाणीव करून द्यावयाची तर ह्यासाठीं स्वराष्ट्राच्या इतिहासाचें संशोधन आणि लेखन या दोन गोष्टी अतिशय आवश्यक आहेत अशी राजवाडे ह्यांची कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा ‘ इतिहास ’ हा निबंध वाचून खात्री पटली. परदास्यांत खितपत पडणाऱ्या लोकांस त्यांच्या स्वतःच्या उद्धारासाठीं राष्ट्राच्या इतिहासाचें ज्ञान किती आवश्यक आहे याचें विवेचन करीत असतां कै. राजवाडे एके ठिकाणीं म्हणतात, ‘ समाजाचें सबीज व सकारण चरित्र कळलें असतां आपल्या समाजांत काय गुण-दोष आहेत हें समजून येतें आणि मग स्वतःमधील दोषांचा त्याग आणि गुणपरिपोष करण्याची प्रवृत्ति समाजांत निर्माण होते. एवंच दोष त्याग आणि गुण परिपोष हा इतिहास ज्ञानाचा मुख्य उद्देश मानावा लागेल. समाज–चरित्राचीं बीजें जोंवर कळलीं नाहीत, तोंपर्यंत समाजहित साधण्याची बुद्धि असूनहि, समाजहित साधतां येणार नाही हें उघडच आहे. रोगस्थान कळल्यावांचून औषधोपचार कोठें करावयाचा व शक्तिस्थान कळल्यावांचून तिची वृद्धि कोठून करायची ? ’ ‘ स्वसमाजाचें सबीज व सकारण चरित्र म्हणजे इतिहास होय ’ ही कै. राजवाडे यांनीं वरील उताऱ्यांत सागितलेली इतिहासाची व्याख्या अनेक दृष्टींनी व्यापक, तशी कोणत्या विशिष्ट प्रेरणेने हे इतिहाससंशोधन क्षेत्रांत पडले हें जाणून घेण्याच्या दृष्टीने जाणून घेणें महत्त्वाचें आहे. ‘ इतिहास म्हणजे केवळ राजकीय घटनांची आणि व्यक्तींची रुक्ष हकीगत ’ अशी कल्पना आपल्याकडेच नव्हे तर पाश्चात्य इतिहासकारांमध्येंहि फार पूर्वीपासून रूढ होती. अशा परिस्थितींत गतकालाचें राजकारण म्हणजे इतिहास ( History is past politics ) ही फ्रीमनची संकुचित व्याख्या त्याज्य ठरवून, हजारों वर्षांपासून आपणाकडे प्रचलित असलेली, इतिहास या शब्दांत अनुस्यूत असलेली ‘ असें असें घडलें ’ ही इतिहासाची सर्वंकष आणि व्यापक व्याख्या पुन्हां रूढ करण्याचें श्रेय कै. राजवाडे यांनाच दिलें पाहिजे. इतिहासाच्या या आपल्या व्यापक व्याख्येसंबंधीं विवरण करीत असतां

कै. राजवाडे म्हणतात—' मानव समाजाच्या गतचित्रांतील अमुक भाग इतिहास नाही, अमुक भाग इतिहास आहे असें म्हणणें बरोबर नाही. गतकाळीं समाजाच्या अंतरंगांत घडलेल्या सर्व तऱ्हेच्या उलाढालींची साद्यंत आणि विश्वसनीय हकीगत ती इतिहास होय.'

## मराठ्यांचा भौतिक व आत्मिक इतिहास

इतिहासाची अशी व्यापक व्याख्या तयार केल्यानंतर याच दृष्टिकोनांतून महाराष्ट्राच्या गतेतिहासाचें कै. राजवाडे संशोधन करूं लागले; तेव्हां त्यांच्या देशांत घडणाऱ्या घटनांचे बाह्य इतिहास आणि आंतरिक इतिहास असे दोन स्वतंत्र विभाग पडतात असें त्यांच्या ध्यानीं आलें. यापैकीं बाह्य अथवा भौतिक इतिहासांत कोणतीहि घटना, कशा क्रमानें वा प्रकारें घडली याचें विवेचन येत असून अंतरंगाच्या अथवा आत्मिक इतिहासांत ही विशिष्ट घटना कां घडली याचें विवेचन करणें आवश्यक असतें. या मुद्याचें विवरण करीत असतां राजवाडे म्हणतात, ' समाजाच्या चरित्रांतील शेकडों व हजारो प्रसंग केवळ नमूद करून भागत नाही, तर प्रसंगांचें पौर्वापर्य कार्य-कारण संबंध दाखवून त्यांची ऐतिहासिक कारणपरंपरा सिद्ध करावी लागते. यालाच इतिहास समाजशास्त्र अशी संज्ञा आहे.'

इतिहासाच्या व्याप्तीची बैठक अशा तऱ्हेने स्वतःच्या मनांत पक्की झाल्यानंतर राजवाडे यांनी त्याआधारें मराठ्यांच्या भौतिक आणि आत्मिक इतिहासाच्या संशोधनास सुरुवात केली. यापैकीं भौतिक इतिहासावर म्हणजे ऐतिहासिक घटनांवर प्रकाश पाडणारे जे महत्त्वाचे प्राचीन कागद-पत्र दीर्घ संशोधनांतीं त्यांना मिळाले ते त्यांनी ' मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ' या बावीस खंडांतून प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांमध्यें एकत्र केलें आहे. या पत्रांच्या आधारें मराठ्यांच्या आत्मिक इतिहासाविषयीं जीं अनुमानें राजवाडे यांच्या मनांत तयार झालीं तीं त्यांनी त्या खंडाच्या सविस्तर प्रस्तावनेमध्यें नमूद करून ठेवलीं आहेत. ऐतिहासिक कागदपत्रांच्या या खंडाची एकंदर पृष्ठसंख्या पांच हजार पांचशें चव्वेचाळीस इतकी झाली असून त्यांना जोडलेली प्रस्तावनाहि पांचशे बत्तीस पृष्ठांची आहे. या सर्व खंडांमध्यें एकंदर ४४१७ ऐतिहासिक पत्रें मुळाबरहुकूम छापण्यांत आलीं असून त्यांतील दर एक कागद मिळविण्यासाठीं राजवाडे यांस मैलोगणती भ्रमंती करावी लागली हें लक्षांत घेतलें म्हणजे कै. राजवाडे ह्यांनीं या कार्यासाठीं घेतलेल्या दीर्घ परिश्रमांची कल्पना येऊं शकेल.

ग्रँट डफसारख्या परदेशी इतिहासकाराने लिहिलेले विपर्यस्त इतिहास आणि चार-दोन फुटकळ बखरी यांच्या पलीकडे ज्यावेळीं हिंदी इतिहासाची प्रगति झाली नव्हती त्या काळांत राजवाड्यांनी हें सर्व कार्य केलें आहे. हें लक्षांत घेतलें म्हणजे ' इतिहासाचार्य ' ही त्यांची पदवी सार्थ वाटू लागते.

ऐतिहासिक कागदपत्रांच्या संकलनाचें कै. राजवाडे ह्यांनीं केलेलें हें सारें काम मोठ्या परिश्रमाचें तर खरेंच, परंतु राजवाडे यांच्या प्रतिभेचा आणि बुद्धीचा खरा विलास या इतिहास साधनांच्या आधारें त्यांनी काढलेल्या मराठ्यांच्या आत्मिक इतिहासाच्या अनुमानांमध्यें खराखुरा दिसून येतो. कै. राजवाडे यांनी गोळा केलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांमुळें ग्रँट डफसारख्या पाश्चात्य इतिहासकारांनी लिहिलेला मराठ्यांचा इतिहास किती विकृत आणि विपर्यस्त आहे हें सर्वांच्या लक्षांत आलें. उलट त्यांनी या खंडांना लिहिलेल्या प्रस्तावनांनी मराठी साम्राज्य कां बुडालें यासारख्या मूलभूत प्रश्नांना हात घालून या सर्व समस्यांबाबत समाजाला एक नवी दिव्य दृष्टि प्राप्त करून दिली.

या दृष्टीनें कै. राजवाडे यांनी लिहिलेली सर्वांत महत्त्वाची प्रस्तावना म्हणजे पहिल्या खंडाची होय. या खंडांतील पानिपत युद्धाबद्दलच्या कागदपत्रांचा परामर्श घेत असतां पानिपत युद्धांत मराठ्यांचा पराभव कां झाला आणि मराठेशाही कशी बुडाली याचा सविस्तर विचार त्यांनी करावा हें ओघानेंच येतें. त्याविषयीं चर्चा करीत असतां ते लिहितात —' शिवकालीं औरंगजेबाच्या मिशा उपटणारे मराठे वीर मूठभर इंग्रजांपुढें नमतात हा काय चमत्कार आहे ? औरंजेबाच्या वेळीं सहकार्य, उद्योग, शौर्य याबद्दल परमविख्यात पावलेले मराठे इंग्रजांच्या पुढें विस्कळीत, आळशी, भेकड कसे दिसूं लागले ?......... '

या कांहीशा विवाद्य प्रश्नांचा विचार करीत असतां कै. राजवाडे सप्रमाण सिद्ध करून दाखवितात कीं, इंग्रजासमोर मराठ्यांचा पाडाव झाला तो इंग्रजांचीं युद्धसाधनें मराठ्यांपेक्षां अधिक उच्च प्रतीचीं असल्यामुळेंच झाला. मराठेशाहींत त्याकाळीं असलेली दुफळी, भाऊबंदकी वा आळस हीं कारणें दुय्यम महत्त्वाचीं होतीं. या आपल्या मुद्यांचें विवरण करीत असतां ते पुढें म्हणतात, ' राष्ट्राचें स्वातंत्र्य वा पारतंत्र्य पल्लेदार हत्यारांवर अवलंबून असतें. मराठ्यांचें स्वराज्य जाण्याचें एकच एक कारण पल्लेदार हत्यारांचा अभाव हें होय. आळस वगैरे कारणें गौण होत. किंबहुना हीं कारणेंच नव्हत. ' मग याहि पुढें जाऊन ते आधिक तात्विक स्वरूपाचा सिद्धान्त प्रस्थापित करतात, तो असा कीं, प्रगत शास्त्रीय स्थितीप्रत असलेल्या शत्रूचें उच्चाटन करण्यास स्वतःचा समाज प्रथम त्या स्थितीप्रत नेलेला असला पाहिजे. त्या दृष्टीनें पाहूं जातां १८ व्या शतकांतील मराठे हे शास्त्रीय प्रगतीच्या बाबतींत यूरोपांतील प्रगत राष्ट्रांच्या तुलनेने मागासलेलेच होते. थोडक्यांत म्हणजे त्यांची भौतिक संस्कृति प्रगत युरोपीय संस्कृतीहून कमी दर्जाची होती.

## भौतिक विद्यांचा अपकर्ष कां ?

ही संस्कृति कोणत्या बाबतींत मागासलेली होती याचा तपशील देतांना कै. राजवाडे यांनी मुद्रणकला, ऐतिहासिक व भौगोलिक ज्ञान, भौतिक

विद्या, शस्त्रास्त्रें वगैरेंचा सविस्तर परामर्श घेऊन या इतक्या गोष्टी नव्हत्या म्हणूनच मराठ्यांचा पराभव झाला हें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे.

महाराष्ट्रांत भौतिक विद्येचा उत्कर्ष कां झाला नाहीं व शस्त्रास्त्रविद्येंत महाराष्ट्र तत्कालीन युरोपच्या मागें कां पडला या प्रश्नाचा विचार करीत असतां कै. राजवाडे यांच्या मनांत एक नवें इतिहासविषयक तत्त्व रुजलें. तें असें कीं, विशिष्ट राष्ट्रांत त्या त्या काळीं जें जीवनविषयक तत्त्वज्ञान प्रभावी असतें त्यावर त्या त्या राष्ट्राची कृतीहि बऱ्याच अशीं अवलंबून असते. या विशिष्ट तत्त्वाचें विवरण करीत असतां ते म्हणतात —

'जसें राष्ट्राचें तत्त्वज्ञान तशी त्याची कृति हा सिद्धान्त आहे. विवक्षित काळचा कोणताहि समाज घ्या. त्यांत कोणतें तत्त्वज्ञान नांदत आहे एवढें कळलें म्हणजे त्याची कृति कशी होईल याचें स्थूल अनुमान बांधतां येईल !'

याच विचाराच्या पार्श्वभूमीवर मराठेशाही आणि पेशवाई या काळांत महाराष्ट्रांत भौतिक विद्या वाढीस कां लागूं शकली नाहीं हें पाहूं जातां राजवाडे यांच्या असें ध्यानीं आलें कीं, या सर्व काळांत महाराष्ट्रावर ज्ञानेश्वर, तुकारामादि निवृत्तिवादी संतांच्या तात्त्विक शिकवणुकीचा जो जबरदस्त पगडा बसला होता तो या दुरवस्थेस सर्वस्वी जबाबदार आहे. तोफा, बंदुका आदि शस्त्रसामग्री आपणांकडे बनविण्याची बुद्धि कधींच कशी सुचली नाही, याचें विवेचन करीत असतां राजवाडे म्हणतात 'मराठेशाहीच्या काळीं ज्ञानेश्वर, तुकाराम आदि संतांच्या तात्त्विक शिकवणीचें जोखड मनावर इतकें पक्कें बसलें बसलें होतें कीं, त्यापुढें शास्त्रीय प्रगतीचें बीज रुजूंच शकलें नाहीं. युरोपांत डेकार्ट, बेकन आदि विचारवंत सृष्ट पदार्थांचें संशोधन करण्यास लोकांस उद्युक्त करीत होते, तर त्याच वेळीं आमच्याकडील एकनाथ, तुकाराम, दासोपंतादि संत-पंचभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्काराद्वारें राष्ट्राला मुक्त करण्याची भाषा करीत होते. अशा मंडळींना स्क्रू, टाचणी, बंदूक व तोफ यांचा विचार वमनप्राय वाटल्यास त्यांत नवल कसलें ?

वर वर्णिलेल्या निवृत्तिमार्गी संताच्या महाराष्ट्रीय परंपरेस एक तेजस्वी अपवाद काय तो रामदासांचा. निवृत्तिमार्गाकडे झुकत चाललेल्या तत्कालीन समाजाला कर्मयोगी बनविण्याचें महत्कार्य रामदासांनी केलें आणि राष्ट्रधर्माची कल्पना प्रसृत केली. आणि या राष्ट्रधर्माच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचें अलौकिक पराक्रमाचें कार्य शिवाजी महाराजानी केलें. मराठेशाहीच्या स्थापनेच्या कामीं रामदास स्वामींनी केलेल्या सांस्कृतिक कामगिरीचा मोठा स्फूर्तिदायक इतिहास कै. राजवाडे यांनी आपल्या 'रामदास' निबंधांत मांडला आहे. राष्ट्रधर्माच्या प्रचारार्थ सर्वसंगपरित्याग करून संन्यस्तवृत्तीनें राहण्याची कल्पना या निबंधांत मांडली आहे. या निबंधामुळेंच अशा इतिहाससंशोधन करणाऱ्या तरुण इतिहाससंशोधकांची परंपरा त्याकाळीं महाराष्ट्रांत निर्माण झाली हें येथें नमूद करणें आवश्यक वाटतें.

## त्यांच्या संशोधनाची बैठक

इतिहास म्हणजे तत्कालीन समाजाचें भौतिक व आत्मिक चरित्र, अशा व्यापक व्याख्येच्या पार्श्वभूमीवर कै. राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाबाबत कायकाय महत्त्वाचें संशोधन केलें याची अल्पशी हकीगत येथवर सांगितली, परंतु कै. राजवाडे यांच्या प्रतिभेचा एकंदर आवाका असा जबरदस्त होता कीं, तो मराठ्यांच्यापुरताच मर्यादित राहील हें केवळ असंभवनीय होतें. यामुळेंच मराठ्यांचें हृद्गत त्यांनी उत्कृष्टपणें ओळखलें, तरी केवळ त्यामध्येंच ते गुरफटून राहूं शकले नाहीत; मराठ्यांच्या इतिहासाचा शोध करीत असतां साऱ्या आर्य संस्कृतीचा इतिहास शोधण्याची आकांक्षा त्यांच्यांत निर्माण झाली. इतिहास-शास्त्राच्या अभ्यासांतून त्यांची दृष्टि भाषा, समाज, अशा अनेक गहन विषयांत शिरली आणि मग अशा तऱ्हेनें ऐतिहासिक कागदपत्रांवरून मराठींतील शब्दसंग्रहाकडे, शब्दसंग्रहावरून व्याकरणाकडे, व्याकरणाकडून मराठी भाषेच्या उगमस्थानाकडे आणि मग अखेरीस भाषेवरून विकार व विचार प्रदर्शनाच्या साधनाच्या इतिहासपूर्व व इतिहासोत्तर उत्क्रांतीकडे त्यांची प्रगल्भ, व्यापक व तौलनिक बुद्धि संचरत गेली. गंगोत्रींत जन्म पावणारी व स्थलकालांनी बद्ध झालेली जान्हवी आपल्या प्रवाहाचें पात्र विस्तृत करीत व भोंवतालचा प्रदेश समृद्ध करीत अखेरीस स्थलकालक्रमातीत अशा सागरांत विलीन होऊन जावी त्याप्रमाणें कै. राजवाडे यांची बुद्धिमत्ता प्रथम स्थलकालानें बद्ध होत्साती शिवकालीन समाजरचना, रामदास, ज्ञानेश्वरीची प्रस्तावना, महानुभाव पंथाच्या गुप्त लिपीचा उलगडा, मराठी धातुकोश, इत्यादींवर प्रकाश पाडून अखेरीस मराठ्यांची प्राथमिक वसाहत, गांवांचीं नांवें इत्यादि गहनगूढ समस्यांच्या महासागरांत विलीन झाली.

कै. राजवाड्यांच्या संशोधनकार्याची जी थोडी माहिती मीं येथवर सांगितली तिच्यावरून ते डॉ. भांडारकर आदि समकालीनांप्रमाणें इतिहाससंशोधनासाठीं इतिहास संशोधन करणारे पुस्तकी पंडित नव्हते हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. इतिहाससंशोधनामागील कै. राजवाडे यांची प्रेरणा पुस्तकी ज्ञानलालसेपेक्षां निष्ठावंत देशभक्ताचीच होती. आपला देश परतंत्र आहे तो स्वतंत्र झाल्यावाचून त्याचा उत्कर्ष शक्य नाहीं व तो स्वतंत्र व्हावयाचा तर आधुनिक युरोपियन शास्त्रें व कला आत्मसात् करून त्यांचा आपल्या पूर्वपरंपरेशीं मेळ घालणारा युयुत्सु हिंदु राष्ट्रवाद निर्माण होणें जरूर आहे असें त्यांच्या मनानें घेतलें होतें. आणि त्यांचें सर्व लिखाण याच भावनेने प्रेरित होऊन लिहिलेलें आहे. पाश्चात्य जेत्यांना यशस्वीपणें तोंड देऊन आपला उद्धार करून घ्यावयाचा तर वेदांती लोक करतात त्याप्रमाणें तत्त्वचर्चा करून आपला निभाव लागणार नाही. नित्शेने जर्मन राष्ट्रास 'विल टु पॉवर' या

मंत्राचें तत्त्वज्ञान शिकवून शोपेनहॉरच्या नैराश्यवादी वेदान्ती वृत्तीपासून परावृत्त केलें तसा प्रयत्न आपणहि केला पाहिजे अशी त्यांची आत्यंतिक इच्छा होती.

इतिहास, वाङ्मयशास्त्र, राज्यशास्त्र, भूस्तरशास्त्र, मानववंशशास्त्र, तत्त्वज्ञान, प्राचीनवस्तु-संशोधन, नाणींशास्त्र, अर्थशास्त्र वगैरे अनेक विषयांवर त्यांनी जें लेखन केलें तें या हेतूनेच प्रेरित होऊन केलें.

आपलें सर्व आयुष्य महाराष्ट्रांतील संशोधनकार्याच्या पायाभरणीच्या कार्यातच खर्ची पडलें; संशोधनाची इमारत बांधलेली पहाण्याचें भाग्य आपल्या वाट्यास आलें नाही या बद्दल कै. राजवाडे यांना आपल्या उत्तर आयुष्यांत अस्फुटशी उद्विग्नता आली होती. उद्विग्नता बोलून दाखविणें त्यांच्या स्वभावांतच नव्हतें, परंतु हिंदवी स्वराज्याच्या पायाभरणींतच हयात खर्ची पडलेल्या शहाजी-राजांच्या आयुष्याबद्दल ज्या आत्मीयतेनें त्यांनी ' राधा माधव विलास चंपू ' च्या प्रस्तावनेंत लिहिलें आहे त्यावरून ही शंका बळावते. तें कांहीहि असलें, तरी मराठी राज्याची मुहूर्तमेढ रोवणारे शहाजी राजे आणि मराठी इतिहाससंशोधनाची मुहूर्तमेढ रोवणारे राजवाडे यांच्यामधील साम्य मला मोठें हृदयस्पर्शी वाटतें.

कै. राजवाडे यांच्या मृत्यूनंतर सुमारे तीस वर्षांच्या कालावधीनंतर त्यांनी केलेल्या संशोधनकार्याचें मी त्रयस्थ बुद्धीनें संशोधन करतां तेव्हां त्यांनी महाराष्ट्राला शिकविलेल्या ऐतिहासिक भौतिकवादाचें मोल काळाच्या ओघांत पूर्वी होतें तसेंच अबाधित आहे असेंच मला दिसून येतं. त्यांनी केलेलें संशोधन आणि व्यक्त केलेलीं अनुमानें जीं नव्या शोधांच्या प्रकाशांत अनेक वेळां कालबाह्य ठरलीं असलीं तरीहि बुद्धीला तर्कशुद्धतेचे पाठ देण्याचें त्यांच्या लिखाणाचें सामर्थ्य पूर्वी होतें तितक्याच तेजानें तळपत आहे असें मला वाटतें. अशा परिस्थितींत बुद्धीला तेज आणण्यासाठीं ज्याप्रमाणें बेकन, प्लेटो, ॲरिस्टॉटल आदि पाश्चात्य तत्त्वज्ञांचें आपण आस्थेनें वाचन करतों तसेंच आस्थापूर्वक कै. राजवाडे यांच्या ग्रंथांचें वाचन व मनन झालें पाहिजे असें मला आग्रहानें सुचवावेंसें वाटतें.

' भौतिक संशोधनक्षेत्रांत आपण जोंपर्यंत पाश्चात्य राष्ट्रांच्या बरोबर येत नाही तोंपर्यंत आपल्या राजकीय स्वातंत्र्याची विशेष मातब्बरी नाही ' या राजवाडे यांच्या सिद्धान्ताचा प्रत्यय आज स्वातंत्र्योत्तर काळांत आपणांस पुन्हा पुन्हा येत आहे. म्हणूनच कै. राजवाडे यांचा सिद्धान्त आणि त्यांचें विवरण हें अजरामर आहे असें म्हणावयास हरकत वाटत नाही. रसायन, विज्ञान, वैद्यक या क्षेत्रांत प्रगति करूं इच्छिणाऱ्या आपल्या राष्ट्रांतील तरुणांना कै. राजवाडे यांचे याविषयीं विचार उद्बोधक वाटतील इतके मूलग्राही व महत्त्वाचे आहेत. शास्त्रीय स्वाधीनतेविषयींचें कै. राजवाडे यांचें स्वप्न आज साकार होऊं घातलें आहे. येत्या ५० वर्षांतच हें पुनर्घटनेचें कार्य पुरें होईल आणि मग कै. राजवाडे यानी एके ठिकाणीं आशा व्यक्त केल्याप्रमाणें,

'वागीश्वरांची ओळख धनेश्वरांना पटवून शास्त्रें, कला, ज्ञानप्रसार आणि विदग्ध वाङ्मय यांनी आपली महाराष्ट्रभू फुलून जाईल!'

तसा दिवस लवकर येऊन गुरुवर्य राजवाडे यांची ही भविष्यवाणी खरी होवो या परती माझ्यासारख्या राजवाडे-भक्ताची दुसरी काय इच्छा असणार?

—किर्लोस्कर, जानेवारी १९५७

* *

मराठा ग्रंथ सं लय. ठा . स्थळप्रत.
अनुक्रम 32045 वि: चरित्र
क्रमांक 7026 नों: दि: 21.2.68

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. 99697

REFBK-0011611